
ईपुस्तक
स्कायलॅब पडली
प्रा.श्रीराम काळे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# स्कायलॅब पडली

(लघुकथा संग्रह)


प्रा.श्रीराम विनायक काळे

एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्

लेखक: प्रा.श्रीराम विनायक काळे
एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.
मोबाइल 8766764641
ई मेल shriramkale.sk@gmail.com
मुखपृष्ठ- swayam art & graphics
ISBN No 978-81-908189-5-7

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक:
ई साहित्य प्रतिष्ठान,
ईलेवन्थ फ़्लोअर, ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : १६ फेब्रुवारी २०२५
©esahity Pratishthan®2025

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
•हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पण पत्रिका



**ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक**
**कै. डॉ. विधाधर करंदीकर यांचे**
**स्मृतीस सादर अर्पण !**

## मनोगत

ई बुक स्वरूपात प्रसिद्ध होणारा हा माझा सहावा कथा संग्रह. साहित्य ही लेखकाची स्वयंभू अभिव्यक्ति असली तरी साहित्य हे संस्कारक्षम असावे असे माझे तरी मत आहे. म्हणून माझ्या अनुभव विश्वातील काही घटना, प्रसंग कथारूपाने मांडताना समाज मूल्यांचे भान मी अवश्य राखतो.

यातील दोन कथा ‘यारो मैने पंगा ले लिया’ आणि ‘कोकणी हिसका’ कार्पोरेट जगातील संघर्ष, कुरघोड्या यांचेदर्शन घडविणाऱ्या आहेत. तर ‘आधी गेली अक्कल’ ही गुन्हेगारी विश्वातील प्रसंगांवर आधारित आहेत. ‘कर्माच्यो गती’ ही कथा गावकुठारी, हातोहात फसवणाऱ्या,लांड्या लबाड्या करणाऱ्या बिलंदरांची हिकमत उलगडून दाखवणारी आहे. गावगाड्यातल्या मी अनुभवलेल्या सुष्ट दुष्ट प्रवृत्ती यथा तथ्य मांडण्याचा माझा प्रयत्न आहे. ‘स्कायलॅब पडली’ आणि ‘येरा गबाळयाचे चे काम नोहे’ या कथा माझ्या शिक्षकीपेशाच्या आरंभकाळी आलेल्या अनुभवांवर आधरित आहेत .

समाजातल्या सामान्य , जानपद वर्गातल्या लोकांची जीवन धारणा हा अगदी कायमपणे माझ्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. त्याचेही दर्शन माझ्या कथांमधून अनाहूतपणे घडते. त्यांची अल्प संतुष्ट वृत्ती, मितव्यय आणि सामाजिक स्वास्थ्य राखण्याची पराकाष्ठा मला प्रकर्षाने भावते. म्हणून प्रसंग वर्णनाच्या अनुषंगाने सामान्यांचे निरागस, निरलस भाव मी जाणीव पूर्वक रेखाटण्याचा प्रयत्न करतो.

या संग्रहाला माझे प्रथम वाचक आणि समीक्षक , माझे वाचनप्रेमी मित्र श्री. विनायक उकिडवे यांची प्रस्तावना घेतली आहे. सुजाण वाचक त्यांचा व्यासंग आणि प्रस्तावनेत उधृत झालेल्या प्रगल्भ साहित्यिक जाणीवा निश्चित टिपतील.

ज्येष्ठ साहित्यिक कै. विद्याधर करंदीकर हे माझे मित्र आणि मागदर्शक! मला सतत प्रेरणा देणारं कोकणातील प्रथितयश साहित्यिकातले अग्रणी व्यक्तिमत्व. मला त्यांच्याविषयी अपार आदर हाहे. म्हणून हा संग्रह मी त्यांच्या पवित्र स्मृतीना अर्पण केला आहे. ई साहित्य प्रतिष्ठानच्या साहित्य यज्ञात या संग्रहाच्या रूपाने एक समिधा अर्पण करून, रसिक वाचकांना धन्यवाद देवून हे मनोगत पूर्ण करतो.

**प्रा. श्रीराम काळे**

## प्रस्तावना



एखाद्या पुस्तकासाठी प्रस्तावना कशी लिहावी याचे अल्पसेही ज्ञान मला नाही. सुदैवाने घडलेले थोडेफार वाचन आणि आणि पुस्तक वाचून अभ्यास करून वर्ष अखेर परीक्षा द्यायचा शाळा कॉलेजातील पूर्वानुभव यांच्या शिदोरीवर ही प्रस्तावना लिहायचा प्रयत्न मी करत आहे. समर्थ रामदासांनी म्हटले आहे त्याप्रमाणे मुळात लिहीणारे थोडे, लिहीलेले वाचणारे त्याहून कमी, वाचुन योग्य अर्थाने समजून घेणारे त्याहूनही कमी, आणि असे जे समजले ते परत तसे सांगू शकणारे त्याहूनही कमी! अशी ही उणावत जाणारी साखळी. अशा या साखळीतील एक म्हणवणारा मी. तेव्हा जे काही मी लिहिले आहे ते माझे मत इतकेच समजणे खरंतर अधिक योग्य.

या संग्रहातील 'यारो मैने पंगा ले लिया' आणि 'कोकणी हिसका' या आधुनिक काळातील कार्पोरेट जगातील घडामोडींचा परामर्ष घेणाऱ्या कथा. दोन्हींचे कथाबीज साधारणपणे सत्प्रवृत्तीचा विजय हे आहे. 'पंगा ले लिया' मध्ये कथानायक सत्प्रवृत्तीला अनुसरून वागणे पसंत करतो आणि उशिरा का होईना न्याय नक्की मिळेल हे सूत्र अधोरेखित होईल असा यात सुखांत आहे. तर 'कोकणी हिसका' कथेत नायकाला अनुभवी काकांचा सल्ला मिळतो आणि तो कामचुकार खलप्रवृत्तीचा पाडाव करण्यात यशस्वी होतो. या दोन्ही कथांची मांडणी पूर्णपणे निर्दोष आणि सफाईदार आहे.

'येरा गबाळ्याचे काम नोहे "ही कथा बरीचशी स्वानुभवनिष्ठ आहे. शिक्षकी पेशातील बारीक सारीक गोष्टी, विशेषतः यशस्वीतेचा मंत्र आणि त्याच्या परीपाठासाठी अत्यावश्यक सहाय्यक तंत्र यांचे तपशीलवार वर्णन हे वाचनीय तर आहेच त्याचबरोबर प्रत्यक्ष अनुकरण करावेसे वाटेल एवढ्या परीणामकारक रीतीने मांडले गेले आहे. यातील निवेदक हे पात्र उभे करताना शिक्षकी पेशाला अनुरूप असे संस्कारी वर्तन सुचित करताना स्तोत्रे वगैरे शिकवणे यातून आपोआपच उलगडणारे, सहज आचरणातून संस्कार पुरस्कार करणारे आहे. 'जंबारी शाळा' ही आडखेड्यातल्या खुशालचेंडू - कामचुकार पटेकर मास्तरची कथा. याच कथेत शिक्षकी पेशातील आदर्श मानावा अशी म्हापणकर बाईंची व्यक्तिरेखा लेखकाने ताकदीने उभी केली आहे. जमाती अंतर्गत दुष्मनीतून सुलेमान अली मास्तरला कसा धडा शिकवतो, याचे बहारदार वर्णनही या कथेत आहे.

‘आधी गेली अक्कल’ स्मगलिंग क्षेत्रातील घटनांचे वर्णन करणारी कथा आहे. कोकणात दुर्गम खाडी किनाऱ्यांच्या आश्रयाने चालणाऱ्या अवैध धंद्यातले बारकावे लेखकाने अचूक टिपलेले आहेत. 'कोरोनाची तिसरी लाट' ही वैद्यकीय क्षेत्रातील ‘मेकमनी’ प्रवृत्तीचे दर्शन घडविते. कोरोना काळात जनसामान्याना गंडा घालून स्वत:ची तुंबडी भरणाऱ्या डॉक्टरांचे कारनामे वर्णिलेले आहेत. 'स्कायलॅब पडली 'ही झक्कपैकी विनोदी कथा. विनोदी कथा म्हटले तरी यातील विनोद हा खरेतर छोटे छोटे चुटके आणि गंमती जमती यांचा एकत्रित परिणाम अंततः साधला जातो, त्याअर्थी घ्यायला हवा. कोसळणाऱ्या स्कायलॅबने तत्कालीन शहरी आणि सुजाण नागरीक म्हणवणाऱ्या लोकांनाही काही काळ चर्वितचर्वण करायला लावले होते ही वस्तुस्थिती तर अनेकांना

ज्ञात असेल. कथासंग्रहाला ओळख देणारी या शिर्षकाची कथा ही कोकणी गजालींचा अनोखा नमुना म्हणूनही रंजक आणि वाचनीय झाली आहे.

'कर्माच्यो गती' या कथेत ईरसाल गावकुठारी भामट्यानी मुंबईतल्या कोठीवाल्या बनेल बाईला कसा गंडा घातला याचे अस्खलित गावरान शैलीत वर्णन केलेले आहे. तर 'सलाईन थेरपी' ही विज्ञानकथा म्हणावी अशा स्वरूपात सामोरी येते. यात आधी एका स्थानिक कृषी औषधे आणि खते बनवणाऱ्या कंपनीचा मार्केटमध्ये टिकून राहाण्यासाठीचा संघर्ष येतो. त्यातील एक महत्त्वाचे पात्र म्हणजे नायक प्रदिप आणि त्याचा मित्र बब्या यांचे यशस्वी डावपेच येतात.

येथवर पांढऱ्यावरती काही काळे करून झाले. मला दिसलेले काही पैलू मी इथे उलगडून दाखविले यात काही उणे अधिक असणे संभवनीय आहे. तेव्हा तुम्ही जाणकार वाचक सहमत असाल तिथपर्यंत मी माझे भाग्य समजेन. तुम्हा सुजाण वाचक वर्गाचा सहप्रवासी म्हणून स्विकार आणि असहमती दोन्हीं बाबतचा अधिकार मी मान्य करतो. मर्मज्ञ टीकाकार आणि सहप्रवासी म्हणूनही तुम्ही मला नी लेखकालाही हवेच आहात.

**विनायक विष्णू उकिडवे.**
**मोबाईल- 9869314865**

# अनुक्रमणिका


०१. यारो मैंने पंगा ले लिया
०२. येरा गबाळ्याचे काम नोहे
०३. जंबारी शाळा
०४. स्कायलॅब पडली
०५. कोकणी हिसका
०६. आधी गेली अक्कल
०७. कोरोनोची तिसरी लाट
०८. सलाईन थेरपी
०९. कर्माच्यो गती

# १. यारो मैंने पंगा ले लिया ...

“कार्पोरेट वर्डमें तुम्हें कभी न कभी सरेंडर होना ही पडता है. तुने दुनिया देखी कहाँ है गधे? बेकारीसे भुखे मरोगे तब होशमें आओगे . तुमने तो पानीमें रहकर मछलीसे बैर मोल लिया है, नतिजा तो भुगतनाही पडेगा...गेट लॉस्ट नाऊ” सोनी साहेबांच्या केबिन बाहेर पडल्यावर तो मुरुगनला भेटून त्याला घेवून कॅण्टिनमध्ये गेला. कॉफी पिताना झालेला विषय त्याला सांगून आपण रिझाईन देवून बाहेरपडणार असल्याचं त्याला बोलला. त्यावर, “ इन चोरोंको अपने पापोंकी सजा कभी न कभी तो भुगतनीही पडेगी.” अस मुरुगन त्राग्याने बोलला. सेक्शनमध्ये गेल्या गेल्या त्याने रिझायनिंग लेटर टाईप करायला घेतलं. पत्र पुरं झाल्यावर दोन प्रिंट काढल्या नी त्यावर सह्या केल्या. मग इनवर्ड सेक्शनमध्ये ओ.सी.वर काऊंटर साईन घेवून तो परत आला . पेंडिंग काम काहीच नव्हतं आणि उद्या इथे यायचं नव्हतं म्हणून नवीन काम सुरु करण्यात काही हशील नव्हतं. ऑफिस अवर्स संपायला अजून दोन तासाचा अवधि होता. त्याने आपला लॉकर नी कपाट उघडलं. सगळे कप्पे तपासून आपले काही पर्सनल कागद राहिले नाही ना? याचा शोध घेतला. मिळालेल्या कागदात महत्वाचं काही काही नव्हतच म्हणून ते फाडून डस्टबीम मध्ये टाकले. कॉम्प्युटर मध्ये डी ड्राईव्हला त्याचा पर्सोनल फोलियो कट करून पेन ड्राईव्ह वर घेतला नी टाईमपास साठी मोबाईलवर बबल गेम ओपन केला.

ऑफिस अवर संपायला पाच मिनिटं राहिलेली असताना अकौंटस् सेक्शन मधल्या जोशी काकांचा फोन आला. “आज सोबत च जाऊया ” एवढं

मोघम बोलून त्यानी फोन कट केला. प्रिमायसिस बाहेर पडताना,“ काही महत्वाचं बोलायच आहे, राजदीप बारमध्ये बसूया, बीअर घेता घेता निवांत बोलू ” एवढं बोलून जोशी पार्किंग लॉटकडे वळले. बार जवळ स्कूटी पार्क करताना मिसेसला फोन करून आपल्याला यायला अकरा वाजतील नी जेवायला वाट बघू नको असा निरोप जोशी काकानी दिला. दिलिप सडाफटिंग नी तो कॉट बेसिस वर टू बीएचके मध्ये चार पार्टनर्स सोबत रहायचा, त्याची वाट पहाणारं कोणीच नव्हतं. इथे कधिच फार गर्दी नसायची. कोप-यातल टेबलं गाठून दोघेही स्थानापन्न झाल्यावर जोशी बोलू लागले. “तुझं रिझायनिंग लेटर बघितल्यावर सोनी साहेबानी मला बोलावून घेतलं. तुला शहाणपणाचे चार शब्द सांगून ताळ्यावर आणायची कामगिरी त्यानी माझ्यावर सोपवलेली आहे... हॉटेलिंग साठी अडिज हजार कॅश दिलिय त्यानी... सगळी भानगड काय आहे ती जरा समजावून सांग...” मग दिलिपने आपले नी साहेबांचे क्लॅशेस कसे झाले ते जोशीना मोकळेपणी - कसलाही आड पडदा न ठेवता सांगून टाकलं.

कंपनीत जॉईन झाल्यावर दोन वर्ष दिलिप प्रॉडक्शन सेक्शनला होता. सोनी साहेबांचा मेव्हणा सुजित पांडे तिथे एच. ओ. डी. च्या पोस्टवर होते . हजर झाल्यावर दोन तीन दिवसातच दोघांचा चांगला दोस्ताना जमला. दर आठवड्याला सबमिट करायचा सेक्शनचा रिपोर्ट सुजितने दिलिपला बनवायला सांगितला. पूर्वीचे रेफरन्स बघून दिलिपने विकली रिपोर्ट करून दिला. सुजितचे रिपोर्ट्स सोनी साहेबांचे स्टेनो दिवेकर चेक करून त्यातल्या कन्स्ट्रक्शन मिस्टेक्स, चुकीची फ्रेझियॉलॉजी दुरुस्त करून देत. यावेळीही दिवेकरानी रिपोर्ट वाचला. चूक एकही नव्हतीच. दिवेकरानी चेक करून दिलेला रिपोर्ट लाल रंगाच्या नक्षीने असा काही चितारलेला असे की टायपिंग करणाऱ्या

सिल्वियाला काही वेळा दिवेकराना विचारून घ्यावं लागे. यावेळी एकही करेक्शन नसलेला कागद बघून सिल्वियाने दिवेकरना इंटर कॉमवर विचारून त्यानी तो चेक केला का? ही खात्री करून घेतली.

आता नेहेमीचे रिपोर्टस दिलिपच बनवून देऊ लागला नी दिवेकरांच्या मागचं एक झंझट कमी झालं . सुजित मध्ये एवढी सुधारणा कशी काय झाली म्हणून त्यानी खोलात शिरून माहिती काढल्यावर त्याना अंदरकी बात उमगली. पण ते कार्पोरेट जगात पुरते मुरलेले होते. आपलं महत्व कमी होऊ नये म्हणून ही बाब साहेबाला कळू नये याची पूरेपूर दक्षता घेतली. येणारा ड्राफ्ट बरोबर असला तरी त्यात एक दोन दुरुस्त्या ते करीत . कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्स पैकी वरूण नागराज आणि टी . सिल्वराज वर्षातून एक दोन वेळा मॅनेजिंग डायरेक्टर, असोशिएट डायरेक्टर आणि सगळया सेक्शनचे एच. ओ. डी. यांची जनरल मिटिंग लावीत . तेव्हा प्रत्येक सेक्शनकडून सुचना, रिक्वायरमेंटस याबाबत रिपोर्ट मागवण्यात येत. या वेळी जनरल मिटींगची तारीख कळल्यावर सगळया सेक्शन्सकडून सजेशन्स मागवण्यात आल्या. ही नोटिस आली नी हे कामही अर्थातच दिलिपकडेच आलं. दिलिपने नीट विचार कंपनीच्या प्रिमायसीसमध्ये आंबा, जांभूळ नी बकुळी ही झाडं लावायची मागणी केली. तसंच सेक्शनला दिलेल्या कॉम्प्युटर सिस्टीम आऊट डेटेड झाल्यामूळे त्या बदलून लॅपटॉपची मागणी केली. दोन्ही माग़ण्या कशा योग्य आहेत याचं जस्टिफिकेशनही तर्कशुद्ध दिलं होतं.

नेहेमीच्या शिरस्त्याप्रमाणे कच्चा ड्राफ्ट दिवेकरांकडे गेला. तो दिलिपनेच केला असणार म्हणून न वाचताच फायनल करायला सांगितला.

नियोजीत दिवशी मिटींग सुरु झाली. सुजितचा टर्न आल्यावर तो पेपर्स वाचू लागला. त्या वेळी शासकीय स्तरावर पर्यावरण संवर्धनाचा विषय खूप गाजत होता. या पार्श्वभूमीवर सुजीतने सुचविलेली झाडांची नावं नागराज याना खुपच अपिल झाली. पुण्यासारख्या उष्ण वातावरणातली ह्युमिडिटी मेंटेन करण्यासाठी ही सदाहरित झाडं लावणं गरजेचं आहे. हे रिझनिंग सगळ्याना भावलं. तसंच आऊट डेटेड कॉम्प्युटर सिस्टीम बदलून लॅपटॉपची केलेली मागणीही डायरेक्टर्सनी ॲप्रिशिएट केली. सिल्वराज यानी आपल्या अध्यक्षीय भाषणात, "वी हायली ॲप्रिशिएअट द सजेशन्स मेड बाय यंग प्रॉमिसिंग एच.ओ. डी." असे गौरवोद्गार काढले. मिटिंगनंतर नागराज यानी त्याला खास बाब म्हणून तीन इनक्रीमेंटस द्यायला सांगितली. आउटडेटेड कॉम्प्युटर सिस्टीम बदलून लॅपटॉप द्यायची सजेशन खरंतर कंपनी इंजिनिअर्सनी या पूर्वीच करायला हवी होती अशी नाराजीही व्यक्त केली.

सुजितने वाचलेला रिपोर्ट दिवेकरानी करून दिलेला असणार असं सोनी साहेबाना वाटलं होतं. पण दिवेकरानी यावेळी मात्र सुजित कडून हे बिंग फुटेल हे ओळखून स्वत: श्रेय न घेता अलिकडे सगळे रिपोर्टस दिलिप करून देतो त्यामुळे आपल्याला फार लक्ष द्यावं लागत नाही हे ही सांगून टाकलं. या प्रसंगानंतर महिनाभरात पर्चेसिंगचे फणसळकर जॉब सोडून गेले त्या पोस्टवर साहेबानी सुजितची वर्णी लावली. आता मोठं कुरण साहेबांच्या हातात आलं. या सेक्शनला रिपोर्ट वगैरे काहीच झंझट नव्हतं त्यामुळे दिलिप वरचं अवलंबित्व संपलं. अर्थात सुजितला पर्चेसिंगला अपलिफ्ट केल्यावर त्याजागी साहेबानी दिलिपला प्रमोट केलं. हा सेक्शन आपल्या अखत्यारीत आल्यावर दिलिपने जॉबचे फायनल डिझाईन्स मिळाल्यापासून तो संबंधित जॉब पूर्ण

होईतो सगळ्या प्रोसेसचा बारकाईने अभ्यास केला. या प्रोसेसमध्ये कोणत्या स्टेजवर लेबर कशी मखलाशी करतात त्याचं बारकाईने निरिक्षण केलं . ते टाळण्यासाठी लेबर लोकांशी चर्चा करून वर्क शेड्युल तयार केलं त्या प्रमाणे जॉब पूर्ण करणारांसाठी काही तरी इन्सेन्टिव्ह देण्याची आपण शिफारस करू असंही आमिष दाखवलं.

त्याची वर्क स्टॅटेजी लागू पडली नी प्रॉडक्शनचा रेट दहा टक्केपर्यंत वाढला. ही ग्रोथ इतर कोणाच्या लक्षात आली नाही तरी नागराज यांच्या नजरेतून सुटली नाही. त्यानी स्वत: मशिन ऑपरेटर म्हणून करियर सुरु करून सिल्वराजशी पार्टनरशीप मध्ये स्वत:चं स्वतंत्र प्रॉडक्शन युनिट करीपर्यंत मजल मारलेली असल्यामुळे या विश्वातली रॅट रेस ते ओळखून होते. म्हणून या परिवर्तनामागे नेमकी कोणाची वर्क स्ट्रॅटेजी आहे याचा सतर्कतेने मागोवा घेतला तेव्हा दिलिपचं नाव त्याना कळल. यापूर्वी वेगवेगळ्या तांत्रिक सुधारणा केल्या. ॲडव्हान्स टूल्स नी मशिनरी उपलब्ध करून दिली तरी प्रॉडक्शन रेट जैसे थे च... तो कधिच वाढला नव्हता . या वेळी पर्चेसिंग सेक्शन मध्ये रॉ मटेरियल आणि आयटम्समध्ये, रेट मध्ये थोडी ॲबनॉर्मल वाढ झालेली त्यानी मार्क केली. या सेक्शनला सुजित नव्याने आलेला असल्यामुळे सप्लायर्सनी स्ट्रॅटेजी बदलली असण्याची शक्यता अधिक होती.

पूर्वी रिलेशन्स जुळलेली माणसं बदलली की पूर्वी दिलेल्या ॲश्यूरिटिज मोडित काढून सप्लायर्स पॉलिसी बदलतात.पुढच्या सहा सात महिन्यात वाढलेला प्रॉडक्शन रेट स्टेबल राहिला. या दरम्याने नेहेमी प्रमाणे जनरल मिटींग लागली. या वेळी सोनी साहेब ॲलर्ट राहिले. त्यानी दिलिपला बोलावून त्याला

सजेशन रिपोर्ट आपल्याकडे प्रॉयर सँक्शन करून घ्यायला बजावले. त्यांच्या सूचनेप्रमाणे त्याने आपल्या रिपोर्टचा ड्राफ्ट तयार झाल्यावर सोनी साहेबांकडे सबमिट केला. आपल्या वर्क शेड्यूल मूळे प्रॉडक्शन रेट वाढून तो कसा स्टेबल झाला ते नमूद करून हा रेट आणखी वाढण्यासाठी अमेरिकेत वापरली जाणारी कॉम्प्युटराइज्ड अॅडव्हान्स मशिन उपलब्ध करून देण्याची सजेशन दिली होती. ड्राफ्ट वाचल्यावर सोनी साहेब तीन फूट उडाला... प्रॉडक्शन रेट वाढून तो स्टेबल झाला तरी ही बाब आपल्या नजरेतून कशी काय निसटली याचं त्यानाच कोडं पडलं. सध्या होणाऱ्या जॉबवर तीन स्टेज मध्ये प्रोसेसिंग व्हायचं. दिलिपने सुचवलेल्या कॉ म्प्युटराइज्ड मशिन मध्ये या तीन्ही प्रोसेस एकत्रितपणे हो ऊन असेंबल्ड जॉब दोन तासात मिळू शकला असता आणि एकच ऑपरेटर लागला असता. विद्यमान स्थितीत या प्रोसेसना चार ते पाच तास लागतात . शिवाय तीन मशिन्सवर तीन स्वतंत्र मशिन ऑपरेटर लागतात .

सोनी साहेबानी दिलिपचा ड्राफ्ट वाचल्यावर त्याला बोलावून त्याने रिफर केलेली सिस्टिम एक्सपेन्सिव्ह आहे नी यात लेबर कमी लागत असल्यामूळे युनियन प्रचंड विरोध करील असं सांगून बूच लावलं. दिलिपला डिझायनिंग सेक्शनला ट्रान्सफर करून आपल्या टीम मधल्या तिवारीला प्रॉडक्शनला टाकला. त्यावेळच्या जनरल मिटिंग मध्ये प्रॉडक्शन सेक्शनमध्ये खुद्द सोनी साहेब काही एक्सपरिमेंटस राबवीत असून त्याचे फ्रुटफुल आऊट कम्स मिळाल्यावर सोनी सरच मॅनेजमेंटशी डिस्कस करतील असं रिपोर्टिंग तिवारीने केलं. अर्थात या मीटिंग पूर्वीच दिलिपची उचलबांगडी झाल्यामुळे मिटींगमध्ये झालेल्या गोष्टींची खबर दिलिपला लागणे शक्यच नव्हते. आपण दिलेल्या ड्राफ्टमध्ये काहीही चूक नसताना मॅनेजिंग डायरेक्टरनी आपली

डिझायनिंगला उचलबांगडी कां केली असावी याचा दिलिपला काहीच अंदाज बांधता येईना. आपल्या वर्क स्ट्रॅटेजीमूळे प्रॉडक्शन रेट मध्ये झालेली ग्रोथ ओळखून त्याचं क्रेडिट दुसराच कुणी घेऊ पाहतोय इतपत अंदाज मात्र त्याने बांधला.

नवीन सेक्शन मध्ये मुरुगन, तिवारी, पाळ, चोपडा नी बाहेती पाच जणांची टीम होती. त्यात तिवारी ऐवजी दिलिप आला. या सेक्शनमध्ये सगळी प्रॉडक्शन्स रिक्वायरमेंट प्रमाणे डिझायनिंग केली जात नी हा सेक्शन सोनी सरांच्या अंडर काम करायचा. एका जॉबवर दोघे तिघे मिळून काम करीत. खरं तर या सेक्शनला पाच लोकांची गरज नव्हती . टीम मधले पाचही मेंबर्स टॉप एक्झिक्युटिव रॅंकचे असल्यामुळे गरजे प्रमाणे सेक्शन हेड म्हणूनही त्यांच्यावर जबाबदारी सोपविली जात असे.जी पाच सहा प्रॉडक्टस बनवली जात त्यांच डिझाईन ही टीम फायनल करत असे. हे काही तसं अवघड नव्हतं. पण इथली स्ट्रॅटेजी काम पुरवून पुरवून करण्याची होती. पहिल्या पाच सहा दिवसातच ही गोष्ट दिलिपच्या लक्षात आली. तो रिकाम टेकड्या फाका मारून जाम कंटाळलेला. आलेलं नवीन ड्रॉईंग त्याने एकट्यानेच करायला घेतलं. सोनी साहेबानी मुरुगनला बोलावून एक अर्जंट रिपोर्ट त्याच्याकडे बनवायला दिला.तो सहा महिन्यापूर्वीच कोईमतूरच्या ब्रॅन्चमधून ट्रान्सफर होऊन पुण्याला आलेला , नागराज साहेबांच्या मर्जीतला म्हणून सोनी साहेबांची त्याच्यावर मेहेरनजर असायची. खास कॉन्फिडेन्शल कामं सर त्याच्यावर सोपवीत. ते काम करीत असताना त्याला काहीतरी रेफरन्स अडला म्हणून त्याने दिलिपला विचारलं.त्याने मुरुगनच्या हातातले रेफरन्स बघितले नी त्याची कानशिलं गरम

झाली... तो त्याने रेकमेण्ड केलेला ड्राफ़्ट होता. त्याने मग मुरुगनकडे मन मोकळं केलं.

पुढच्या आठवडाभरात बऱ्याच उलथापालथी झाल्या. दिलिपने केलेल्या सजेशन्स त्याच्या ड्राफ्टसह सोनी साहेबानी हायजॅक केल्या होत्या. बोर्ड ऑफ डायरेक्टरनी प्लान मंजूर केला होता नी तो वर्क आऊट ही झाला होता. पाच मशिन्स बुक झाली होती. नवीन मशिन ऑपरेट करण्याचं दोन आठवड्यांचं ट्रेनिंग घेण्यासाठी साहेबांचा मेहुणा नी आहुजा याना अमेरिकेला पाठवण्यात आलं.त्यांच्या जागी तिवारीला प्रॉडक्शन कडे आणि दिलिपला पर्चेस कडे ट्रान्सफर करण्यात आलं. दिलिपकडे चार्ज आला त्याच दिवशी सेक्शनमध्ये हजर झाल्या झाल्या पर्चेसिंगचं कंपनीने आखून दिलेलं प्रोसिजर त्याने वाचून काढलं . लंच अवर झाल्यावर सुपरिटेण्डण्ट खन्ना साहेबांनी कॉन्टॅक्ट करून टेल्कोची खूप मोठी ऑर्डर मिळाल्याचं सांगितलं. त्यांच्या रिक्वायरमेंट प्रमाणे जे जॉब बनवायचे त्यासाठी लागणारं रॉ मटेरियल दोन तीन दिवसात पर्चेस करायला हवं, हे मटेरियल सप्लाय करणारी रिलाएबल पार्टी माझ्या माहितीची आहे, अशीही टीप त्यानी दिली. मटेरियलची डिमाण्ड नोटही तेवढ्यात आली.

दिलिपने पुन्हा एकदा कंपनी मॅन्युअल रेफर केलं.

डिपार्टमेंटच्या सिस्टीम मध्ये ऑर्डर हिस्टरी ओपन केली. टेल्कोच्या जॉब साठी जे रॉ मटेरियल लागणार होतं तशा प्रकारचं मटेरियल पुरवणारे तीन रेग्युलर सप्लायर्स सापडले. त्यांच्या जोडीला गुगलवर सर्च करून किर्लोस्कर, जे. के. मशिन टूल्स, कासवट हे तीन रेप्युटेड लोकल सप्लायर्स निवडले . सर्वांना

काँटॅक्ट करून रिक्वायरमेंटचे तपशील देवून टेंडर्स नी सँपल मागवली. एवढी मोठी ऑर्डर पदरात पाडून घेण्यासाठी सगळ्यानी काय काय ऑफर्स दिल्या. वाजवी दर आणि सँपलची क्वालिटी याचा विचार करूनच ऑर्डर मिळेल, आपल्याला एक रुपयाही कमिशन किंवा गिफ्ट नको असं निक्षून बजावलं. मात्र किर्लोस्कर कडूनअशी काही ऑफर आली नाहे. रेग्युलर सप्लायर्स नी पूर्वानुभव गृहित धरून रेट सांगितले. नवीन सप्लायर्सनी मात्र रागरंग रिनाऊण्ड कंपनीशी रिलेशन्स डेव्हलप व्हावी म्हणून वाजवी दर सांगितले . जुने आणि नवे सप्लायर्स यांच्या रेटमध्ये खूपच तफावत होती. दिलिपने सर्वांची सँपल्स कंपनीच्या क़्वालिटी कंट्रोलसेल कडे चेक करायला दिली. रेग्युलर पैकी एक नी तीन्ही नवीन सप्लायर्स ची सँपल क्वालिटी सेलने सर्टिफाय केली. दिलिपने नवीन सप्लायर्स पैकी किर्लोस्करआणि जे.के. यांचे रेट सेम होते म्हणून दोघाना ऑर्डर विभागून दिली. रेग्युलर सप्लायर्स चे लागेबांधे होते. ती एक चेनच होती. मोठी ऑर्डर असली की सुपरीटेंडण्ट खन्ना, हेड अकौंटंट बारगीर आणि असोशिएट मॅनेजर राव साहेब कुणीतरी पर्चेसिंग ऑफिसरशी संगनमत करून घपला करीत असत. कोणताही पर्चेसिंग ऑफिसर कंपनी मॅन्युअल न वाचताच अकौण्ट सेक्शनला किंवा डिमांड नोट देणाऱ्या सेललाच विचारी. मग ते लोक अमूक सप्लायर अमूक पर्सेण्ट कमिशन देतो, अशी टीप देत नी त्या सप्लायरशी आगावू संधान साधून कोणालाही कळू न देता हात धुवून घेत.

दिलिपने मॅन्युअलचा अभ्यास करून कोणाचाही सल्ला न घेता संबंधिताना सँक्शन ऑर्डर काढल्या. काऊंटर साईन साठी फोलिओ राव साहेबांकडे गेल्यावर त्यानी दिलिपला बोलावून घेतलं. एवढी मोठी ऑर्डर द्यायची तर कंपनी प्रोसिजर फॉलो करायला हवं. टेल्को सारख्या रिनाऊण्ड

क्लायण्टशी गाठ आहे. ते लोकं रॉ मटेरियलच्या क्वालिटी बद्दलही कीन असतात. उद्या क्वालिटीचं रिझन देवून त्यानी जॉब रिजेक्ट केला तर तुझ्यावर ब्लंट येईल अशी भीती दाखवली. दिलिपने अगदी शांतपणे कंपनी मॅन्युअलप्रमाणे प्रोसिजर सांगितलं. निवडलेल्या दोन्ही सप्लायर्सची हिस्टरी नी रेप्युटेशन चेक केल्याचंही बोलला. मग रेग्युलर सप्लायर्सना कां डावललं? असाही आक्षेप त्यानी घेतला. त्यांचे रेट जास्त आहेत नी त्याने आपल्याला कमिशनची ऑफर दिल्याचं तो बोलला. पण ती प्रत्येक सप्लायर ची ट्रेड पॉलिसीच असते, रिलेशन्स डेव्हलप करण्यासाठी अशा गिफ्ट देणं ही कॉमन फॅक्ट आहे, ही काही ब्राईब नव्हे. दोन्ही सप्लायर्सची सोनी सरांशीही रिलेशन्स आहेत. पहिजे तर मी त्याना बोलावून घेतो. त्याना रेट अॅडजस्ट करायला सांगूया. त्यानी अशी सजेशन केल्यावर अत्यंत विनम्रतेने तो म्हणाला, “सर, मी आणखी काही एक्स्प्लनेशन देऊ इच्छित नाही, तुमची सँक्शन नोट मी फॉलो करीन .” हा इंजिनीअर टॅलण्ट आणि स्ट्रेट फॉर्वर्ड ही आहे , हा कसाही बधणार नाही हे त्यानी ऑळखलं . प्रॉपर रेट ची ऑर्डर देवून हा इतरांचेही मार्ग बंद करू पहातोय... ये घाटी लोग साले ऐसेही स्टबर्न होते है ... इन्हे रास्तेसे हटानाही पडता है , असं मनोमन ठरवून, काऊंटर साईन करून फोलिओ त्याच्याकडे सरकवला.

फर्ममधल्या अडिजशे वर्कर्स साठी युनिफॉर्म्स, मशिन टूल्स, स्टेशनरी आणि पॅकिंग मटेरियल अशा मोठ्या रिक्वायर मेंटस् गेले पंधरा वीस दिवस पडून राहिलेल्या होत्या, त्यांचा कम्प्लायन्स त्याने करायला घेतला. अकरा वाजले आणि इंटर कॉमचा बझर वाजला. सुपरिटेण्डण्ट खन्नासरांचा कॉल होता. युनिफॉर्म्सची ऑर्डर लामोण्ड गार्मेंट यानाच द्यायला हवी, गेली दहा वर्ष

तेच युनिफॉर्म सप्लाय करतात आणि त्यांची सिल्वराज साहेबांशी रिलेशन्स आहेत. असा साहेबांचा निरोप सांगून नवीन सप्लायर्सना दिलेली ऑर्डर कॅन्सल करून ती लामोण्डला द्यायची गळ घातली. आपण वर्क प्रोसिजर प्रमाणे पर्चेस करू, रिलेशन्स जपण्यापेक्षा रेट आणि क्वालिटी महत्वाची आहे. म्हणूनच दिलेली ऑर्डरही कॅन्सल होणार नाही, सरानी लेखी ऑर्डर दिली तर आपण जरूर फॉलो करू असं दिलिपने उत्तर दिलं. “आय डोण्ट हॅव एनी ऑब्जेक्शन, यू आर फ्री तू टेक डिसिजन्स अॅज यू विश, आय् जस्ट कनव्हेड मेसेज ऑफ रेस्पेक्टेड एम. डी. सर.”असं सांगून त्यानी रिसीव्हर ठेवला. दिलिप बाहेर पडला तेंव्हा मुरुगन समोरच होता. दोघेही कॉफी प्यायला गेले. कॉफी पिताना त्याने ही गोष्ट मुरुगनला सांगितली. त्याने ही “ डोण्ट बॉदर , माय फ्रेण्ड. डोण्ट सरेण्डर बिफोर देम.” असाच सल्ला दिला. आपल्या शिरस्त्याप्रमाणे लामोण्ड गार्मेंट सोबत बिन्नी, रेमंड असे स्टॅण्डर्ड गार्मेण्ट सप्लायर्स आणि पुण्यातल्या नामांकित टेलरिंग फर्म्स शी कॉण्टॅक्ट करून ताबडतोब रेट नी सम्पल्स पाठवायला सांगितली. लामोण्डशी कॉन्टॅक्ट केल्यावर त्यांचा मॅनेजर म्हणाला , “आपण कोण बोलताय सर? मी गेली दहा वर्षं फर्मच्या युनिफॉम्सचं कॉण्ट्रॅक्ट घेतोय. सोनी सराना विचारा हवं तर... मेजर्स घ्यायला टीम कधी पाठवू तेवढं सांगा.” त्यावर“तुम्हाला कॉण्ट्रॅक्ट घ्यायचं असेल तर आज संध्याकाळ पर्यंत ग़ार्मेंट सॅंपल्स नी रेट पाठवा.” असं सांगून त्याने फोन कट केला.

लामोंड च्या मालकाने फर्ममध्ये फोन लावला, सोनी सर नाहीत हे कळल्यावर मात्र तासाभरातच गार्मेंटची सॅंपल्स नी रेट चार्ट पाठवून दिला.नवीन गार्मेण्ट सप्लायर्स नी टेलरिंग फर्म्सचे रिप्रेझेण्टिटिव्ह एक एक करून लेटर नी सॅम्पल घेवून समक्ष भेटून गेले. कारण अशा मोठ्या डिल मध्ये पर्सेण्टेज

बेसिसवर कमिशनची डिमाण्ड असते.मात्र या वेळचा अनुभव वेगळा होता. दिलिपशी बोलल्यावर आलेले एजंट मालकाला कॉल करून या गोष्टीची कल्पना देत नी मग रेट च्या फिगर्स टाकून पत्रं देत. त्याने प्रोसिजर प्रमाणे सॅम्पल्स क्वालिटी कंट्रोल सेलकडे दिली. मशिन टूल्स , स्टेशनरी आणि पॅकिंग मटेरियल यांचीही सॅम्पल्स आणि रेट मागवले. दुस-या दिवशी क्वालिटी कंट्रोल सेल कडून रिपोर्टस् आले. युनिफॉर्म्स ची टेण्डर्स गार्मेण्ट सप्लायर्स आणि टेलरिंग फर्मना स्वतंत्रपणे दिलेली असल्या मूळे लामोण्डचे रेट पर आयटम चारशे रुपयानी जादा होते.

त्याने दहा वर्षाची पर्चेस रेकॉर्ड पाहिली तर रेटमध्ये दर वर्षी वीस टक्के वाढ केलेली असे. गेली दोन तीन वर्ष तर त्यानी गार्मेण्टचा ब्रॅण्ड ही डिस्क्लोज केलेला नव्हता. या वेळी ही त्यानी गार्मेण्ट ऑफ स्टॅण्डर्ड ब्रॅण्ड असा मोघम उल्लेख केलेला होता. पूर्ण विचार करून दिलिपने रेमण्ड गार्मेण्ट सप्लायर आणि रायझिंग स्टार टेलरिंग फर्म सिलेक्ट करून त्याना ऑर्डर कन्फर्मेशन लेटर्स रवाना केली. चार दिवसानी साहेब आले आणि नवीन मशिन्स पण आली. जुनी मशिन्स काढून त्या जागी ही नवीन मशिन्स बसवायचं काम युद्धा पातळीवर सुरु होतं. साहेब त्या गडबडीत असतानाच टेलरिंग फर्मची टीम येवून युनिफॉर्म्सची मेजर्स घेवून गेली. पण पूर्वीच्या सप्लायर ऐवजी नवीन सप्लायरला कॉंट्रॅक्ट दिलेलं आहे ही बाब सोनी साहेबांपर्यंत पोचली नाही.

तिवारी प्रॉडक्शनला आला नी वर्कर्सचे परत ‘मागचे पाढे पंचावन्न’ सुरु झाले. तिवारी वर्कर्स काय करतात ते ढुंकूनही पहात नसे त्यामूळे ते ही पाट्या टाकायला लागले. ट्रेनिंगला गेलेली टीम परत आली. पाच निवडक वर्कर्सचं

ट्रेनिंग सुरु झालं. दहा बारा दिवसानी त्यानी जॉब बनवणं सुरु केलं. पूर्वी तीन मशिन्स वर फिरून जॉब बनायचा . तेव्हा जेवढा वेळ मोडे त्यात नवीन मशिन फारसा फरक पडला नाही. एकदा ड्रॉईंग फीड करून रॉ मटे रियल सेट केलं की जॉब पुरा होईतो फक्त लक्ष ठेवून राहिलं कि सगळ्या प्रोसेस प्रोग्रेमिंगप्रमाणे होत रहायच्च्या . पण लेबर मखलाशी करीत. मशिन सुरु ठेवून प्रोग्रॅमिंग पॉज घेत. त्यांच्यावर सुपरव्हिजन नव्हतं.महिनाभरात पूर्वी स्टेबल झालेला प्रॉडक्शन रेट आता आणखी खाली आला. टेक्निशियन्सचा हात बसला की प्रॉडक्शन वाढेल,नवीन मशिन्स बसविण्या साठी जुनी मशिन्स रिप्लेस केली त्याचा ही परिणाम होतोय असं समर्थन सोनी साहेब करीत राहिले.

कोईमतूरच्या हेड ब्रँचमध्ये संपूर्ण जुनी मशिनरी बदलून कॉम्प्युटरईज्ड युनिट बसवायचा मॅनेजमेंटचा डिसिजन झाला होता.मॉडिफिकेशन अर्थातच सोनी साहेबांच्या देखरेखी खाली करायचं होतं. मॅनेजमेंटने म्हणून त्याना कोईमतूरला बोलावून घेतलं. आता तो प्रोजेक्ट पूर्ण होईपर्यंत महिना दीड महिना सोनी साहेब तिथेच तळ ठोकून रहायचे होते. टेलरिंग फर्मने कॉन्ट्रॅक्ट कण्डिशन प्रमाणे वीस दिवसानी युनिफॉर्म चा पहिला लॉट डिस्पॅच केला.गार्मेण्ट आणि स्टिचींग दोन्ही ची क्वालिटी कसोशीने राखलेली असल्यामूळे कसलाही इश्श्यू झाला नाही. या महिन्यातही प्रॉडक्शनची परिस्थिती फारशी सुधारली नाहीच मॅन्युअल जॉब नी ॲटोमेटिक जॉब यात पाच दहा मिनिटं एवढा नगण्य फरक असायचा. प्रॉडक्शन रेट पंचवीस टक्के कमी झाला होता. पण सोनी साहेब ब्रँचमध्ये जॉईन होईपर्यंत या गोष्टीची कोणीच फिकिर करणार नव्हतं. कोईमतूरला युनिट बसवून झाली नी सी. एम. जयललितांच्या हस्ते उदघाटन

करायचं ठरलं... दरम्याने चार दिवस सवड होती म्हणून सोनीसर पुण्याला हजर झालेले.

सुपरिटेंडंट खन्ना साहेब आपल्या केबिनमध्ये पोहोचले. फोलिओ उघडून खन्ना साहेबांच्या सहीसाठी समोर ठेवल्यावर युनिफॉर्मची ऑर्डर लामोण्ड ऐवजी नवीन टेलरिंग फर्मला दिल्याची खबर त्यानी सराना दिली. तसेच दिलिपने सगळ्याच रेग्युलर सप्लायर्स ऐवजी नवीन सप्लायर्सना ऑर्डरी द्यायचा सपाटा कसा चालवलेला आहे याचीही तपशिलवार माहिती देवून सह्यांचा फोलिओ घेवून ते बाहेर पडले. सोनी सर चांगलेच गरम झालेले. युनिफॉर्मच्या ऑर्डरमध्ये १० ते १५ % सराना मिळायचे. मग त्यानी अकौटण्ट, असोशिएट डायरेक्टर याना बोलावून दीड दोन महिन्यातला पर्चेसिंगचा तपशिल पाहिला. योग्य प्रोसिजर फॉलो केल्यामूळे त्यात आक्षेप घेता येणारा नव्हता. पूर्वीच्या तुलनेत रेट ही कमी होते. केलेल्या खरेदीमध्ये दर्जाच्या बाबतही दोष द्यायचा तरी ते सिद्ध करणंही अवघडच होतं. मात्र हे असं चालू देणं म्हणजे सर्वांचेच मार्ग बंद करण्या सारखं होतं. कंपनी त वरच्या स्तरावरही या बाबींचा बभ्रा झाला असता. युनिफॉर्मची खरेदी तर कुणाच्याही चटकन लक्षात येणारी होती .

असला अस्तनीतला निखारा कधिना कधि संधी साधून विझवलाच पाहिजे याबद्दल दुमत नव्हतं. मात्र तशी संधी येईतो किमान युनिफॉर्मची पावती तरी वाढवून घ्यायला हवी नी त्यासाठी दिलिपलाच चुचकारून हाताशी धरायला हवा होता. मग सोनी सरानी दिलिपला बोलावून त्याला चांगला फायर केला. आपण योग्य निर्णय घेतले असून कंपनीचा आर्थिक फायदा कसा करून

दिला हे त्याने साधार पटवून द्यायचा प्रयत्न केला. युनिफॉर्म, स्टेशनरी मटेरियल यांच्या क्वालिटीबद्दल तक्रारी आहेत, तसेच काही जुन्या सप्लायर्सची मॅनेजमेण्टशी रिलेशन्स आहेत ही बाब त्याचं करियर धोक्यात आणू शकते असाही दम त्यानी भरला. तासाभरातच दिलिपने रिझायनिंग लेटर सबमिट केलं. तो स्वत: कटत होता हेएका अर्थी चांगलंच आहे असं सोनी सराना वाटलं. पण युनिफॉर्मची रिसिट मॅनेज केल्यानंतर . तो पर्यंत तो रहायलाच हवा होता . दिलिप गेला असता तरी ऑर्डर देवून झालेली होती नी एव्हिडन्स राहणारच होता. म्हणून त्यानी जोशीनी मध्यस्ती करून रिझाईन मागे घेवून त्या बदल्यात लो बजेट ऑर्डरची रिसिट दर वाढवून नव्याने घ्यावी, असा सौदा करायची गळ घातली .

दिलिपचं सगळं बोलणं ऐकल्यावर साहेबानी दिलेली ऑफर उच्चारायचीही जोशीना लाज वाटू लाग़ली. त्यानी नाईलाजाने सगळा विषय दिलिपला सांगितला. एवढ्या मोठ्या पदावर असलेल्या माणसाशी पंगा घेणं धोक्याचं आहे . इतपत सावधगिरीची सुचना देवून जोशीनी आवरतं घेतलं. “हे बघ , परिस्थिती वश प्रवाह पतित होणं भाग आहे. मात्र त्यासाठी वाम मार्गाचा अवलंब करणं हे ही अयोग्यच. मंजूर केलेली रिसिट रद्द करून जादा रक्कमेची रिसिट देणं म्हणजे आपल्याि विरूद्धचा पुरावाच आयता त्याना दिल्यासारखं आहे. त्यापेक्षा तू घेतलाहेस तोच निर्णय मला योग्य वाटतो. पण आत्ता हातची नोकरी गमावून कसं चालेल.” असं सांगून जोशीनी साहेबानी रिजेक्ट केलेलं रिझायनिंग लेटर त्याच्या कडे दिलं. “काका, तुम्ही काही काळजी करू नका. माझा वार वर्मी बसलेला आहे. इत:पर दैवाने साथ दिली तर चोराना अद्दल

घडेल ... मात्र प्राप्त परिस्थितीत माझा कंपनीतला शेर संपला एवढं नक्की. मी दुस-या जॉब च्या शोधात आहे.नशिबात असेल ते होईल. मी दिलेला राजिनामा आता परत घेणार नाही त्यामूळे कसली तडजोड करायचा प्रश्नच नाही ” असं सांगून दिलिप उठला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच आंघोळ वगैरे उरकून त्याने कात्रजला बहिणीचं बिऱ्हाड गाठलं. त्याचे मेव्हणे प्रमोदराव विप्रोमध्ये इंटर्नल ऑडिटर च्या पोस्टवर होते. चहापाणी झाल्यावर त्याने सगळी घटना मेव्हण्याना सांगितली. त्याने घेतलेला निर्णय योग्य आहे असं सांगून कुठे ना कुठे जॉब नक्की मिळेल, आता तीन वर्षांचा अनुभव गाठीला आहे, दोन तीन दिवस इथेच आराम कर, तुझा रिझ्यूम देऊन ठेव. संध्याकाळी बाहेर जेवायला जावूया.” असं सांगून ते ऑफिसला जायच्या तयारीला लागले . संध्याकाळी आल्यावर दिलिपला पुन्हा जॉब मिळेपर्यंत कॉट बेसिस्वर भाडं भरीत राहण्या पेक्षा आपल्या सोबतच रायची गळ घतली. अडिच महिने कालावधि लोटला. मात्र बहिणीने आणि प्रमोदरावानी या काळात त्याच्या श्रद्धा नी तत्वनिष्ठा यांच कौतुक करीत त्याचं मनोधैर्य शाबूत राखण्याचं महत्वाचं काम केलं. जॉब टिकवण्यासाठी भ्रष्टाचाऱ्यांबरोबर शेण खात न राहता तो बाहेर पडला याचा आपल्याला अभिमान आहे, असं ते कायम सांगायचे. अडीज महिन्यानंतर मात्र कोंडी फुटली. दोन तीन वर्षांपूर्वी हिंजवडीला सुरु झालेल्या एका फर्म मधून ऑफर आली. दिलिप एम.डी. ना समक्ष भेटायला गेला. कंपनी नव्याने सुरु झालेली तरीही सॅलरी पूर्वीपेक्षा पाच हजार अधिक मिळणार होती. दिलिपने होकार दिल्यावर चार दिवसानी अपॉइंटमेंट लेटर देतो असं एम.डी. म्हणाले.

दिलिप हवेत तरंगत घरी पोचला. प्रमोदरावांशी गप्पा सुरु असताना संध्याकाळी अकस्मात जोशी काकांचा कॉल आला.

काही महत्वाचं बोलण करण्यासाठी जोशीना त्याची समक्ष भेटच हवी होती. प्रमोदरावांना सोबत घेवूनच दिलिपने जोशींचं फेव्हरिट ठिकाण‘राजदीप बार’गाठलं. बसल्या बसल्या जोशी म्हणाले, “यावेळी खुद्द नागराज सरांची ऑफर मी देणार आहे.डील तुझ्या फायद्याचं आहे...तेंव्हा बील तू पेड करायला हरकत नाही. तुला मान्य नसेल तर मात्र बटालियन कॉण्ट्रिब्युशन करूया!” त्यावर “मला हिंजवडीला पूर्वीपेक्षा पाच हजार जादा सॅलरीवर ऑफर आहे, तेंव्हा आजची पार्टी माझ्यातर्फे” दिलिपने डिक्लेअर केलं आणि तिघेही खो खो हसू लागले. जोशी सरानी जे काही सांगितलं ते ऐकल्यावर दिलिपला फार आश्चर्य वाटलं.

सोनी साहेब, खन्ना, राव आणि बारगीर संगनमताने करप्शन करतात अशी इन्फर्मेशन मॅनेजमेण्टला मिळालेली होती. डिझायनिंगला हेड ऑफिस वरून पाठवलेला मुरुगन हा नागराज साहेबानी खास हस्तक पाठवलेला. फर्ममध्ये घडणाऱ्या घटनांवर बारकाईने लक्ष ठेवून त्याने मॅनेजमेण्ट कडे रिपोर्टिंग केलं. चार दिवसांपूर्वी अकस्मात मॅनेजिंग डायरेक्टर नागराज, टी. सिल्वराज, लिगल ॲडवायझर ॲडव्होकेट स्वामी आणि मेन ऑफिसचे इंटर्नल ऑडिटर केतन घाग अशी चौघांची टीम दाखल झाली.

पाच सहा महिन्यात घडलेल्या सगळ्या घटनांच फॅक्ट फायंडिंग करून झाल्यावर पुढे नेमकं काय घडलं हे तपशीलवार कोणालाच कळलं नाही. पण सोनी, खन्ना , राव, बारगीर आणि त्यांचे पित्त्ये तिवारी, पाळ, चोपडा, पांडे दोन

दिवसात रिझाईन करून कंपनी सोडून निघून गेले. असा धक्कादायक रिपोर्ट देऊन जोशी काका म्हणाले, “उद्या नागराज आणि सिल्वराज साहेबानी तुला भेटायला बोलावलेलं आहे. मला अचूक सांगता येणार नाही पण तुझ्यासाठी कंपनी काहीतरी खास ऑफर देणार हे नक्की. सोनी सरांची कृष्णकृत्यं उघडकिला आलियत नी तुला कंपनीत री-जॉईन करून घेणार आहेत . उद्या अकरा वाजता सरांची भेट घे.” जोशी काकानी दिलेली माहिती एवढी धक्कादायक होती की, दिलिप नी प्रमोदराव अक्षरश: सुन्न झाले.

दुसरे दिवशी प्रमोदरावाना सोबत घेऊनच दिलिप मॅनेजिंग डायरेक्टरना भेटला. दोघेही केबिनमध्ये गेल्यावर दिलिपने प्रमोदरावांची ओळख़ करून दिली. तिथे नागराज नी सिल्वराज दोघेच उपस्थित होते. सिल्वराज बोलू लागले, “अवर वी हॅव ग़ॉन थ्रू इन्सिडेण्टस विदिन द लास्ट सिक्स मंथ्स. युवर कॉण्ट्रिब्युशन ड्युरिंग दिस पिरियड इज रेण्डर्ड बाय मॅनेजमेण्ट. आय् हॅव मार्कड् दॅट, युवर वर्क स्ट्रॅटेजी वॉज इंप्रुव्हिंग अॅण्ड मेण्टेनिंग प्रॉपर प्रॉडक्टशन रेट. वी हॅव कम टू नो दॅट कॉम्प्युटराईज्ड मशिन सिस्टम टू वॉज युवर रेकमेंडेशन बट् दॅट वाज हायजॅक्ड बाय मिस्टर सोनी. बाय द बाय पर्चेसिंग मेड बाय यू इज द चिपेस्ट अॅण्ड स्टॅण्डर्ड. यु हॅव फॉलोड प्रोसिजर अस पर लेड डाऊन बाय द कंपनीज् मॅन्युअल. वी हॅव मार्कड् युवर ऑनेस्टी, सो वी कॉर्डिअली इन्व्हाईट यू टू रिजॉईन अवर फर्म राईट नाऊ

*************

## २. येरा गबाळ्याचे काम नोहे ...

आम्ही लास्ट इयरला असताना गोगटे कॉलेजमध्ये इंग्रजी प्रिन्सिपल ला विद्यार्थ्यांच्या संख्येचं रेकॉर्ड झालं. एरव्ही शिकस्तीने ६ ते ८ एवढीच मुलं असायची. पण आमच्या बॅचला चक्क १८स्टुडंटस् झाले. एस.य. ला २२ मुलं होती . पण टी.वाय. ला फक्त ९ जणानीच इंग्रजी प्रिन्सिपल घेतलं. मुंबई युनिवर्सिटीचे रिझल्ट फार कडक, जेमतेम निम्मीशिम्मी बॅच उद्धरायची. म्हणून बरीच मुलं इतिहास, सोशोलॉजी, मराठी, हिंदी हे विषय घेवून बी.ए. करीत. चिपळूण आणि सावंतवाडी ला इंग्रजी प्रिन्सिपलची सोय नव्हती म्हणून त्या कॉलेजमधली ७ मुलं गोगटे कॉलेजला आलेली. तसेच बी.अॅण्ड सी. मध्ये रायगडचे एक्झिक्युटीव इंजिनीअर नेवग़ी बदली होवून रत्नागिरीला आले त्यांची मुलगी कांचन ही नवीन अडमिशन झालेली. प्रा . दिक्षीत, प्रा. बोडस म्हणाले की," आमच्या आठवणीत प्रथमच इंग्रजी प्रिन्सिपलला १८ मुलं झाली आहेत." त्यामुळे नेहमीचा क्लास लहान पडायला लागला म्हणून इंग्लीशच्या बॅचला लायब्ररीत तळ मजल्या वरची रुम देण्यात आली. वर्ष मजेत पार पडलं. ७ ते १६मे दरम्याने अन्युअलचं टाईम टेबल लागलं. १६ ला शेवटचा पेपर सुरू असताना पेपर सुटण्यापूर्वी अर्धातास प्रा.बोडस एक्झाम हॉलमध्ये आले. सगळ्या मुलांची विचारपूस करीत माझ्याजवळ येवून ते म्हणाले, " देसाई, पेपर झाल्यावर स्टाफरूममध्ये येवून मला भेटून जा."

पेपर सुटला,रिलॅक्स मूडमध्ये चिपळूण सावंतवाडीच्या मुलांशी निरोपाच्या गप्पा मारल्यावर बोडससराना भेटायला मी स्टाफरूम मध्ये गेलो." पुढे काय करायचं ठरवलं आहेस? जर जॉब करणार असशील तर इथेच पटवर्धन हायस्कूलला इंग्लिशची पर्मनंट व्हेकन्सी आहे. तिथले मावळंकर जुनमध्ये रिटायर होणार आहेत, म्हणून हेडमास्तर जोग सर इं ग्लीशचा चांगला हॅण्ड शोधताहेत. मी त्याना तुझं नाव सुचवलं आहे. उद्या दहा- साडे दहाला त्यांना जावून भेट. तुला इथेच जॉब मिळाला तर एम.ए. रेग्युलर बॅचला अडमिशन घेवून एम. ए. कर. "मी हवेत तरंगतच रूमवर गेलो.मी ऑप्शनल संस्कृत घेतलेलं असल्यामुळे मला संस्कृत पाठशाळेत मोफत रहायला मिळालं होतं. लास्ट ईयरला मी संस्कृत ऐवजी इंग्रजी घेतलं असलं तरी पाठशाळेच्या संचालकानी मला रहायची परवानगी दिली होती. मी संध्याकाळी संचालकाना भेटायला गेलो. मला पटवर्धन हायस्कूल मध्ये जॉब मिळण्याची संधी असल्याचं त्याना बोललो. त्याना खूप आनंद झाला.

ते म्हणाले," तसं झालं तर मी तुम्हाला पाठशाळेतच व्यवस्थापकां साठी तीन खोल्यांची बिऱ्हाडाची जागा आहे ती देतो. तुम्ही तिथे रहा. पाठशाळेतल्या मुलांवर लक्ष ठेवा नी तिथलं व्यवस्थापन सांभाळा."मी दहा वाजता पटवर्धन हायस्कूलमध्ये जोग सराना भेटायला गेलो. केबिन बाहेर गोताड शिपायाने जोग सराना मी आल्याची वर्दी दिल्यावर सरानी मला लगेच आत बोलावून घेतलं. सरानी बसा म्हटलं तरी मला सरांसमोर खुर्चीत बसायचा धीर होईना."तुमच्या विनम्रतेची दखल घेतली मी. तुम्ही उभे किती वेळ रहाणार? बसा, मी मावळंकर सराना बोलावून घेतो. ते आले की, पुढच्या गोष्टी ठरवू." पाच मिनिटानी मावळंकर सर आले. जोग सरानी त्याना सग़ळा विषय सांगितला. दोघानीही

माझी फाईल बघितली. "तुमचं करियर चांगलं आहे. बोडस सरानी तुमची शिफारस केलेली आहे. पण आम्ही आधीच ठरवलेलं आहे. जो कॅण्डिडेट निवडायचा त्याची ५० गुणांची रिटन टेस्ट घ्यायची. तुमची तयारी असेल तर पहा." मी होकार दिला. सरानी मला प्रश्न पत्रिका आणि उत्तरं लिहायला कोरे पेपर्स दिले. सरांच्या केबिन मध्ये कोपऱ्यातल्या टेबलवर बसून मी पेपर सोडवायला घेतला.

पहिल्या प्रश्नात सिंथेसिस, ट्रान्सफॉर्मेशन आणि डायरेक्ट इन डायरेक्ट वर आधारित ३० उपप्रश्न होते. दुसरा प्रश्न होता भाषांतराचा. त्यात मराठी पेपर मधलं कात्रण दिलेलं होतं नी तिसरा प्रश्न निबंध लेखनाचा. त्यात इफ आय् वेअर अ बर्ड किंवा माय फेव्हरिट नॅशनल लीडर यापैकी एका विषयावर२५ओळी लिहायच्या होत्या. मी पाऊण तासात पेपर लिहून हातावेगळा केला. दरम्याने चहा बिस्किटे आली. आम्ही चहा घेईतो मावळंकर सरानी माझा पेपर तपासून जोग सरांकडे दिला. सरानी पेपरवर नजर टाकली नी म्हणाले, " अभिनंदन, तुम्ही ११ जून पासून आमच्याकडे हजर व्हा." मी अतिशय नम्रतेने सराना म्हणालो. " सर मला माझा पेपर पहायला मिळेल का? " सरानी पेपर दिला. पहिल्या प्रश्नातली सगळी उत्तरं बरोबर होती. भाषांतराच्या उत्तरात तीन शब्द अधोरेख़ित केलेले होते नी निबंधातही दोन स्पेलींग चुकली त्याना सर्कल मार्क केलेला होता, मार्क मात्र दिलेले नव्हते. मी प्रश्नचिन्हांकित चेहरा करून मावळंकर सरांकडे पहात म्हणालो, " सर गडबडीत दोन शब्दांची स्पेलिंग चुकली. पण बरोबर स्पेलिंग्ज मी सांगू शकेन." हसत हसत सर म्हणाले," मी ओळखलं ते. भाषांतरात अधोरेखित आहेत ती वाक्यं माझ्या दृष्टिने वेगळ्या प्रकारे भाषांतर करता येतील. अर्थात तुम्ही केलेलं भाषांतर चूक

आहे असं नव्हे. निबंध आणि भाषांतर ही प्रत्येकाची स्वतंत्र अभिव्यक्ती असते. त्यात मत मतांतर होवू शकतं म्हणून मी त्या उत्तराना गुणदान केलेलं नाही. पण तुम्ही सगळी उत्तरं बिनचूक दिलेली आहेत. आता १४ जुनला हजर व्हायला या. दरम्याने तुमचं अप्लिकेशन बाय पोस्ट पाठवून द्या." घरी ही गोष्ट कळल्यावर आई भाऊना आनंद झाला. एका नामांकित शाळेत मला नोकरी मिळाली होती.

वर्षभराने माझ्या मागची बहिण सुमन एस.एस.सी. झाल्यावर तीला गोगटे कॉलेजमध्ये सायन्स साईडला घालता येईल. मला पाठशाळेत बिऱ्हाडाची जागा असल्यामुळे दोघांचीही रहाण्याची चिंता मिटलेली होती. महिनाभर आनंदात गेला.५ जुनला रत्नागिरीहून माझा मित्र आचरेकर याची तार आली. बी.ए.चे रिझल्ट लागले , मी फर्स्ट क्लास मिळवून पास झालो असा मजकूर होता. मार्क लिस्ट घ्यायच नी जोग सराना ही भेटून यायचं असं ठरवून दोन दिवसानी मी रत्नगिरीला गेलो. दीड वाजता सिटी पोस्टा जवळ उतरून मी कॉलेजचं ऑफिस गाठलं. जोशी हेडक्लार्क लंच बॉक्स उघडून पोळी भाजी खात होते." देसाई, तू बॅचमध्ये फर्स्ट आहेस. मुलींमध्ये चिपळूणची नंदा खरे फर्स्ट आहे पण आठ मार्क कमी पडल्यामुळे तिला सेकंड क्लास मिळाला. बॅच मधले पटवर्धन, सोहोनी हे मुलग़े नी दीपा पिंगळे, कांचन नेवगी या मुलीना थर्ड क्लास मिळाला. चौघाना केटी लागली. सात लोकांचे ३/४ पेपर्स गेले." जोशीना रिझल्ट तोडपाठ होता. जेवण झाल्यावर त्याना घरून नेलेल्या आंबा वड्यांची पुडी देवून मी त्याना नमस्कार केला. मार्कलिस्ट घेतल्यावर सिव्हिल हॉस्पिटल च्या आवारातलं कॅन्टिन गाठलं. मिसळ, कांदा भजी नी चार पाव

असा भरपेट नाष्टा करून फुल्ल कप चहा मारून मी पटवर्धन हायस्कूलच्या दिशेने निघालो.

उन्हाळी सुटी सुरू असल्याने जोग सर दीड वाजता घरी गेलेले होते. गोवेकर क्लार्कनी मला आत बोलावून घेतलं. माझा विषय त्याना माहिती होता. त्या संदर्भात त्यानी जी माहिती सांगितली ती ऐकल्यावर माझ्या पायाखालची वाळूच सरकली. २५ मे रोजी शिक्षणाधिकारी माने साहेबानी जोग सराना बोलावून घेतलं. एक्झिक्युटीव इंजिनीअर नेवग़ींची मुलगी कांचन हिला मावळंकर सर रिटायर झाल्यावर त्यांच्या जागेवर नेमून घ्यायला सांगितले. सी.ई.ओ. साहेबानी आपल्याला तसे निक्षून सांगितले आहे असे ते बोलले. सराना हो म्हणण्या वाचून ईलाजच नव्हता. चार दिवसानी माने सरांचे पत्र घेवून कांचन नेवगी जोग सराना भेटली. सरानी तिलाही ५० मार्कांची प्रश्नपत्रिका दिली. सर कंपाऊंडचे काम चालले होते ते पहायला गेल्यावर कांचन उठली, तीने प्रश्नपत्रिका न सोडवता सगळे कागद ऑफ़िस मध्ये जमा करून सराना न सांगता ती परभारे निघून गेली.

संध्याकाळी शिक्षणाधिकारी मानेना सोबत घेवूनच नेवगी साहेब सराना भेटायला आले. अकस्मातपणे प्रश्न पत्रिका समोर आल्यावर मुलगी घाबरून रडत घरी आली. असे नेवगी साहेब बोलले, "मुलगी लहान आहे, जरा सांभाळून घ्या. ती शार्प आहे." अशी रदबदली माने साहेबानी केली. सगळे ऐकून मी अवाक् झालो. मी नको म्हणत नसतानाही गोवेकर मला सरांच्या बिऱ्हाडी घेवून गेले. माझ्या पाठीवर थोपटीत सर म्हणाले," आमची संस्था खंबीर आहे , पण शिक्षणाधिकाऱ्यांशी वैर परवडणारे नाही. १२ जून रोजी

जिल्ह्यातल्या मुख्याध्यापकांची मिटींग आहे. मी कुणा ना कुणाकडे तुमच्यासाठी शब्द टाकतो . तुम्ही निश्चिंत रहा. तुम्हाला नोकरी द्यायची जबाबदारी माझी."सरानी आपला शब्द खरा केला.११जुनला गिरावळ हायस्कूलचा शिपाई संभू खवळे हेडमास्तर फडके सरांची चिट्ठी घेवून आमच्या घरी कालवीला आला. जोग सरांचा संदर्भ देवून त्यानी मला हजर व्हायच्या तयारीनेच बोलावले होते.

मुणगे आडबंदर दरम्याने दर्याच्या किनारी गिरावळ आणि गादव तर्फ़ ही गावं होती. गावं मोठी... पाचवी ते दहावी दोन दोन तुकड्या असलेलं साडेचारशे पट आणि अठरा शिक्षक असलेलं मोठं हायस्कूल... फक्त एकच अडचण होती. गावच्या एका अंगाला खाडी, भरतीच्या वेळी संपर्क तुटायचा. आडबंदरहून तरीने जायची सोय होती पण दीड तास चालावं लागे. माझ्या नलू मावशीची नणंद भटवाडीत जोशांकडे दिलेली आहे असं आई म्हणाली. संभू आला त्या दिवशी शुक्रवार होता. आम्ही सोमवारी जायचा बेत नक्की केला. देवगडहून सकाळी सात वाजता , दहा वाजता आणि संध्याकाळी तीन वाजता आडबंदर आचरापार गाड्या सुटायच्या.

आम्ही दहाच्या गाडीने निघून गिरावळ फाट्यावर उतरायचं असं ठरलं. संभू आम्हाला न्यायला यायचा होता. दहाची गाडी कायम उशिरा साडेअकरा बारा पर्यंत सुटते अशी मौलिक माहिती संभूने दिली. भाऊंची तब्बेत बरी नव्हती म्हणून शेजारच्या आबा काकाना घेवून मी सोमवारी गिरावळला जायला बाहेर पडलो. बरोब्बर दहा वाजता आम्ही 'घाडणीच पाणी' स्टॉप गाठला. अडीज तासांच्या तिष्ठंती नंतर एकदाची गाडी आली. सोबत पानग्या नी लसणीची

चटणी घेतलेली होती. मिठबाव तिठ्ठ्यावर बरीच लोकं उतरली. निम्मी गाडी रिकामी झाली. आम्ही दोघानी दोन विंडो पकडून एकेक पानग़ी नी चटणी खाल्ली. नारिंग्र्यात पाटलाच्या हॉटेलजवळ गाडी थांबवून ड्रायव्हर कंडक्टर जेवायला गेले.

आम्हीही चहा घेतला. त्यानंतर हिंदळं - मुणगं करीत गाडी आडबंदर रोडला वळली. वीसेक मिनिटात आमचा स्टॉप आला. ठरल्या प्रमाणे संभू न्यायला आलेला होता. आम्हाला पलिकडे न्यायला बिन उंडलीची छोटी होडी आणलेली होती. आमच्या बरोबर उतरलेल्या लोकांपैकी तीन बापयानी कपडे काढून पिशवीत भरले नी फक्त अर्ध्या चड्डीवर ते तरीत उतरून चालायला लागले. बाया माणसं सुकती लागायची वाट पहात थांबली. संभूने आमच्या पिशव्या होडीत ठेवल्यानी मागोमाग आम्ही होडीत चढलो. संभू होडीला बांधलेली रशी धरून चालत निघाला. फुल्ल सवारी होती पण कुठेच कमरभरहून जादा पाणी नव्हते. काठाकाठाने पंधरा मिनीटे चालल्यावर होडी पैलतडीला जायला लागली. थोडे अंतर गेल्यावर ऐन मध्यात छातीभर उंच पाणी झाले . मग काठाकडे जाताना पुन्हा पाणी कमी कमी होत कमरभर राहिले. संभू म्हणाला " पावसाळ्यात हऊर येतो त्या वेळी ग़ळयाअगळ उंच पाणी असते. पुऱ्या पावसाळ्यात असे चारपाच दिवस सोडले तर वर्षभरात कधीच कमरेपेक्षा जादा पाणी होत नाही. नवख़ा माणूस खाडी बघून घाबरतो. हां एक मात्र खरे की पूर्ण पाण्यातून अर्ध्या तासाची चाल आहे." आम्ही फडके सरांच्या बिऱ्हाडी पोचलो. आम्ही पाय धुवी पर्यंत पानं वाढून तयार होती. आम्ही जेवलो नी शाळेत गेलो. सड्याच्या माथावळीला गिरावळ नी गादववाडी यांच्या

मध्यावर शाळेची भव्य इमारत बांधलेली होती. थोडसं टेकाड चढून गेल्यावर शाळे समोरची कमान दिसू लागली.

दहा मिनिटं चाल मारल्यावर श्री गिरिमादेवी माध्यमिक विद्यालय गिरावळ ही अक्षरं दिसू लागली. शाळेची भव्य इमारत नी सभोवतीचं विस्तीर्ण पटांगण बघून मला भलताच हुरूप आला. सरानी आमचं हसून स्वागत केलं. कसलीही औपचारिकता न ठेवता फडके सर म्हणाले, " गाव थोडं आडवळणी, एकवशी आहे पण इथे तुम्हाला कसलीच कमतरता भासणार नाही. हापूस आंबा कलमं आणि मच्छिमारी हे इथले मुख्या उद्योग आहेत. बहुजन समाज सधन आणि गुणग्राहक आहे. तुम्ही मन लावून काम केलत तर त्याचं चीज इथे होईल. जोग सरानी तुमच्याबद्दल ग्वाही दिलेली आहे. मी त्यापेक्षा अधिक काही विचारणार नाही. तुम्हाला शाळा नी गाव आवडला का? इथे काम करायची तुमची तयारी आहे का? एवढं सांगा. आजच नव्हे, चार दिवस राहून सवडीने सांगितलंत तरी चालेल. तूर्त तुमचा अर्ज तेवढा लिहून द्या. तुमचा निर्णय झाला तर तुम्हाला अपॉईंटमेंट लेटर देऊन हजर करून घेईन. तुम्ही बी.एड. नसल्यामुळे तुम्हाला ईयर टू ईयर नेमणूक दिली जाईल . पण तुमच्या सेवेत खंड पडणार नाही. हा माझा शब्द आहे." मी झटपट अर्ज लिहून दिला नी माझा निर्णयही सांगून टाकला. दुसरे दिवशी आबाकाका निघून गेले. नलू मावशीच्या नणंदेच घर शाळेपासून लांब गादव वाडीत असल्यामुळे शाळेलगत राणे वाडीत जीजी राणेंच्या दुकाना शेजारच्या गाल्यात सरानी माझ्या बिऱ्हाडाची व्यवस्था केली होती .

जीजी राणेंच मोठं कुटुंब. ते सात भाऊ टोलेजंग चौसोपी वाड्यात एकत्र रहायचे. वाड्यापासून पाच मिनिटांच्या अंतरावर त्यानी धंद्यासाठी पाचखणी वखार बांधलेली. त्यात एका बाजूच्या तीन खोल्या मला दिलेल्या. अत्याधुनिक सोईनी सुसज्ज अशी ती इमारत होती. पुढे पन्नास फूट लांब भव्य व्हारांडा. त्या लगत तीन तीन खोल्यांचे पाच गाळे. एका गाळयात त्यांच किराणा मालाचं दुकान. एका गाळयात जीजींची उठबस असायची. दोन गाळे आंबा सिझनला उघडे असत नी एका गाळयात दुकानचं सामान असे. माझ्या खोली समोर मोठा झोपाळा होता. मी खोलीत आलो की माझा बराचसा वेळ झोपाळयावर जायचा.

सुरुवातीला चार दिवस मी हाती जेवण करून खाई. पण माझी धावपळ पहाता जीजी राणेंच्या पत्नी त्याना सगळेजण "मोठ्या आई" म्हणत, मला बोलावून घेतलं. मी फडके सरांबरोबर भेटायला गेलो. मोठ्या आई म्हणाल्या, " आमचं मोठं कुटुंब. इथे गावात आम्ही चार जावा आहोत. आम्ही मासे मटण खात असलो तरी आमचं ते रांधप वेगळं असतं. आमच्यापैकी कुणीतरी सराना शुद्ध शाकाहारी जेवण रांधून घालू. आमच्या जावेची मुलगी नंदा नी माझा मुलगा सतीश दोन्ही मुलं शुद्ध शाकाहारी आहेत. त्याना अगदी अंडंसुद्धा चालत नाही. तेव्हा सरांसाठी आम्हाला वेगळं काली करायला नको आहे. सकाळी त्याना खोलीवर नाष्टा पाठवू नी दुपारी शाळेत जेवणाचा डबा पाठवू. रात्री आठ वाजता शाळकरी मुलांबरोबर सर वाड्यावर जेवायला आले तरी चालेल किंवा त्याना रात्रीचाही डबा भरून पाठवू. त्यांना हाती करून जेवायचा त्रास नको , असा जीजींचा हुकूम आहे."

आठवडा भराने जीजी राणेंच्या घरातली पाचवी ते दहावी त शिकणारी सहा मुलं संध्याकाळी अभ्यासाला माझ्याकडे यायला लागली. सातवी पर्यंतची मुलं त्यांचा गृहपाठ पुरा करीत. मोठ्या आठवी नी दहावी च्या मुलाना मी एक दिवस आड इंग्रजी व्याकरण शिकवी. तिन्ही सांजेला खोलीतल्या गणपती लक्ष्मी सरस्वतीच्या तसबीरी समोर दिवा अगरबत्ती करून मी रामरक्षा म्हणायचो. एक दिवशी मुलानाही रामरक्षा शिकवावी असं मनात आलं नी मी त्याना रामरक्षा शिकवायला सुरुवात केली. सुरुवातीला मी त्याना एकेक श्लोक शिकवी. पण आठवडाभरात मुलं माझ्या सोबत बिनचूक म्हणायला लागली. दहा दिवसात सगळ्याना तोंड पाठ म्हणता येवू लागलं. रोज दिवे लागणीच्या वेळेला आम्ही खड्यासुरात रामरक्षा म्हणायला लागलो की, दुकानात गिऱ्हाईकांचा कालवाही कमी होई. जीजी राणेनी या गोष्टीची नोंद घेतली होती. नी एके दिवशी आम्ही म्हणणं सुरु केल्यावर राणेंच्या घरातली झाडून सगळी बायका पुरुष मंडळी माझ्या खोलीत आमच्या मागे येवून उभी राहिली. आमचं म्हणून झाल्यावर रोजच्या प्रघाता प्रमाणे मोठ्या मुलाने सर्वांना अंगारा लावला.

मग जीजी समक्ष पुढे येवून त्यानी मला नमस्कार केला. मी ओशाळून मागे होवू लागताच जीजी म्हणाले, सर तुम्ही ब्राह्मण अहात. तुम्ही जे संस्कार आमच्या मुलावर करीत अहात त्यामुळे तर आम्हाला फार आदर वाटतो. मग सगळ्याच माणसानी मला अक्षरश: पायावर डोकं ठेवून नमस्कार केला. दोन सतरंज्या अंथरून सर्वांना बसायला सांगितलं. भाई काकांची मुलगी नंदा दहावीत जाणारी, जाणती तिला दुकानातून पाच सहा बिस्किट पुडे नी किलोभर फरसाण आणायला सांगितलं. मोठ्या आईंकडे वळून म्हणलो, "आई , तुम्ही सगळी मंडळी यानिमित्ताने माझ्या खोलीवर आलात. सर्वांनी फरसाण, बिस्किटं

घ्या. तुम्ही सर्वांसाठी चहा करा." मुलाना सांगावही लागलं नाही. नंदाने आतली दोन ताटं आणून त्यात फरसाण घालून एक पुरुष मंडळीना नी दुसरं महिला वर्गा पुढे ठेवलं. सगळ्यानी फरसाण बिस्किटं खाल्ली. चहा घेतला. मग मी कुंकवाची कुयरी मोठ्या आईंकडे दिली."तुम्ही सगळी वडिल धारी मंडळी अहात, तुम्ही आम्हाला मोठं प्रोत्साहन दिलत. कृतज्ञता भावनेने मी तुम्हाला नमस्कार करतो सर्वानी भरभरून आशिर्वाद द्या."

माझ्यासह सगळ्या मुलानी वडिलधाऱ्या माणसाना नमस्कार केला नी खोली बंद करून आम्ही रोजच्याप्रमाणे जेवायला वाड्याकडे निघालो. चार दिवसानी मोठ्या आई मला म्हणाल्या," ही मुलं सकाळी आंघोळ झाल्यावर देवाचं म्हणतात. ते ऐकून आम्हा बायकाना लाज वाटायला लागली आहे. सर्वांतर्फे आमची एक विनंती आहे. तुम्ही आम्हाला पण कायतरी शिकवा." दुसरे दिवसापासून रात्री जेवायला गेल्यावर मी गणपती स्तोत्र आणि भवानी अष्टक शिकवणं सुरु केलं. मुलाना एकेक करीत मारुती स्तोत्र, नवग्रह स्तोत्र, गणेश पंचरत्न स्तोत्र , गणपती अथर्व शीर्ष शिकवलं. रोज दिवे लागणीच्या वेळी अदलून बदलून एक स्तोत्र म्हणायचा प्रघात सुरू झाला. जीजीनी ही गोष्ट मुंबईतल्या भावानाही कळवली. दीड महिन्याने मी फडके सराना घेवून जीजींकडे भाडं नी खानावळीचा विषय काढला. त्यावर जीजी सराना म्हणाले," भाडं म्हणाल तर सर रोज आमच्या सहा पोराना दोन दोन तास शिकवतात. त्याचीच परतफेड आम्ही करणं लागतो. त्याही पेक्षा आमच्या मुलांवर सर जे संस्कार करताहेत ते ऋण तर पैशात फिटणारं नाही. आमच्या घरात देवाधर्माचं व्हायला लागलं ते सरांमुळे . जेवणाचं म्हणाल तर तो विषय माझा नाही. ते तुम्ही मोठ्या आईला विचारा नी काय ते तिच्याकडेच पुरं करा."

रात्री जेवताना मी मोठ्या आईना बोललो त्यावर त्या म्हणाल्या," तुमच्यामुळे आम्हाला रोज ब्राह्मण जेवायला घालायचं पुण्य मिळतं आहे. तुमच्यामुळे आमच्या घराला घरपण आलं. देवाचं नाव घेतलं जातं. त्याची किंमत कशी करणार? उद्या तुमचं लग्नकार्य झाल्यावर तुम्ही वाड्यावर थोडेच जेवायला येणार? दोन तीन वर्षाचा तर प्रश्न आहे. " आई भाऊनी मला ग्राम देवता गिरिमा देवीला खण नारळ ठेवून दर्शन घ्यायला सांगितलेलं होतं.

तीन दिवसानी रविवारी देवीच्या देवळात जावून यायचा बेत मी केला. सोबत जीजींच्या सतिशला न्यायचं ठरवलं. शुक्रवारी नववीतल्या प्रमोद पाध्येने वडिलांची- बाबा पाध्येंची चिठ्ठी दिली.पाध्ये कुटूंबीयांविषयी मी जीजींकडून ऐकून होतो.तेही पाच भावांचं मोठं कुटुंब. त्यांच्यातले बंडू मास्तर यानी पन्नास साठ गाई बाळगलेल्या. गाई कायम मोकळया असायच्या. फक्त लहान वासराना गोठ्यात बंदिस्त ठेवीत . पण इतर गाई नी बैल याना कधीच दाव्याने बांधित नसत. ते गाय गुरांचा विक्रा करीत नसत. गरजूना गाय , बैल ,पाडे फुकट देत. अट एकच. नेलेलं जनावर कसायाला विकायचं नाही. नेणाराला ते नकोसं झालं तर परत आणून सोडायचं. गुराना रात्री एका गोठणीत कोंडून ठेवीत. गिरिमा देवीला जाताना वाटेत बंडू मास्तरांची गोठण लागे, ती पंचक्रोशीत प्रसिद्ध होती. बाबा पाध्यानी मला रविवारी जेवायला बोलावलं होतं. रविवारी मला न्यायला प्रमोद यायचा होता.

ठरल्या प्रमाणे सकाळी साडे आठ वाजता प्रमोद आला. मी तयारच होतो. दहा मिनिटात आम्ही बाहेर पडलो. देवीची पूजा पाध्यांकडेच असल्याने आधी त्यांच्या घरी जावून मग देवळात जायचे असे प्रमोद बोलला. पाध्यांकडे

जायला अर्धा तास लागला. पाध्यांचे राजांगण असलेले चौसोपी घर बघून मी हरखूनच गेलो. आम्हाला पाहताच बाबा आणि बंडू मास्तर स्वागताला पुढे आले. अंगणात एका बाजूला पाटाचे पाणी नी त्याखाली चिऱ्याची दोण होती. आम्ही हात पाय धुवून ओसरीवर गेलो. प्रमोदची आई गुळ पाणी घेवून आली. माणसं प्रेमळ नी बोलकी.पाचच मिनिटात माझा संकोच पळून गेला. पोहे फोडणीचे की दडपे अशी पृच्छा केल्यावर मी दडप्या पोह्यांची फर्माईश केली. पंधरा मिनीटात भरपूर खोबरं घातलेले पोहे आले. सोबत शहाळयाच्या साईचा भला मोठा तुकडा नी स्टीलच्या लोट्यात साध्या पाण्याऐवजी शहाळयाचं पाणी आलं.

थोडा वेळ गप्पा झाल्या. बंडू मास्तर उमेदवारीच्या काळात आरंभीची पाच वर्षं कालवीला होते. ते शाळेलगत भिड्यांकडे रहायला होते. आमच्या कडे चार पाच वेळा समाराधनेला भट म्हणून आलेले. पोहे झाल्यावर बाबा पाध्येंबरोबर मी देवळात निघालो. त्यांच्या मागिलदाराहून घाटी चढून वर गेल्यानंतर दोन तीन घडघड्या धोंड्यांची कोंढाळी नी दोन गवताने शाकारलेले मोठे मांगर दिसायला लागले. एक कोंढाळं आटपसूर , त्यात भातयाण आणी करड गवताच्या गंजी होत्या. दुसरं कोंढाळं खूपच ऐसपैस होतं. तीच बंडू मास्तरांची प्रसिद्ध गोठण. सोळा वाव व्यास असलेल्या त्या गोठणी भोवती पाच हात उंचीचा मोठ्या अनगळ धोंड्याचा भक्कम गडगा होता. आत जायला दोन हात रुंद बेळं होतं, नी ते बंद करायला शिरडीची गच्च तटकी होती.

तिन्हीसांजेला दूध काढून झाल्यावर गुराना आत कोंडून तटकी लावून घेत. सकाळी दोन गडी नी घरचा कोणीतरी वर येवून गाईना बाहेर काढी. दुभत्या

गाईंची दुधं काढून वासरं लुचल्यावर त्याना मांगरात घालीत. व्यायला झालेल्या गायी आणि आजारी गुरं रातीवळयाला वासरांच्या मांगरात बाजुच्या पडवीत बंदिस्त ठेवीत. जवळ जवळ वीस पंचवीस दुभत्या गाई होत्या. त्यांची एक पाखल पिळीत नी बाकी दुध वासराना ठेवीत. दुसऱ्या मांगरात पेंड पोती, भाताचे मुडे असत. आम्ही गेलो तेंव्हा गाईना पेंड घालायची वेळ झालेली होती. सगळया गाई. पाडे मधल्या मांगरा भोवती जमलेले होते. सगळी जनावरं चांगली गुडगुडीत नी तल्लख दिसत होती. पांढऱ्या, काळया, ढवळया, तांबूस नी कसऱ्या, कबऱ्या रंगाची ती गायरं दशक्रोशीत कां प्रसिद्ध होती ते त्याना बघितल्यावर मला कळलं. गड्यानी दोन पेंड पोती बाहेर आणून कातळात मारलेल्या चार आंगळं खोल चरीत ओतली जाई. उन्हाळी सिझनला दुपारी गवताच्या गोठणी बाहेर भातयाण - करड गवत टाकीत ते खावून गायरं आजू बाजुला हापूस कलमं, रायवळ आंबे, ऐन - धामण- हसाणी च्या झाडांखाली रवंथ करीत बसत. गोठणी जवळ आणि मधल्या मरडात असे दोन ठिकाणी दोन प्रचंड मोठे वड होते. चाळीस एकरांच्या त्या बंदिस्त प्लॉट मध्ये गायरं मोकळेपणी फिरत असायची . त्याच प्लॉट मध्ये पायथ्याला पाध्यांचा चौसोपी वाडा होता.

गिरिमादेवीच्या देवळाजवळून वहाणाऱ्या बारमाही व्हाळापासून दोन हात रुंद, हात भर खोल पाटातून चोवीस तास पाणी यायचं. गुराना पाणी पिण्यासाठी पाटाकडेला तीन चार ठिकाणी दोन हात औरस चौरस नी वीत भर उंच पाषाणी दोणी बसवलेल्या होत्या. तो पाट पार खाली वाड्याच्या मागे पर्यंत गेलेला होता. संपूर्ण पाट चिऱ्याच्या धडीव वळीवानी बांधलेला होता. घराखाली मळयात शंभर माड, दीडशे पोफळी, केळी नी चार भांग्यात ऊस

लावलेला असे. केळीची पाने, उसाची पात, वाड्याच्या मागील बाजूला नेवून टाकीत ती खायला सकाळी गायरं खाली उतरत असत. गोठणी जवळून पुढे हाकेच्या अंतरावर गिरिमा देवीचे भव्य मंदिर होते. मंदिराला तीन गोपूरं होती. मधल्या गोपूराखाली गिरिमा देवीचा गाभारा होता.

गाभाऱ्याच्या एका बाजूला छोटा नंदी नी समोर काळवत्री शंकराची पिंडी होती.मंदिरात प्रवेश केल्यावर लांब रुंद ऐस पैस सभागृह, दोन बाजूना वीस हात लांब चिरेबंदी बळाणी, आणि बरोबर मध्यभागी चार फुटी नक्षीदार प्रवेशद्वार, त्याच्या दोन्ही बाजूना लाल पाषाणात कोरलेले पूर्णाकृती कमनीयजय विजय होते. प्रवेशद्वाराच्या पायऱ्या चढल्यावर गाभाऱ्यात मागील भिंतीत कोनाड्यात पुरुषभर उंच पाषाणात कोरलेली देवीची चतुर्भुज उभी मूर्ती. पहाताक्षणीच देवीची उग्र मुद्रा पाहून माझी छाती दडपून गेली. बाबांचे धाकटे भाऊ भाई काका देवी सूक्ताची आवर्तनं करीत बसलेले होते. देवीच्या पाया पडल्यावर मी नेलेली ओटी देवीला मानवून बाबानी कडकडीत गाऱ्हाणे घातले.नारळ फोडून प्रसादाची कवड दिली. मग गाभाऱ्या समोर बसून मी सुद्धा भाईबरोबर खणखणीत सुरात देवी सूक्त म्हणायला लागलो. सगळेजण कौतुकाने पहात राहिले.

तीन आवृत्या झाल्यावर भाईंची आवर्तनं पुरी झाली. मग बाबांबरोबर सगळा आवार फिरून बघितला. मंदिराच्या मागिल बाजूला हाकेच्या अंतरावर केगदीचं बन होतं. तिथे कमरभर खोल नी दोन वाव औरस चौरस कोंड होती नी मागच्या बाजुला दोन पुरुष उंच नी चार वाव रुंद काळवत्री शीळा होती. शीळेच्या साधारण मध्यात तळाकडे हातभर उंच ,नी चार आंगळं खोल

कोनाड्या सारखी घब होती नी मोठा तडा गेलेला दिसायचा. त्या कोनाड्यातून मनगटाएवढी स्वच्छ- निवळ शंख पाण्याची धार पडत असायची. बारा महिने त्यात वाढ की घट व्हायची नाही असं बाबानी सांगितलं. तेच पाणी वहाळातून वहात गिरिमा देवीच्या मंदिराला वळसा घालून खाली गावदरीत जावून पुढे दर्याला जाऊन मिळत असे. पाऊस काळ संपता संपता गावात दोन ठिकाणी वहाळाला बांध घालून पाणी अडवीत. उन्हाळी भाजीपाला पिकवता येत असे. गावातली दोनचार एकवशी घरं सोडली तर अख्ख्या गावाला बारमास पाटाचं पाणी मिळायचं.

दुपारी मोदकाचं जेवण केलेलं होतं. मोदकांसोबत एका द्रोणातून नारळाचा आपरस नी एका द्रोणातून तुप होतं. सुरुवातीला जेवणारानी वरण-भातावर नारळाचा आपरस ओतला. मला हे नवीनच होतं. आपरस घातलेल्या वरण भाताची चव पक्वान्नालाही मागे टाकणारी होती. मी संकोच बाजूला ठेवून पुन्हा भात मागून घेतला. सगळ्यानी अगदी आग्रह करकरून मोदक वाढले. शेवटी दहीभाताला पोटात जागाच राहिली नाही. मी दह्याची कवडी खाल्ली नी आपोष्णी घेवून उठलो. जेवण अगदी तटी लागेतो झाले होते. पान खावून गप्पा झाल्यावर बंडूमास्तर पत्त्याचे कॅट घेवून आले. भाई म्हणाले, "सहा जणात लॅडिस खेळूया". मला पत्ते खेळायला आवडे. पण जेवण तके अंगावर आले होते की पडस्थळ मारण्यावाचून गत्यंतर नव्हते. मी स्पष्टच सांगून टाकले की, "मला पत्ते कुटायला आवडतात पण तुम्ही सगळ्यानी आग्रह करकरून इतके मोदक खायला घातलेत की जेवण अगदी अंगावर आले आहेत. आत्ताच डोळे मिटायला लागलेहेत. मी जरा आडवा होणार. सगळे खळखळून हसले. नी बाबा मला ओसरीवरच्या खोलीत झोपायला घेवून गेले.

२५जुनला एस्.एस्.सी.चा रिझल्ट लागला.अ-ब दोन्ही तुकड्यामधल्या ६७मुलांपैकी इंग्रजीत१३मुलं पास झाली तेवढा म्हणजे १९.४०% एवढा शाळेचा रिझल्ट लागला. या वर्षी दोन्ही तुकड्यांत ७१मुलं होती. त्यातली जेमतेम १५ मुलं उद्धरणारी होती. उगाच टपसरण नको म्हणून मी दोन्ही तुकड्यांची५० गुणांची चाचणी घेतली. कॉम्प्रीहेन्शन पॅसेज म्हणजे उताऱ्या वरील प्रश्न १० गुण, भाषांतर ८ गुण आणि ट्रान्सफॉर्मेशन - सिंथेसिस ३२गुण अशी प्रश्नपत्रिका होती. परीक्षेत १८ते २०गुण मिळवून १४ मुलं पास झाली. ८मुलानी १२ते१४गुण मिळवले आणि उरलेलल्या ४९मुलाना २ते १० गुण मिळाले होते. मी हेडसराना गुणपत्रक दाखवलं. मी काही बोलण्या आधीच सर म्हणाले, "यात आश्चर्य वाटण्याचं काहीच कारण नाही. पुढच्या वर्षी तुमच्या प्रयत्नांमुळे २२- २३ मुलं पास झाली तरी पुरेसं आहे. तेवढं तुम्ही नक्की कराल याची मला खात्री आहे. त्यासाठी तुम्हाला जे प्रयत्न करावेसे वाटतात ते तुम्ही जरूर करा. आमच्याकडून जे काही सहकार्य पाहिजे असेल ते फक्त सांगा.

दोन दिवसां नंतर मी शाळा सुरु होण्याआधी ९ते १०.३० या वेळेत दोन्ही तुकडीतल्या मुलांसाठी जादा मार्गदर्शन वर्ग सुरु केले.जादा तास सुरु झाल्यावर मी नंदाला म्हणालो की. संध्याकाळच्या क्लासला येण्याची गरज नाही . पण ती रोज नेकीने यायची. क्लासला मी दिलेला गृहपाठ पुरा करून माझ्याकडून तपासून घ्यायची. इंग्रजी च्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप विचारात घेवून व्याकरण आणि निबंध, पत्र लेखन आणि उताऱ्या वरील प्रश्न यांचा सातत्याने सराव करून घ्यायचे ठरवले. जुन्या मार्च ऑक्टोबर च्या प्रश्न पत्रिका, अपेक्षित प्रश्नसंच यांचा संदर्भ घेवून ३ स्वतंत्र वह्यांमध्ये रोज द्यायच्या सरावाचे वर्ग पाठ नी त्यावर आधारित गृह पाठ अशी वर्गवारी करून साहित्य संग्रहित केले.

त्याप्रमाणे जादा तासाना सराव करून घ्यायला लागलो. तासाच्या सुरुवातीला काल घरी दिलेल्या ग्रहपाठाची उजळणी नी नंतर नवीन सराव मी देत असे. हेडसर जातीनिशी मुलांच्या उपस्थितीवर लक्ष देवून असायचे. तसेच मी संकलित केलेल्या वह्या ही त्यानी चाळून बघितल्या." तुम्ही अगदी पैजेचा विडा उचलावा अशी तयारी केलेली आहे. मी अगदी निश्चिंत आहे. तुमच्या कष्टाचे चीज करीन."

जुलै अखेर सरानी१०वीतल्या मुलांच्या पालकांची सभा लावली. ज्याचे पालक येणार नाहीत त्याचे नाव काढून टाकण्यात येईल अशी तंबी दिल्यामुळे सर्वांचे पालक सभेला हजर होते. सुपरवायझर मोर्वेकर सरानी माझा परिचय करून दिला. मी घेतलेल्या चाचणी मुलानी काय दिवे लावले आहेत त्याची कल्पना दिली. हेडसरानी मी किती कष्ट घेवून नियोजनबद्ध मार्गदर्शन वर्ग घेत आहे याची कल्पना दिली. शहरात जादा क्लासचे चालक किती फी उकळतात ते सांगून इंग्रजी गणिताचे जादा मार्गदर्शन करणाऱ्या सराना फुल ना फुलाची पाकळी दरमहा २० रुपये मानधन जे सधन पालक आहेत त्यानी शाळेकडे जमा करावे असे आवाहन केले. "ज्याना शक्य नसेल त्यानी फी देवू नये मात्र जादा तासाला मुले पाठवा," असे सांगितले. रक्कम अल्प असल्यामुळे पालकानी मान्य केले एवढेच नव्हे तर जीजी राणे, बाबा पाध्ये, तातू भंडारी या पालकानी सराना सांगितले की, " परिस्थितीमुळे जे कोणी पालक पैसे देणार नाहीत त्यांचे पैसे आम्ही तिघेजण मिळून देवू." पालकानी पहिल्या महिन्याची फी तात्काळ जमा केली.

पुढच्या आठवडा भरात मार्च मध्ये नापास झालेली मुलंही हेडसरांची परवानगी घेवून जादा तासाला येवू लागली. या रिपिटर मुलांसाठी पुस्तकातले धडे कविता यांच्या प्रश्नांचा सराव करून घेण्यासाठी शनिवारी दुपारी २ते ४ यावेळेत जादा तास सुरु केला. मी दर १५ दिवसानी झालेल्या भागाची चाचणी घेवू लागलो. दोन तीन महिन्यानी प्रगती मध्ये लक्षणीय बदल दिसू लागला. १० -१२ मुलं पन्नास पैकी २८ते ३५ गुण मिळवीत. तर सुमारे १५मुलं २० ते २५ गुण मिळवू लागली. विषेश म्हणजे परीक्षा- पेपर हे भीती मुलाना वाटेनाशी झाली. उलट परीक्षा झाल्यावर दुसरे दिवशी उत्तर पत्रिका तपासून दिल्या नाहीत तर मुलं नाराज होत. तासाला अनुपस्थितीची समस्याही वर्षभरात कधीच जाणवली नाही. जादा तासाला येणाऱ्या रिपीटर मुलांपैकी दहा जण ऑक्टोबर च्या परीक्षेत पास झाले. फेब्रुवारीत पूर्व परीक्षेत ३२ मुलं चांगली पास झाली चार मुलानी २५पेक्षा अधिक गुण मिळवले. म्हणजे या वर्षी ४०% निकाल नक्की लागेल असा मला विश्वास वाटू लागला. सहामाहीला राणेंची माझ्याकडे शिकवणीला येणारी नववीतला सतीश, आठवीतली नीता यानी इंग्रजीत सत्तर गुण मिळवले नी पुढे वर्गातही दोघांचा गुणानुक्रमे पहिला नंबर आला. दहावीतल्या नंदानेही इंग्रजीत वर्गात सर्वाधिक म्हणजे ६८ गुण मिळवले. याआधी तिला कधीही ४०च्यावर मार्क मिळालेले नव्हते. बाकीची तीन मुलं सहावीतला दीपक, नेत्रा आणि सातवीतली अनिता यांच्याकडून मी धड्या खालच्या एक्झरसाईझ सोडवून घेत असल्यामुळे त्यानीही इंग्रजीत साठच्यावर गुण मिळवून दाखवले. मी रात्री जेवायला गेल्यावर मोठ्या आईना हाक मारून मुलांचे पेपर दाखवले. "आमची मुलं कधि असं नेत्रदीपक यश मिळवतील अशी स्वप्नात सुद्धा अपेक्षा केली नव्हती. सतीश तर एक नंबरचा उनाड, त्याचे मार्क

बघून जीजीना बहुतेक कांदे लावावे लागतील. " मोठ्या आई हसत हसत म्हणाल्या.

आता मी गावात चांगलाच रुळलो होतो. महिन्यातून एखाद्या शनिवारी घरी खेप असे. एरव्ही शनिवारी वसतीला माझ्या मावशीची नणंद आशा आत्ते कडे म्हणजे गादववाडीत जोशांकडे जाई. त्यांच्या घरातली दोन मुलं हायस्कूलला होती. मी रविवारी दुपारी पाध्यांकडे जाई . हा अगदी ठरीव कार्यक्रम असे. नवरात्रात देवीच्या देवळात घटी बसायचा. ललिता पंचमीला नी दहाव्या दिवशी तर मला ब्राह्मण भोजना साठी निमंत्रण होते. अर्थात हायस्कूल पासुन मंदीर पंधरा मिनीटाच्या चालीवर असल्यामुळे चौथा पिरियड अडजस्ट करून मधली सुटी साधून मी जावून जेवून आलो. पौष दशमी ते पौर्णिमे पर्यंत पाच दिवस देवीचा वार्षिकोत्सव नी जत्रा असे. रात्री आठ वाजता पालखी काढीत.त्यावेळी देवीचे अवसर उभे रहात. मंदिराला तीन प्रदक्षिणा झाल्यावर पालखी आत आल्यावर आरती असे.नी त्या नंतर पडस्थळे असत. म्हणजे आलेले भक्तगण देवीचा संचार झालेल्या अवसराला आपल्या समस्या सांगत नी अवसर त्याना काय काय तोडगे सांगत. हे काम मध्यान रात्री पर्यंत चाले. यात्रेला प्रचंड गर्दी व्हायची. यात्रेला टुरिंग टॉकीज यायची. आदल्या दिवसा पासून जत्रा उठे पर्यंत रोज सहा ते साडे आठ पहिला खेळ , पालखी झाल्यावर साडेनऊ ते बारा दुसरा खेळ होई. दरवेळी वेगळा सिनेमा असे. मी रोज दुसरा शो बघित असे. यात्रेच्या पाच दिवसांसाठी आडबंदराहून पाच सहा होड्या गिरावळ बंदरावर असत नी यात्रेला येणाऱ्या भाविकाना मोफत अलिकडे पलिकडे सोडण्यात येई. अर्थात तांडेल पाण्यात उतरून रशी ने होडी ओढित न्यायचा. यात्रेला लांब लांबचे व्यापारी दुकानं घेवून यायचे. यात्रेचे

पाचही दिवस दुपारी रात्री महाप्रसादाची सोय असायची. मी रोज रात्री महाप्रसाद घ्यायला मंदिरात जायचो.

बघता बघता आठ-नऊ महिने कसे गेले कळलेच नाही. २८ फेब्रुवारीला दहावीचा सेंडॉफ झाला नी मला खुपच मोकळीक मिळाली. मी अप्रशिक्षित असल्यामुळे ३१ मार्चला मला सेवा खंडित केल्याची नोटिस दिली असली तरी." नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसापासून तुम्हाला हजर करून घेवू. तुमची सेवा खंडित होवू देणार नाही "असे वचन हेडसरानी दिले नी पुढची तीन वर्षे ते पाळले. एक मे ला रिझल्ट लागले नी उन्हाळी सुटी सुरु झाली. मी आठदहा दिवस सुटी घेतल्यावर अकरा मे पासून दहावीचे जादा क्लास जाहीर केले. रोज सकाळी आठ ते अकरा तीन तास इंग्रजीचे तास सुरु झाले. ह्या बॅचची हालतही मागच्या बॅच सारखीच होती. नववी अ-ब माझ्याकडेच असल्याने त्यांची तयारी चांगली होती. सकाळी क्लास आटोपल्यावर संध्याकाळी मी देवळाकडे फिरून येत असे. जीजींच्या सतीशलाही आता अभ्यासाची चांगलीच गोडी लागल्याचं मला जाणवलं.

सहा जुनला शाळा सुरु झाली. दिवसभरचं रुटीन सुरु झालं. आता वेध लागले होते ते दहावीच्या रिझल्टचे.तेरा जुनला रिझल्ट शीट आणायला गोसावी क्लार्क रत्नागिरीला गेले. चौदा तारीखला संध्याकाळी सहाच्या गाडीने ते यायचे होते.हेडसरां सह आम्ही सगळे शिक्षक तरीवर जावून थांबलो. साडेसहाला गोसावी येताना दिसले. हाकेच्या टप्प्यात आल्यावर ते ओरडून म्हणाले ४२% टक्के... एकोणतीस मुलं पास झाली. तेवढाच रिझल्ट गणिताचा. इंग्रजीत ३४मुलं पास . यंदा गणितापेक्षा इंग्रजीचा रिझल्ट जास्त आहे. गोसावी पलिकडे

आल्यावर त्यानी विषय निहाय आकडेवारी लिहिलेला कागद सरांकडे दिला. संस्कृतमध्ये सर्वाधिक ५२ मुलं पास झाली होती. त्या खालोखाल मराठीत५९, इतिहास भुगोलमध्ये ४४, हिंदीत४२, विज्ञानात ५०, इंग्रजीत ३४ आणि गणितमध्ये सर्वात कमी २९ मुलं पास झाली होती. भाईंची नंदा ७४% गुण मिळवून पहिली, ७६% मिळवून असवडेकरांचा मोहन दुसरा नी अजित गुरव ६९% मिळवून तिसरा आला. नंदाने इंग्रजीत पूर्व परिक्षेपेक्षा ३ गुण अधिक म्हणजे ७४गुण मिळवले होते. प्रथमच शाळेचा इतका नेत्रदीपक रिझल्ट बघून सगळे आनंदून गेले होते.

शाळेत पन्नासेक पालक आलेले होते. सरस्वतीसमोर नारळ ठेवून सरानी नमस्कार केला नी देवीसमोर पेढ्यांची डिश ठेवली. "यंदा प्रथमच शाळेचा नेत्रदीपक म्हणजे ४२ टक्के रिझल्ट लागलाहे. जेवढा गणिताचा निकाल तेवढाच शाळेचा निकाल आहे, दरवर्षी आम्ही इंग्रजीत मार खात असू यंदा देसाई सरानी बाजी मारली शाळेच्या निकालापेक्षा इंग्रजीचा निकाल सहा टक्क्यानी जास्त आहे. आता काळोख पडला आहे. मार्कलिस्ट उद्या दहा वाज्ल्या नंतर मिळतील." गोसावी तीन किलो पेढे घेवून आलेले होते. आलेल्या सर्वाना पेढे वाटल्यावर शाळा बंद करून सगळे बाहेर पडले . मी जीजींबरोबर घराकडे निघालो. मी नंदाचे मार्क लिहून घेतलेले होते. आम्ही घरी पोचलो तेव्हा सगळी माणसं ओटीवर जमून आमची वाटच पहात होती. मी नंदाचे विषय निहाय गुण वाचून दाखवले. जीजी म्हणाले, " हायस्कूल सुरु झाल्यापासून प्रथमच आमच्या घराण्याचा झेंडा नंदाने लावला. यापूर्वी असवडेकरांचा मोहन दरवर्षी चार पाच टक्के जादा मिळवून पहिला यायचा नी नंदा दुसरा किंवा तिसरा नंबर मिळवी. यंदा देसाई सरांच्या मार्गदर्शनामुळे तीचे मार्क वाढले. आमच्या

घरातली तीन मुलं यंदा वर्गात पहिली आली. ही सगळी सरांची कृपा आहे. मी आमच्या कुटुंबाकडून सराना छोटीशी भेट देणार आहे." जीजी पाच मिनीटानी पाकीट आणि श्रीफळ घेवून बाहेर आले. सर, ही छोटीशी भेट आहे, ती तुम्हाला घ्यावीच लागेल. आमचा मान राखायचा म्हणून ही घ्या." मला नाही म्हणणं शक्यच नव्हतं.जेवून घरी गेल्यावर पाकिट उघडलं आत दोनशे रुपये होते.

दुसरे दिवशी प्रार्थनेच्या वेळी सरानी सर्व शिक्षकांना धन्यवाद दिले. माझे खूप कौतुक केले. पास झालेली मुलं मार्कलिस्ट घेतल्यावर भेटायला येवून पाया पडून जात होती. मधल्या सुट्टीत सरानी मला केबिनमध्ये बोलावून घेतले. पालकांकडून जादा मार्गदर्शनापोटी जमा केलेल्या रक्कमे मधला निम्मा वाटा गणित शिकवणाऱ्या बागुल सरानी घेतला होता पण मी ती रक्कम घेतलेली नव्हती. रिझल्ट चांगला लागला तर मी ती रक्कम घेईन असे म्हणालो होतो. म्हणून ती रक्कम सरानी बाजुला करूत ठेवलेली होती." देसाई सर, तुमचे कष्ट सत्कारणी लागले. तुम्ही जे कष्ट घेतलात त्यापुढे ही रक्कम नगण्य आहे. बहुमान म्हणून हे पैसे घ्या." मी पैसे घेतले. एक रकमी साडेपाच हजार ही माझ्यासाठी खूप मोठी रक्कम होती.अलिकडे राणेंच्या घरातली दुसरीत जाणारी गीता नी तिसरीत जाणारा संदीप दोन मुलंही हट्ट करून मोठ्या भावंडां- बरोबर संध्याकाळी शिकवणीला यायला लागली. मी अधून मधून त्याना इंग्रजी अल्फाबेट शिकवायला सुरुवात केली. काही दिवसानी सोपी सोपी इंग्रजी वाक्य बोलायचा सराव द्यायला लागलो. हळू हळू त्याना सोप्या ऑर्डर समजू लागल्या.मोठ्या भावंडांच्या इर्ष्येने गीता नी संदीप मी शिकवलेला शब्दन् शब्द मुखोद्गत करीत. त्याना दोन्ही लिप्या लिहिता यायला लागल्या. मी त्यांना पाचवीच्या इंग्रजीच्या पाठ्य पुस्तकातले कॉन्वर्सेशन पॅसेज शिकवी. पाच सहा

महिन्यात त्याना सोपी वाक्यं समजू लागली नी बोलता लिहिता येवू लागली. घरी गेल्यावर क्लासमध्ये मी शिकवलेली वाक्यं बोलून दाखवून मुलं घरच्याना चकित करीत.

बघता बघता तीन वर्षे कधी मागे पडली ते कळलेच नाही. नोकरी टिकवायची तर बी, एड्. करणे भाग होते. पण त्यावेळी बी.एड्. प्रवेश मिळणे आणि वर्षभर उत्पन्न बंद ठेवून आठ दहा हजार खर्च करणे कुवती बाहेरचे होते. पण उपरवाला देता है तो छप्पर फाडके देता है ही म्हण सार्थ ठरावी असा जी. आर. महाराष्ट्र सरकारने काढला. डिसेंबर७६ पूर्वी सेवेत रुजु झालेल्या अप्रशिक्षित शिक्षकांसाठी शासकीय बी.एड्. महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात येईल आणि प्रशिक्षणा साठी विनावेतन रजा देण्यात येईल, असा तो जी. आर. होता. शासनाने जिल्हानिहाय सर्वअप्रशिक्षितशिक्षकाना शासकीय बी.एड्. कॉलेज मध्ये प्रवेश दिला. मला पुण्याला प्रवेश मिळाला. फी शासकीय दराने असल्याने परवडणारी होती.

मी बी.एड्. पूर्ण करून विद्यापीठाची परीक्षा झाल्यावर एक एप्रिल पासून शाळेच्या सेवेत हजर झालो. त्या वर्षी मोठ्या मुश्किलीने पंधरा जुलैला इंग्रजीचा शिक्षक मिळाला होता. सरानी माझ्या वह्या त्याना दिल्या. मी कशी तयारी करून घेत असे तेही समजून सांगितले. स्वत: लक्ष देवून माझ्या पद्धती प्रमाणे तयारी करवून घेतली होती खरी पण माझ्या ऐवजी आलेले बोरवणकर अगदीच सो-सो होते." झ्यो कुत्र्या कर पारध " म्हटले म्हणून कुलुंगा कुत्रा थोडीच शिकार करणार? त्या वर्षी इंग्रजीचा टक्का घसरल्यामुळे एस्.एस्.सी.चा रिझल्ट अठरा टक्क्यावर आला. रिझल्ट शीट बघितल्यावर कपाळावर हात मारून फडकेसर

म्हणाले, " शेवटी धरून कुत्रा पारध होत नाही हेच खरंय... तुकोबारायानी म्हटलंय ते खरं आहे. तुका म्हणे तेथे पाहिजे जातीचे.... इंग्रजीचा रिझल्ट लावणे हे येरा गबाळ्याचे काम नोहे...हेच खरं! "

***********

## ३. जंबारी शाळा

म्हापणकर बाईना शाळा तपासनीस म्हणून बढती मिळाली आणि बऱ्याच शिक्षकांची चरफड झाली. बाई वक्तशीर आणि कडक शिस्तीच्या, त्यात अविवाहीत! नि:स्पृह आणि तऱ्हेवाईक म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध! इन्स्पेक्शन घ्यायला आलेल्या शिक्षणाधिकारी गवळी साहेबानी पायताणं घालून सातवीच्या वर्गात प्रवेश केल्यावर बाईनी हात जोडीत त्याना उंबऱ्याजवळच अडवलेनी. अत्यंत विनम्र शब्दात त्या म्हणाल्या, "साहेब, माफ करा... मुलं जमिनीवर बसलीहेत. कृपया पायीचे जोडे बाहेर काढून ठेवा नी मग आत या. " साहेब चांगलाच खजिल झाला. वरकरणी दाखवले नाही तरी तो मनातून चांगलाच संतापलेला होता. त्याने मुलांची कसून परीक्षा घेतली. पण अगदी अवघड गणितं ही वर्गातल्या निम्मे मुलानी बिनचूक सोडवून दाखवली.बाई मुख्याध्यापिका असल्याने कुठेतरी कचाट्यात गावतील असा त्याचा अंदाज होता पण कागदोपत्री अगदी बारिकशी चुकही साहेबाला काढता आली नाही. ते राहोच पण त्या स्त्री आणि अविवाहीत असूनही आलेल्या अधिकारी वर्गाची चहा फराळ, जेवणाचीही अगदी चोख़ व्यवस्था त्यानी केलेली... म्हणताना साहेबाला चारी मुंड्या चीत होवून निघून जावे लागले.

त्यावेळी पदोन्नत्ती दिलेल्या शिक्षकाला दुसऱ्या जिल्ह्यात नेमणूक देत. पण या जिल्ह्यातली शिक्षक मंडळी भांडखोर आणि कायद्यात वागणारी अशी त्या काळी अख्ख्या राज्यात ख्याती होती. म्हणून अन्य जिल्ह्यातली माणसं

रत्नागिरी जिल्ह्यात यायला तयार नसायची. एकतर हा जिल्हा दुर्गम, वाहतुकीच्या साधनांची वानवा त्यात राजापुर तालुका तर अती गैरसोईचा. काही गावांमध्ये फक्त एकच एस्टी जाणारी. ती संध्याकाळी राजापुरातून सुटायची नी रात्री मुक्कामी थांबून दुसरे दिवशी सकाळी सात वाजता राजापुरला परत यायची. ओशिवरे, जुवाटी, खाजणतड, जंबारी, बाकाळे, गोठिवरे, दत्तवाडी, बुरंबे, नावळे, आंगले, गव्हाणे आणि कुवेशी हे काही गाव तर अती दुर्गम ! त्या गावाना एस्टी गाडीच जात नसे. मुख्य रस्त्यापासून दोन ते अडीच तास चाल मारून ते गाव गाठावे लागत. या गावानी जायचं तर जीव घेण्या घाट्या डोंगर नी चढ उतार पचवून मैलोन् गणती रपेट मारून मुक्काम गाठावा लागे. बहुतांश मार्ग झाडा पेडांच्या गचकटीतून जाणारे निर्मनुष्य असल्याने कोणीही अधिकारी राजापुरात बदलून यायला तयार नसे. म्हणून म्हापणकरबाईना शाळा तपासनीस पदी पदोन्नत्ती मिळवूनही जिल्ह्याबाहेर सोडाच पण तालुक्या बाहेरही जावे लागले नाही.

जंबारी नी खाजणतड हे आवळे जावळे गाव खाडी किनारी वसलेले. तालुक्यातले अति दुर्गम नी भानगडी गाव म्हणून प्रसिध्द. ह्या गावांमधून होडीने विजयदुर्ग दोन घटकेच्या अंतरावर. ह्या गावांचा राजापुर पेक्षा विजयदुर्गशी घनिष्ट व्यापार संबंध. जंबारीत प्रचंड मुस्लिम वस्ती. तिथे सात यत्तांपर्यंतची उर्दुशाळा ही भानगडीची शाळा म्हणून प्रसिद्ध. त्याच गावचा अली पटेकर हेडमास्तर झाल्यापासून त्याच्याविरुद्ध गावकऱ्यांचे असंख्य तक्रार अर्ज जिल्हा स्कूल बोर्डाकडे आलेले. पटेकर मास्तर हा कॉन्ग्रेसचा कार्यकर्ता. त्याच्या दोन बायका. त्याची मच्छिमारीची पात (होडी) ही खूप मोठी, बारा तांडेल असलेली. त्याची मोठी बाईल फातु कायम विजयदुर्ग बंदरात मासे विकायला

रहायची. ती हप्त्यातून एकदा फक्त जुम्म्याला जंबारीत यायची. तिच्या कडोसरीला खोवलेल्या पानाच्या चंचीत बारीक बारीक घड्या केलेल्या रुपया,दोन रुपये, पाच रुपये नी दहा रुपयांच्या नोटा चोंदून चोंदून भरलेल्या असत. फातु आली कि दात्यांच्या पेढीवर जायची. हप्त्याभरात घरच्यानी नेलेल्या सामानाची आणि नवऱ्याची उधारी फेडायची. बापु दाते तिला चवडाभर पाने, मुठभर सुपारीची खाण्डे नी तंबाखू देत. दोन पाने जुळवून चुना लावण्यासाठी पुढे केल्यावर बापु अडकित्त्याच्या दांडीने ढेपसाभर चुना देत. पानाला फासून उरलेला चुना ती कडोसरीच्या डबीत भरून आंग़ठ्याचा चुना जिभेने चाटून ओला आंगठा नेसूच्या साडीला पुसून कोरडा करी.

पटेकर मास्तराचा फातुशी निका लागला, पण लग्न होवून चार वर्ष झाली तरी फातु पोटुशी राहिना म्हणताना मास्तराच्या आयशीने त्याचा दुसरा निका लावायचा धोशा घेतला. अली मास्तराने सुलेमानच्या मेव्हणीशी आयेशाशी निका लावला. आयेशाला मुलगी झाली नी त्या नंतर फातु पोटुशी राहिली नी तिला मुलगा झाला. त्याच दरम्याने पटेकर मास्तराने पतपेढीचे आणि जमातीचे कर्ज काढून स्वत:ची पात बांधून मच्छिमारी सुरु केली. तो धंदा फातु सांभाळी. दीड वर्षाचा मुलगा सवतीच्या लगामी लावून ती घराबाहेर पडली. हप्ताभर विजयदुर्ग बंदरात मच्छिमारी चाले. फातु रोज स्वत: डोकीवर फाटी घेवून म्हावरं विकी. घावूक माल बंदरावरचे आडते उचलित. त्यांचा नी होडीवरच्या तांडेलांचा व्यवहार पटेकर मास्तर सांभाळी. म्हणजे व्यवहार सग़ळा फातुच्या जिभेवर असायचा, मास्तर आपला आबधाक असावा म्हणून फातु सांगेल त्याप्रमाणे तोड करण्यापुरता हो ला हो करायचा. दोन सिझनमध्ये कर्जव्याम फिटून धंद्यात चांगला जम बसला.

पटेकर मास्तर सकाळी अगदी वेळेवर शाळेत जाई. प्रार्थना, परिपाठ आटोपायच्या दरम्याने , पुर्षा भंडाऱ्याचा गडी चहाची किटली नी बटर किंवा लिमज्या घेवून शाळेत जाई. शाळेतल्या सगळया मास्तरांचे मच्छिमारीचे जोड धंदे असल्याने सगळेजण चार पैसे बाळगून असत. म्हणून सकाळी चहा बटर, साडे दहाला चहा, दुपारी अडीज वाजता चहा नी संध्याकाळी कधि भजी नाहीतर फरसाण नी चहा मागवीत असत. नाहीतर बहुतांश शाळा मास्तर हे त्यावेळी कंगाल असल्यामुळे दोन वेळा शाळेतच चहा करून प्यायची पद्धत असे. सकाळचा चहा झाला कि, पटेकर मास्तर जो बाहेर पडे तो दुसरे दिवशी प्रार्थनेपर्यंत शाळेकडे फिरकतही नसे. शाळेतून बाहेर पडल्यावर तो बापू दात्यांच्या पेढीवर जावून बसायचा. तिथे रोज एक चार मिनार सिगारेट्चं पाकिट घेवून गप्पा मारीत सिगारेट ओढित बसायचा. आता बंदरावर वर्दळ सुरु होई . पेढीवर गिऱ्हाईकांची गर्दी व्हायला लागलेली असे. मग तिथून उठून पटेकर मास्तर आबा सोडयाची कौलाची वखार गाठायचा.

वखारीमागच्या पडवीत आबा सोडये, दारूवाला कांतु मयेकर, पटेकर मास्तर, मुंबईतून फंड घेवून गावात आलेले सख्या गोडकर नी धाकु बंडबे पैसे लावून तीन पत्ती खेळत. कधी कधी तरी पलिकडच्या शेजवलीतून हसन काजी, उस्मान बुडया, चांदवणातला शिटू परब यायचे. अशावेळी सगळयांसाठी माशाचं कालवण नी भात आबाचा गडी वखारीतच रांधायचा. काही वेळा बुधवार आयतवारी पुर्षाच्या खानावळीत मटणाच्या जेवणाची वर्दी जाई. साताठ जणांसाठी जेवणाचे टोप वखारीत पोच होत. दारू कांतुच्या भट्टीवरून मोफत येत असे. पण सग़ळे तीन पानीचे नादी असल्यामुळे कोणीच पिऊन फीस होत नसे. खेळ रोखीवर व्हायचा. त्यांचे काय नियम होते त्याप्रमाणे सगळेजण

चटाचट पैसे काढून समोर टाकीत. शेवटी जो जिंकेल तो गल्ला पुंजावायचा. बहुसंख्य वेळा सख्या नाहीतर धाकु जिंकायचे. कधितरी कांतु बाजी मारायचा. एखाद वेळी पैसे संपले , की पटेकर मास्तर कांतुकडून जुम्म्याला परतफेडीच्या बोलीवर उधर पैसे घ्यायचा.

कांतुची उधारी असली की जुम्म्याच्या दिवशी सकाळीच भिणभिणताना तो पटेकर मास्तराला सोबत घेवून बंदरावर फातु ची वाट बघित थांबायचा. फातु होडीतून उतरली की, "बेगम इस हैवानका पिछा छुडाओ... " असे म्हणत पटेकर मास्तर कांतुकडे बोट दाखवायचा. मग तिथेच बसकल मारून फातु फाटीतला फडका पसरून कडोसरीची चंची खोलायची नी, "कित्ते रुपये लिये है ..." असे म्हणत चंचीतल्या नोटांच्या घड्या काढून टाकायची. पटेकर मास्तर तत्परतेने घड्या खोलून सप्पय करायचा नी पैसे मोजून कांतुला द्यायचा. " देखो कांतु भाई, इस वखत दे रही हूं मगर आईंदा कभी मेरे भरोसे जुव्वा खेलने पैसा मत देना इनको ... " फातु दम द्यायची. कांतु चिमटीने गळ्याची चामडी पकडून शपथ खात सांगे, "आयच्यान सांगतय फातु, ही जुगाराची उदारी नाय हां... ते रोजा मैमान इलेले, तुज्या धकल्या सवतीचो बापूस... ते चारजुन आनी वांगडान तुज्या वाडीतले फुकटे...तेंच्या दारयेचा बील ऱ्हवलेला ... जुगारात इतकी कामाय झाली आस्ती तर दारु खेका विकली आस्ती... आज मच्छी काय हाडलस?" त्यावर फ़ातु सांगे "तांबवशी आशे... देंव?" पटेकर मास्तर चार मिनार शिलगावीत वखारीकडे निघायचा. कांतु पाच फडफडीत तांबवशा उचलून म्हणाला, "आज काजुची इलेली हा.... " फातुला काजुची दारू आवडायची. "तांबवशीच्या बदल्यात तीन बाटल्यो माज्यासाटना आमच्या घराकडेन पाटव ... आणि मांका एक डबो फाल्यां उजवाडण्याच्या आदि हंय

होरक्यात ठेन जा... " त्या काळी तेलाच्या रिकाम्या डब्यात दारू ठेवीत नी चिव्याचा वीतभर तुकडा तासून त्याचे घट्ट बूच ठोकित. कांतु एक डबा वीस रुपयाला विकी पण फातु त्याला कमी दरात भरपूर म्हावरं देई म्हणून तिच्यासाठी कांतु नेहेमीच दारवेचे दोन तीन रुपये कमी करीत असे.

मुसलमान वाड्यातला सुलेमान पावसाळी चिव्याच्या काठ्यांचा नी सिलिपाटाचा धंदा करायचा. त्याची सासरवाड खाजण तडीत. त्याची मेव्हणी चांदु ! खाजणतडीत पिराचा उरुस होई त्या वेळी पटेकर मास्तराची आयेशावर नजर पडली. फातुला मुलबाळ झालेले नव्हते म्हणून पटेकर मास्तराची म्हातारी त्याला दुसरा निका लावायला सांगत होतीच. ही संधी साधून पटेकर मास्तराने आयेशाच्या बापाशी संधान बांधले. त्याला दारु-मटण खिलवून काय ना काय निमित्ताने हातखर्चीला पैसे देवून वश करून घेतला. तसा सुलेमानही आयेशा वर नजर ठेवून होता. सासरा पटेकर मास्तराकडे खेटे मारायला लागल्यावर त्यानेही सासऱ्याशी घसण वाढवायची सुरुवात केली. पण त्याची बायको खाष्ट. सुलेमानचा हेतू ध्यानात आल्यावर तिने बापाचे कान भरून आयेशाचा पटेकर मास्तराशी निका लावून दिला. सुलेमान त्यामुळे मास्तरावर खार खावून होता. कोणा कोणाशी सल्लामसलत करून त्याने मास्तराच्या विरुद्ध स्कूलबोर्डाकडे तक्रार अर्ज करायची सुरुवात केली. मास्तर काही काम न करता फुकटचा पगार खातो, म्हणून त्याला पाण्यात बघणारे ग्रामस्थ अर्जावर राजरोस आंगठे देत.

विजयदुर्गातले बाप्पा परुळेकर जिल्हा परिषदेचे मेंबर, मास्तर फातुकरवी आठवड्यातून दोन तीन वेळा ताजी मासळी त्याना पोच करी. त्यामुळे मास्तराविरुद्ध अर्ज परभारे निकाली काढले जात. मुळात जंबारी सारख्या

अतिदुर्गम गावात वार्षिक शाळा तपासणीला सुद्धा येणं साहेब लोक टाळीत. जंबारी आणि खाजणतड दोन गावात दोन सात यत्तां पर्यंतच्या आणि सहा चौथी पर्यंतच्या मराठी शाळा आणि जंबारीची उर्दु शाळा याना कोणीच प्रत्यक्ष भेट देवून तपासणी करीत नसे. तिथल्या मास्तराना साहेब लोक दप्तर घेवून तालुक्याला किंवा अन्य शाळांमध्ये बोलावून कगदोपत्री तपासणीचे सोपस्कार पुरे करीत. सतत तक्रार अर्ज आल्यावर पटेकर मास्तराच्या चौकशीचाही फार्स करून प्रकरण निकाली काढण्यात आले.

जिल्हाबोर्डाकडे अर्ज करून मास्तराचा बालही बाका झाला नाही. उलट मास्तर संध्याकाळी 'घेतल्यावर' त्याच्या विरुद्ध अर्जावर सह्या आंगठे करणांना नावं घेवून शिव्या घालायचा. त्याची चौकशी झाली त्यानंतर दोन दिवसानी फातु जुम्म्याला आलेली असताना संध्याकाळी फुल्ल झाल्यावर नवरा बायकोनी सुलेमानच्या दारात जावून धमक्या दिल्या. "माज्या अर्ध्या वयाच्या दादल्यान तुजा नाक कापून तुजी आसमानची चांदनी कशी म्हेवनी दुसरी जोरू करून घितली, तुजी औकात नाय..." फातुने गळा फाड फाडून सुलेमानच्या मायबहिणींचा उद्धार केला. मास्तरासोबत कांतु भंडाऱ्याच्या गुत्त्यावर काम करणारे तरणेबाण्ड गडी असल्यामुळे फातुला तोंडी धमकावणे दूरच सुलेमान दार बंद करून दडी मारून बसला.

त्यानंतर दोन दिवसानी राजापुरच्या पोलिस ठाण्यातून पटेकर मास्तराला समन्स आले. मास्तराने तालुक्यातला नामांकित गव्हाणकर वकिल केला. पोलिसाना पैसा चारला नी थातुर मातुर चौकशी करून सुलेमानची पोलिस केसही निकाली निघाली. मात्र त्यानंतर सुलेमानच्या दारात जावून शिवीगाळ

करणे मास्तराने बंद केले. त्याच दरम्याने सुलेमान काठ्यांचा ट्रक भरून सांगलीच्या व्यापाऱ्याकडे माल घालायला गेलेला असताना बोलण्या बोलण्यात सहज विषय निघाला नी आपला पाव्हणा राज्याचा शिक्षण मंत्री आहे त्याच्या मार्फत पटेकर मास्तराला चांगली अद्दल घडवतो असे तो व्यापारी बोलला. त्याच्याशी सल्ला मसलत करून त्याने सांगितल्या प्रमाणे पन्नास ग्रामस्थांच्या सह्यांचा तक्रार अर्ज आणि पूर्वी स्कूल बोर्डाकडे केलेल्या सहा अर्जांच्या स्थळ प्रती चार दिवसात सुलेमानने नेवून दिल्या.

या वेळी मात्र झराझर चक्रं फिरली. शिक्षणाधिकाऱ्याना समक्ष चौकशी करायचे आदेश होते. पण तालुक्याला येवून चौकशी केल्यावर हे गाव किती दुर्गम आहे आणि पडत्या पावसात अडीज तीन तास पायपीट करून पल्ला गाठायचा म्हणजे जीवावर उदार होवूनच बाहेर पडायला हवं, असं जाणत्यानी सांगितलं. शिक्षणाधिकारी साहेब सोलापुरकडचे. कोकणातला पाऊस भीषण असतो याचा त्यानी अनुभव घेतलेला होता. मग पूर्ण विचार करून अत्यंत कडक म्हणून ख्याती असलेल्या म्हापणकर बाईंचे नाव जाणत्यानी सुचविले. साहेबानी त्याना आपले प्रतिनिधी नेमून विशेष चौकशी अधिकारी म्हणून अधिकार पत्र दिले. या प्रकरणाची चौकशी करायचे आदेश खुद्द शिक्षण मंत्र्यानी दिलेले असून कोणाचीही गय न करता वस्तुस्थितीची पडताळणी करून तसा अहवाल लौकरात लौकर सादर करायची सुचना त्यानी दिली. चौकशी कशी करावयाची याची तपशीलवार माहितीही साहेबानी बाईना दिली. चर्चा सुरु असता म्हापणकर बाई या कामी अगदी सुयोग्य असल्याची खात्री साहेबाना पटली.

त्यावेळी राजापुर नजिक हर्डीच्या शाळेत सोडये गुरुजी आणि पंचायत समितीतला शिपाई भगवान वरक हे जंबारीतले माणूस म्हणून त्याना सोबत घ्यायचा सल्ला तालुका मास्तरानी दिला. पावसाळी सुटी संपून नुकत्याच शाळा सुरु झालेल्या. तो सिझन म्हणजे ठोम पावसाचा. प्रवास पूर्ण पायी कातळी सड्यावरून करायचा. वारा पावसाचा जोर झाला तर वातावरण निवळेपर्यंत कुठेतरी झाळीच्या किंवा गडग्याच्या आडोशाने बसून रहावे लागते. पाऊस उभा आडवा सैताना सारखा झोडून नखशिखान्त भिजवून काढतो.म्हणून कागदपत्रे, कपडे शाबूत राखण्यासाठी कांबळयाच्या रकट्यात गुंडाळून पिशवीत भरावी लागतात. अशी माहिती सोडये गुरुजीनी दिली. त्याप्रमाणे सगळी जय्यत तयारी करून सोडये गुरुजी, वरक शिपाई, म्हपणकर बाई आणि गुरव कारकून सकाळी लौकर उठून मार्गस्त झाली.

धोपेश्वराची घाटी चढून सडावळीची वाट सुरु झाली आणि पावसाला सुरुवात झाली. वाऱ्याचा तर असा जोर होता कि पुढे पाऊल टाकणेही मुश्किल झाले.घटकाभराने वाऱ्यापावसाचा जोर कमी झाल्यावर मंडळी मार्गक्रमणा करू लागली. आभाळ धरलेलेच होते आणि नऊ वाजताच्या सुमाराला संध्याकाळ झाल्यासारखे काळवे दाटून आलेले होते.मध्येच सूं सूं आवाज करीत वाऱ्याची कावटी येई. वाटेने चिटपाखरूही नजरेला पडले नाही. बाईंच्या संथ चालीने वाट तुटता तुटत नव्हती. तरी वाटेत फक्त एका ठिकाणी नैसर्गिक विधीच्या निमित्ताने बाई थांबल्या. वरक शिपाई जातीचा धनगर, सड्यामाळाला शेरडांच्या मागून फिरलेला. त्याने थांबून जरा अंदाज घेतला नी तिसऱ्या हिश्श्याने अंतर तुटले असा आडाखा बांधला. आणखी अर्ध्या घंट्यात ओशिवऱ्याचा सडा संपून जंबारीच्या सडा सुरु होईल असे तो म्हणाला. बाईनी बगल बॅगेतली लिमज्यांची

पुडी बाहेर काढली. कांबळयाच्या रकट्यात गुंडाळून ठेवल्यामुळे पुडी सर्दावली नव्हती. पाणी पिवून मंडळी चालायला लागली आणि दहा बारा मिनिटात ओशिवऱ्याचा रनर टपालाची बॅग घेवून येताना दिसला. जरा पुढे गेल्यावर गुरे चरताना दिसली. डाव्या अंगाला खरीत तीन जोतये आणि लावणी लावणारी माणसं दिसली. माणसांच्या दर्शनाने बाईना जरा हायसं वाटलं .

अजूनही दिशा मोकळया झालेल्या नव्हत्या. पावसाळी पाण्याच्या असंख्य व्हावट्यांमुळे मूळ वाट कुठची नी फसवी व्हावटी कुठली हे ही नवख्या वाटसरूला कळले नसते. मंडळी जंबारीच्या दिशेने वळली आणि भणा भणा वारा सुरु झाला. सोडये गुरुजी म्हणाले, “जंबारीच्या नस्तातून बारा महिने बत्तीस काळ कायम अशा वाऱ्याच्या कावट्या सुटतात.” आता पुन्हा पावसाची सर सुरु झाली. हा पाऊस वाऱ्याच्या जोरामुळे तिरपा पिळवटत येत होता. वाऱ्याचा जोर वाढायला लागला नी म्हापणकर बाईंच्या हातातली छत्री सुटली. नशिबाने जवळच उक्षीच्या गचकट झाळीत छत्री अडकली म्हणून ठीक नाहीतर सोसाट्याच्या वाऱ्याबरोबर ती कुठच्याकुठे उडत गेली असती नी हाती लागली नसती. सोडये गुरुजीनी तत्परतेने पुढे होत आपली छत्री बाईंच्या डोक्यावर धरली. दरम्याने वरकाने धावत जावून उक्षीच्या झाळीत अडकलेली छत्री अच्चळ सोडवून आणली. कसनुसा चेहेरा करीत बाई म्हणाल्या, “ गुरुजीना माझ्यामुळे भिजावं लागलं...” त्यावर ते बोलले , “ मगाचच्या कावटीत भिजलोच होतो, फक्त डोकं थोडं कोरड होतं इतकच...”

वाऱ्या पावसाचा जोर वाढायला लागल्यावर मंडळीनी एका गोठणी लगत कुंभ्याच्या चवधार झाडाखाली बसल घेतली. वाऱ्याचे सोंऽऽसोंऽऽ

आवाज येत होते. वाऱ्याच्या जोराबरोबर पावसाच्या किरांगळी एवढ्या धारांचे सपकारे बसायचे. ऊंचावरचा टापू असल्यामुळे दिशा गुडुप काळोखात झाकलेल्या नव्हत्या. “पावसाचं इतकं रौद्र भीषण तांडव मी पहिल्यानेच पहातेय... ” बाई बोलल्या. त्यावर वरक म्हणाला, “तरी ह्यां काय जोवूळ (वादळ) न्हूय. आमच्या हैच्या सड्यावर खाडीच्या नस्तारसून बारमाही असो वारो व्हावता. आत्ता तुमी हास म्हनून आमी थांबलाव... नायतर आमी चाल मारली आसती.” खूप वेळानंतर पावसाचा जोर जरासा कमी झाला. एकूण रागरंग पाहता पाऊस थांबण्याचं चिन्ह दिसत नव्हतं. बराच वेळ बसून कंटाळायलाही झाळं होतं म्हणून बाई धीर करून उठल्या. “चला मंडळी, पाऊस जरा ओसवला आहे . तो थांबण्याची वाट बघित राहिलं तर इथेच संध्याकाळ होईल. ”

परिस्थितीला सरावल्यामुळे बाई नेटाने चालसूर झालेल्या. वाटेत फक्त एकदाच दोन मिनिटं ते सुद्धा पाणी पिण्यापुरत्या थांबल्या. अधून मधून सोडये गुरुजी , वरक जरा दम घेवूया का विचारायचे पण बाईनी निर्धाराने नकार दिला. सड्या माळावरून छत्री सांभाळीत चालायचं एक वेगळं तंत्र असतं ते आता बाईना चांगलं अवगत झालेलं ... त्यामुळे अधून मधून सोसाट्याच्या वाऱ्याच्या कावट्या आल्या तरी बाईनी छत्रीवरची पकड निसटू दिली नाही. किती वेळ झाला ... अजून किती चालणं बाकी आहे हे प्रश्न बाईनी मोठ्या निग्रहाने ओठाबाहेर येवू दिले नाहीत. एक मोडण घेवून पुढे गेल्यावर किंचीत थांबून अंगुली निर्देश करीत वरक म्हणाला, “तो बगा... आमचो मांगर, आपून थय जरा दम खावया... ” आता सगळयानाच जरा हायसं वाटलं. पाचेक मिनिटात सगळेजण वरकाच्या मांगरात शिरले.

पावसाळी दिवसात दुपारी नी संध्याकाळी शेतकरी हंड्यावर कायम पाणी तापत ठेवतात . वरकाच्या आयेने जर्मनचं भगुलं भरून गरम पाणि आणलं. दोन तीन लोटे शेकत शेकत ओतल्यावर शीण-भाग कमी झाला. ओसरीवर परसा होता त्या खाली विस्तव पेटलेलाच होता. कोपऱ्यातल्या भाताच्या मोटा पुढे ओढून मंडळी त्यावर टेकली. वरकाच्या आईने सगळ्यांना दुधाचे पेले भरून आणले. चुलीवर खरपूस तापलेलं शेरडाचं दूध खूपच चविष्ट होतं. घरातली सगळी माणसं तिकडे लांब खरीत लावणी लावायला गेलेली होती. त्यांचं जेवण तिकडेच पोच करायचं होतं.वरकाने मंडळीना जेवायचा आग्रह केला. पण अजून पाऊण तास पल्ला गाठणं बाकी होतं आणि पावशेरी भांडं भरून प्यालेल्या दुधामुळे पोटाला चांगला आधार मिळाला होता. अधिक वेळ न करता मंडळी बाहेर पडली.

अर्धा घंटा पल्ला गाठल्यावर नावळ्याची घाटी सुरु झाली. आता पाऊसही ओसवला होता. मोडणा मोडणाची जीव घेणा चढ असलेली ती घाटी आसमंतात प्रसिद्ध होती. अर्थात या खेपी उतरून जायचं असल्याने विशेष कठिण नव्हतं. सडावळीचं पाणि वेगाने वहात होतं. अध्ये मध्ये व्हावटीमुळे चार पडले असले तरी संपूर्ण घाटीबांधीव असल्यामुळे चालायला अडथळा येत नसे. पाऊण घाटी उतरल्यावर कोंबड्याच्या आरवण्याचे आवाज सुरु झाले. गावदर जवळ आली... या विचाराने बाईना हायसं वाटलं. पंधरा मिनिटात माणसं जगुभाऊ दातारांच्या वाड्यात पोचली. जगुभाऊ गावचे खोत असल्याने गावात येणारे सरकारी अधिकारी मुक्कामाला त्यांच्याकडे थांबायचा प्रघात होता. वरकाला पाहिल्यावर कोणीतरी सरकारी अधिकारी असणार हे ताडून जगूभाऊ

हसतमुखाने स्वागताला पुढे आले. लगेच ओसरीवर पायाऱ्यांसमोरच्या घंगाळात गड्याने गरम पाणी आणून ओतले.

शाळा तपासणीसाठी बाई आल्या आहेत हे कळताच खोतीण बाई ओसरीवर आल्या आणि हात जोडून त्यानी म्हपणकर बाईना आत न्हेलं. पावसात चिंब भिजलेल्या बाईना त्यानी सरळ न्हाणी घरात न्हेलं . त्याना हो नाही म्हणायची सवडच दिली नाही. चुरचुरीत वाळलेले दोन पंचे दांडीवर होते. बाईंची आंघोळ झाल्यावर कामवालीने त्यांचे कपडे पिळून मागच्या पडकीत बायका माणसांसाठी असलेल्या परशावर वाळत घातले. मंडळी वाड्यावर पोचली तेंव्हा सव्वाबारा वाजले होते. तिथून जवळच्याच गुरव वाडीत जंबारी नंबर एक च्या शाळेचे मुख्याध्यापक राणे गुरुजी बिऱ्हाड करून रहात त्याना भाऊंच्या गड्याने वर्दी दिली नी आश्चर्याने थक्क होत दहाव्या मिनीटाला राणे गुरुजी वाड्यात दाखल झाले. सोडये गुरुजींच घर चिवार वाडीत होतं. राणे गुरुजी आले, नी म्हापणकर बाईंशी त्यांची बोलाचाली झाल्यावर सोडये गुरुजी आपल्या घरी जायला बाहेर पडले. पण खोतानी त्याना आग्रह करून जेवायला थांबवून घेतलं.

दुपारी अडीज वाजता उर्दू शाळेत चौकशी सुरु करायची होती. प्रोसिजर प्रमाणे गावचे सरपंच , पोलिस पाटील आणि तीन ग्रामस्थ पंच म्हणून असणे बंधनकारक होते. जगूभाऊ स्वत:च पोलिस पाटिल होते. तीन पंचांपैकी एक राणे गुरुजी होते. अन्य दोघे आणि सरपंच दादा प्रभु याना जगुभाऊनी गड्या मार्फत निरोप दिला. मंडळींची जेवणं उरकताहेत तोपर्यंत दादा प्रभु आणि दोन पंच वाड्यावर दाखल झाले. ते आले आणि सगळा लवाजमा उर्दु शालेकडे

रवाना झाला. ते मुसलमान वाड्यात पोहोचले त्याच वेळी शाळेची घंटा ऐकू आली. मंडळी शाळेत पोहोचली तेंव्हा शाळेत वर्षभरापूर्वी उमेदवार म्हणून दाखल झालेला इंगळवाडीतला अली मास्तर जाग्यावर. बाकी मुख्याध्यापकांसह सहा शिक्षकांपैकी एकही महभाग हजर नव्हता. जगूभाऊनी म्हापणकर बाईंची ओळख करून दिली आणि मुख्याध्यापकांविरुद्ध ग्रामस्थांचा तक्रार अर्ज गेल्यामुळे शिक्षण मंत्र्यांमार्फत चौकशी कारवाई होणार आहे असं सांगताच. हसन मास्तर अक्षरश: थरथर कापायला लागला. पोरानी कुतुहलाने आलेल्या माणसांभोवती कोंढाळं केलं होतं. पोरं हसन मास्तरांची अवस्था बघून खो खो हसायला लागताच राणे गुरुजी आणि सोडये गुरुजीना मुलाना बाजुच्या वर्गांमध्ये गप्प बसवून ठेवायला सांगितल. पुढच्या पाच मिनीटात शिक्षकी पेशात मुरलेल्या त्या गुरुजीनी सगळा कोलाहल एकदाचा शांत केला.

हसन मास्तराना समजावल्यावर बाईनी त्याना शाळेचा मस्टर आणायला सांगितला. शाळेच्या मस्टरवर सात शिक्षकांची नांव होती त्यापैकी फक्त एक शिक्षक हजर होते. पैकी चार शिक्षकांच्या त्या दिवशी सकाळ सत्रापर्यंत सह्या होत्या.दोन शिक्षकांच्या तीन दिवसापूर्वी पर्यंत सह्या नव्हत्या. आणि मुख्याध्यापकांनी जुलै सुरु झाल्यानंतर एकही दिवस सही केलेलीच नव्हती. बाईनी हसन मास्तराना दुपार सत्राची सही करायला सांगून बजावले, “तुम्ही उमेदवार अहात आणि वेळेवर शाळा उघडलात, आम्ही वाडीत आलो तेंव्हा आम्हाला शाळा उघडल्याचा गजर ऐकू आला म्हणून सही करायची मुभा देते. पण यापुढे कटाक्षाने ध्यानात ठेवा, शालेत वेळे आधी पाच मिनीटे यायचे आणि आल्याबरोबर मस्टरवर सही करायची. ” त्यांची सही करून झाल्यावर त्या म्हणाल्या, “आतामी काय सांगते ते लक्ष पूर्वक ऐका. चौकशी अधिकारी म्हणून

मी तुम्हाला जे प्रश्न विचारीन त्याची सत्य आणि सत्य उत्तरेच द्यायची. कोणाची तरफदारी करण्यासाठी कोणाला वाचवण्यासाठी खोटे सांगाल तर गुन्हेगार बाजुला तुम्ही निष्कारण अडकाल. उमेदवार अहात, तुमची नोकरी जाईल. एखादी बाब उघड करून आपण अडचणीत येवू असे वाटले तर या प्रश्नाचे उत्तर मला देता येत नाही... नीटसे आठवत नाही असे सांगून निभावून नेता येईल पण कोणासाठी तरी खोटी दिशाभूल करणारी माहिती देवू नका.” मग प्रोसिजर प्रमाणे चौकशीचे काम सुरु झाले.

मुख्याध्याकांसह ज्यांच्या सह्या नव्हत्या त्या पैकी एकाचाही अर्ज दप्तरी नव्हता. सहा अनुपस्थित शिक्षकांपैकी तिघेजण सकाळ सत्रात हजर होते. दोन जण आदल्या दिवशी हजर होते. मात्र त्यानी आज रोजीचा रजा अर्ज किंवा अनुपस्थिती बाबत तोंडी निरोपही देलेला नव्हता. हसन मास्तरांकडे दुसरीचा वर्ग दिलेला होता . त्या वर्गाची आज अखेर उपस्थिती नोंद केलेली होती. मात्र इतर सर्व वर्गांचे बाबत जुलै आरंभी तीन चार दिवस वगळता उपस्थिती नोंद केलेली नव्हती. जनरल उपस्थिती पट लेखन हसन मास्तर कडे सोपविलेले असले तरी इतर वर्गांचे पट अपूर्ण असल्याने त्याना जबाबदार धरणे अयोग्य ठरले असते. इतर दप्तराबाबतही जुलै महातील नोंदी पूर्ण नव्हत्या. हे सगळे रामायण घडत असता शाळा वाडीत मध्यवर्ती जागी असल्यामुळे पटेकर मास्तराच्या चौकशीसाठी मोठ्या बाई आल्या आहेत ही बातमी फुटली आणि वाडीतल्या लोकांची झुंबड शाळेभोवती जमली.

मुख्याध्यापक अली मास्तर त्याच दिवशी पहाटे विजयदुर्गात गेलेले होते. मात्र वाडीतच होते. साहेबीण बाई चौकशीला आल्याचे वृत्त कळताच रशीद

मास्तर, हरून मास्तर, आबिद मास्तर, मुसा मास्तर आणि जैनु मास्तर घाबऱ्या घुबऱ्या शाळेकडे धावले. मुसा आणि जैनु मास्तर बाईना ओळखणारे... त्यानी निर्लज्जपणे बाईना दंडवत घालून हस्त हसत , “तुमी इलाव होय... आमाशी वाटला का कोन मोटे सायब आयलेसत का काय...” त्यावर जरबेच्या आवाजात म्हापणकर बाई म्हणाल्या, “कोण तुम्ही? इथे काय काम आहे तुमचं? ” त्यावर दोघेही वरमले. सरपंच दादा प्रभु म्हणाले, “हे या शाळेतले गुरुजी जैनुद्दिन काजवे आणि इम्तियाज मुसा.” त्यावर बाई म्हणाल्या, “अस्सं ... काय हो गुरुजी दुपारी शाळा किती वाजता उघडते हो? ” त्यावर ओशाळं हसत मुसा मास्तर बोलले, “नाय म्हंजे आमाला उशीर झायलाशे... म्हंजे तेचा काय कि माजा बाबा दोन रोज झाले बीमार हाय... तेचा दोपारी जरा जास्त झाला म्हंताना जैनु मास्तर माज्ये घरी बाबाला भेटुला आयले... नायतर अल्ला कसम आमी कदीच उसरा न्हाय येते.” आदल्या दिवशीच्या अनुपस्थिती बाबतही मुसा मास्तरानी थातुर मातुर स्पष्टीकरण देवून एक बार गलती माफ करो अशी आर्जवं करून पाहिली . त्याना जरबेत घेत बाई म्हणाल्या, “ मी शिक्षणाधिकारी साहेबांचे खास अधिकार पत्र घेवून चौकशी साठी आलेली आहे. तुम्ही तमीज सांभाळून बात करा. तुम्ही आज हजर होणार असाल तर आधी मस्टरवर सही करा.”

त्यांच्या सही पुढे बाईनी लेट मार्क केला आणि त्याना त्यांच्या वर्गासह शाळेची उपस्थिती घेवून मुलाना घरी सोडायची सुचना दिली. दरम्याने या नाट्याचा कर्ता करविता सुलेमान शाळेत आला. तक्रार अर्जाची शहनिशा करून घेवून तसा रिपोर्ट कार्याकडे द्यायचा असल्यामुळे बाईना त्याच्यासह संबंधित अर्जावर सह्या आंगठे देणारांपैकी जमेल तेवढ्या लोकांची भेट घेवून

त्यांचे जबाब नोंद करून घ्यायचेच होते. हे समजल्यावर दुसरे दिवशी दुपार पर्यंत संबंधितांना हजर करायची जिम्मेदारी त्याने घेतली. मग गुरव कारकूनाला रिपोर्ट लिहायला बसवला. बाई एकेक मुद्दा सांगत होत्या आणि गुरव तो टिपून घेत होता. दरम्याने शाळेच्च्या इतर दप्तराची तापासणी त्या करीत होत्या. हे काम रात्री उशिरा पर्यंत जागून एक हाती पूर्ण होणे गरजेचे होते ही कल्पना राणे गुरुजी अनुभवी असल्याने त्याना होती. म्हणून त्यानी सरपंचाना कल्पना देवून दोन पेट्रोमॅक्स आणवून घेतल्या. तसेच बाईंच्या रात्रीच्या जेवणखाण निवासा ची सोय जवळच्या बाबा ठाकुरांच्या घरात केली. त्यांचा अंदाज खरा ठरला. रात्री दोन वाजता काम पूर्ण करून बाई झोपल्या.

दुसरे दिवशी सकाळी सात वाजेतो आंघोळ वगैरे आवरून बाई तयार झाल्यावर ठाकरीण काकूनी केलेल्या कांदा पोह्यांचा नाष्टा करून साडे सातला शाळा उघडण्यापूर्वी सगळा लवाजमा शाळेत पोहोचला. आज मुख्याध्यापकांसह सगळे शिक्षक हजर होते. मस्टरसह सगळे दप्तर ठेवलेल्या वर्गाची चावी बाईंकडे होती ती घेवून वरक शिपायाने ती खोली उघडली. मग शिरस्त्याप्रमाणे प्रार्थना परिपाठ झाला . आजही चौकशी कामी जाब जबाब व्हायचे असल्यामुळे हजेरी घेवून मुलाना घरी सोडायची सुचना बाईनी दिली. मुले घरी गेल्यावर सर्व शिक्षकाना बोलावून बाईनी आजच्या सह्या करायला सांगून मस्टर पुन्हा ताब्यात घेतला. मग पंचांसमक्ष गुरव कारकूनाने रिपोर्ट वाचून दाखवला. मस्टर आणि इतर रेकॉर्ड संदर्भात रिपोर्ट मधल्या नोंदी वाचल्यावर त्या यथातथ्य आहेत का ? याची खातरजमा करून घ्यायची सुचना पंचाना दिली. दप्तर विषयक अहवालावर पंचांच्या सह्या झाल्यावर सर्व रेकॉर्ड

हेडमास्तरांकडे सुपूर्द केल्यावर जाब जबाब घ्यायचे काम सुरु झाले. तक्रार अर्जात उल्लेखित तीन चार अपवाद वगळता झाडून सगळे लोक हजर होते.

निगरगट्ट पटेकर मास्तराला दणका देणारी कोण ही बाई? तिला बघायलाही बाया पुरुष मंडळी आलेली होती. गावाच्या आजपर्यंतच्या इतिहासात स्वातंत्र्यपूर्व काळात फक्त एकदाच सारा माफीच्या प्रकरणी मामलेदार खारेपाटण मार्गे लॉन्चने आले होते. बाकी कोणीही सरकारी अधिकारी कसल्याच कामाला गावात आलेला नव्हता. शाळांमध्ये तर नवीन बदली होवून आलेले गुरुजी वगळता शिक्षण विभागातला एकही अधिकारी कधिच इकडे फिरकलेलाही नव्हता. त्यामुळे पटेकर मास्तराची चौकशी ही ग्रामस्थांसाठी सनसनाटी घटना होती. अर्जदारांचे जाबजबाब झाल्यावर शिक्षकांचे जाबजबाब सुरु झाले.

सर्वात आधी उमेदवार हसन मास्तराचा जबाब झाला. बाईनी दिलेली सुचना तंतोतंत पालन करीत त्याने बाईनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. आदल्या दिवशी उशिराने आलेल्या शिक्षकानी थातूर मातुर स्पष्टीकरण दिले.




तीच री चौकशीच्या दिवसापूर्वी तीन दिवस अनुपस्थित असणारानीही ओढली. मुसा मास्तराने शक्कल चालवून आपण टेबलाच्या ड्रॉवर मध्ये रजेचा अर्ज ठेवला होता. अले मास्तराना ही गोष्ट सांगितली होती पण त्यानी घाबरून काही सांग़णे टाळले. अशी मखलाशी करीत पंचांसमोर टेबलाच्या खणातून अर्ज आणून दाखवला. पण हसन मास्तरानी ही बाब साफ नाकबूल करीत मुसा गुरुजीनी सकाळी तो अर्ज गुपचुप ठेवून हा बनाव रचून तशी जबानी द्यायची आपल्याला गळ घातली असे सांगून मुसा मास्तराचे पितळ उघडे पाडले.

पटेकर मास्तराने तर कालचा चौकशीचा दिवस वगळता त्या पूर्वीच्या सर्व कामकाजाच्या दिवशी आपण हजर होतो. मात्र सह्या करायचे विसरून गेलो. या संदर्भात आपल्या सहकारी शिक्षकाना, ग्रामस्थाना विचारून शहनिशा करून घेण्याची विनंती केली.आदल्या दिवशी केलेल्या चौकशीत काही मुलानी शाळेचे मुख्याध्यापक कधितरी फक्त प्रार्थनेच्या वेळी शाळेत असतात नी त्यानंतर ते दात्यांच्या पेढीवर आणि उरलेला दिवसभर कौलाच्या वखारीत पत्ते खेळतात असे सांगितले होते. तसेच तक्रारदार ग्रामस्थानीही अशीच माहिती अर्जात आणि प्रत्यक्ष चौकशीच्या वेळीही सांगितली. त्यांच्या सहकारी वर्गानेही प्रार्थना झाल्यावर आम्ही आपापल्या वर्गावर असतो त्यामुळे मुख्याध्यापक पूर्णवेळ शाळेत असतात की नाही सांगू शकत नाही, असेच जबाब नोंदवले. दरम्याने पट्टेकर मास्तरांच्या दोन्ही पत्नी शाळेत आल्या. मास्तरानी अंगुली निर्देश केल्यावर पुढे होवून त्यानी बाईंचे पाय धरले. मेव्हणीशी लग्न केल्याचा राग धरून सुलेमान ने बदला घेण्यासाठी हा खोटा अर्ज केलेला आहे, आमचा मच्छीचा धंदा लोकांच्या डोळयावर येतो. म्हणून अर्ज करणारांची आमच्याशी दुष्मनी आहे. असे गाऱ्हाणे नोंदले.

संध्याकाळला चाळीस पानी पक्का अहवाल तयार करून त्यावर पंचांच्या सह्या झाल्यावर चौकशीचे काम आटोपले. रात्री पटेकर मास्तर फ़ातुला घेवून खोतांकडे रदबदली करायला आलेला. मोठ्या रक्कमेचे आमिष दाखवून त्याने खोताना गळ घातली. ते पोलिस पाटील असल्यामुळे अशा प्रकरणात या स्टेजवर गेलेले प्रकरण दाबता येत नाही. तसा काही प्रयत्न केला तर बाई निस्पृह आहेत... गोष्ट आंगलट येईल . एकूण प्रकरणाचा विचार करता पटेकर मास्तराची बाजू नमती आहे. काही तरी खोटे नाटे स्पष्टीकरण देवून अधिक

अडकण्या पेक्षा खात्यामार्फत काय कारवाई होते हे कळेपर्यंत दम काढणे शहाणपणाचे ठरेल असा सल्ला देवून त्याला वाटेला लावला.

शिक्षणाधिकारी साहेब म्हापणकरबाईनी दिलेला चौकशी अहवाल वाचून कमालीचे खूष झाले. त्यानी पुढच्या कार्यवाहीचे आदेश दिले. संबंधितांचे अनुपस्थित दिवस बिनपगारी करून वेतन कापण्यात आले. तीनही शिक्षकांची शिक्षेदाखल मंडणगड /खेड तालुक्यातल्या टोकाच्या शाळांमध्ये बदली करण्यात आली. पटेकर मास्तराची एक वेतनवाढही प्रलंबित करण्यात आली. दरम्यानच्या काळात कोणा कोणाशी सल्ला मसलती करून तिघाही शिक्षकानी योग्य मार्ग निवडले होते. बदली झालेल्या शाळेत हजर होवून तिघानीही दीर्घ मुदतीच्या रजा घेतल्या. पटेकर मास्तराना मिळालेली शाळा जंबारी सारखीच एका बाजुला, संपर्क करायला दुस्तर होती. पाच वर्षात पटेकर मास्तर जेमतेम पंचवीस दिवस त्या शाळेत हजर असतील नसतील ... महिन्याचा पगार घ्यायला मात्र ते हुकमी खेप घालीत. पाच वर्षे खेड मधली शाळा फाट्यावर मारून कधी जंबारीत तर कधी विजयदूर्गात ते राजरोस फिरायचे. पाच वर्षानी जिल्हा डिस्ट्रिक्ट बोर्डात पटेकर मास्तरांच्या खालाचे मेव्हणे, मुसाकाजीचे बदरुद्दिन होडेकर मेंबर झाल्यावर आठ दिवसात पटेकर मास्तरांच्या बदलीचा हुकुम निघाला आणि मास्तर पुन्हा जंबारी उर्दू स्कूलात मुख्याध्यापक म्हणून हजर झाले.

**********

# ४. कोकणी हिसका

जॉर्डन खुराना केटा सप्लायर्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर विनोद घंटांची ऑडी कॉलेजच्या मेनगेट समोर आली नी ड्रायव्हरने खिडकीतून डोकं बाहेर काढताच सिक्युरिटी गार्ड साळुंखे कडक सॅल्युट मारून पुढे जात, “लेफ्ट टर्न लेकर नीले रंगके बिल्डिंग की ओर जाओ” असे सांगून बाजुला झाला. त्या जागी दुसरा कोणी असता तर सिक्युरिटी विंडो समोर जाऊन कॉलेजचं किंवा मॅनेजमेंटच पत्र दाखवून सिक्युरिटीने विचारलेली माहिती सांगून ती रजिस्टरला नोंदून झाल्यावर इथे साईन मारा म्हणून दाखवलेल्या रकान्यात सही केल्याशिवाय कोणाला प्रिमायसिसमध्ये जाता येत नसे. व्ही.आय.पी. यायचा तेंव्हा अॅडमिनिस्ट्रेशन सेल कडून आगावु इन्फॉर्मेशन असायची. अशा व्हिजिटर्सना सॅल्युट मारून स्वागत केलं जायचं. दहा वाजता बी.ई.च्या आठ मेरिट होल्डर्सचा कॅम्पस इंटरव्ह्यू लागलेला होता. मेनगेटच्या डाव्या बाजूला असलेल्या कॅंटिन समोर थांबलेले स्कॉलर्स लक्ष ठेवूनच होते. सिक्युरिटी जवळ कसलेही सोपस्कार न होता ऑडी आत आली नी थेट अॅडमिनिस्ट्रेशन सेलकडे जाऊन थांबली तेंव्हाच जे.के.के. कंपनीचे मॅनेजिंग डिरेक्टर आल्याचं स्कॉलर्सनी ओळखलं.

पावणे दहा वाजता सुपरिटेंडंट नायकवडींचा शिपाई गोंदू वेटिंग हॉल मध्ये आला नी त्याने लिस्ट वाचायला सुरुवात केली. तन्वी, निलिमा, आस्मा, तृप्ती या पोरी नी अमेय, दीपक, विक्रम, सुमित हे पोरगे अपटुडेट नॉर्मल कॉश्चुम

मध्ये आलेले होते. लिस्टमध्ये ज्याच्या त्याच्या नावासमोर टिकमार्क करून गोंदु आत गेला.बरोबर दहा वाजता इंटरव्ह्यू सुरू झाला.विक्रमचा तिसरा नंबर होता. डिरेक्टर घंटा (त्यांचं नाव गोडबोले एचोनी सांगितलेलं होतं) नी त्यांच्या सोबत असलेल्या कुणी मॅडम दोघानीही प्रश्न विचारले. बहूतेक सग़ळे प्रश्न बीई च्या सिलॅबस मधिल टॉपिक्सवर आधारलेले होते.त्यांची बिनचूक उत्तरं त्याने दिली. फक्त दोनच प्रश्न हॉबीज कोणते आहेत? नी सॅलरी एक्स्पेक्टेशन्स किती? ऑउट ऑफ सिलॅबस होते. विक्रम मध्यमवर्गीय कुटूंबातून आलेला. रात्री गप्पा मारताना बाबा त्याला म्हणाले होते की, सॅलरी एक्स्पेक्टेशन्स विचारलेनी तर सरळ सांग की, “आपल्या कंपनीचं रेप्युटेशन पाहता मला करियरची सुरुवात करायला मिळणं हेच मी भाग्य मानतो. अशा रेप्युटेड कंपनीत माझ्या कामाचे योग्य रिटर्न्स मिळतील असा मला भरवसा आहे.” त्याचं हे उत्तर घंटा साहेबाना अपिल झालय् हे विक्रमने ओळखलं. सोबतच्या मॅडम मात्र म्हणाल्या की, कंपनी तुमच्याकडे अॅप्रेण्टीस म्हणूनच पाहाते. सुरुवातीला दोन तीन वर्षं तरी तुम्हाला मिनिमम वेजिसवर राबावं लागेल. तुम्ही अजून स्टुडंट अहात.बाहेर चौकशी केलीत तर आमच्यापेक्षा अॅट्रॅक्टीव्ह ऑफर देणाऱ्या फर्म्स आहेत. त्यावर विक्रम बोलला की, त्याने पूर्ण विचार करूनच ठरवलेल आहे. त्याला आधी एफिशियन्सी मिळवायची आहे आणि त्या साठी जे.के.के.मध्ये जॉब मिळवणं हे त्याचं स्वप्न आहे.

दोन वाजता रिझल्ट समजणार होता. इंटरव्ह्यू होईल तसतसा एकेक कॅण्डिडेट कॅन्टिनकडे जायचा. इंटरव्ह्यू देवून आलेल्यांपैकी कुणीच आपल्याला कोणते प्रश्न विचारले, त्यातल्या किती प्रश्नांची उत्तरं आपण दिली हे सांगणं टाळीत होता. इंटरव्ह्यू संपवून सगळे जमल्यावर जो तो मी अमूक हजार नी

क्वार्टर्स पाहिजे म्हणून सांगितलं असं सांगू लागला. तन्वी वगळता बहूतेकांचे आकडे चाळीस ते पन्नास या रेंजमधले होते. सगळ्यांचे आकडे ऐकल्यावर विक्रम म्हणाला कि, 'मी कंपनी देईल त्या सॅलरीवर काम करायला तयार आहे' असं सांगितलं. त्यावर सगळ्यानीच त्याला वेड्यात काढलं. तेव्हा मात्र डोळे मिचकावीत तो म्हणाला, मी टेनिस चॅम्पियनआहे. मी चेंडू त्यांच्या कोर्टमध्ये टाकलाय. ऑफर चांगली असेल तर विचार केला नी नसेल तर काखा वर केल्या. शेवटी कंपनीने जे ठरवलेलं असेल तेवढच देणार. आपली मागणी अवास्तव असेल तर ते सरळ फुटवणार. म्हणून मी धोरणानेच आकडा फोडला नाही. मार्केटमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या सगळया कंपन्यांमध्ये जे.के.के. ग्रूप प्रॉमिसिंग आहे असं आपले एच. ओ. पण मान्य करतात.

खरंतर आपल्या सारख्या आडबाजूच्या कॉलेजमध्ये कॅम्पस् इंटरव्ह्यू घ्यायलाच जेकेकेग्रूप तयार नव्हता. आपल्या मॅनेजमेंटमधले कोळसे पाटील साहेब हे सी.एम्. च्या पी. ए. चे साडू... म्हणून सी. एम. च्या शब्दाखातर कंपनी इथपर्यंत आली इतकंच, असं प्रिंसिपॉल सर पण म्हणाले ना? नी ते खरं आहे. तुमच्या स्कॉलर्सची एक्स्पेक्टेशन्स फार आहेत असं सांगून झटकून टाकण्यासाठीच त्यानी सॅलरीचा प्रश्न विचारला असावा हे मी बरोब्बर ओळखलं नी बॉल त्यांच्या कोर्टात टाकला.त्याचं हे बोलणं सर्वानीच ॲप्रिशिएट केलं. मेकॅनिकल इंजिनिअरिंग मध्ये खूप सॅच्युरेशन झालेलं होतं... खूप सिनीअर्स जॉबलेस होते ही वस्तुस्थिती होती. रिकामं बसून वेटिंग करण्या पेक्षा कट सॅलरीत रेप्युटेड फर्ममध्ये जॉब मिळवण हे शहाणपणाचं होतं. तन्वीची डिमांड तीस हजार म्हणजे इतरांपेक्षा खूप कमी. आता रिझल्ट स्पष्ट होता. चान्सेस दोघानाच होते. हे सगळ ऐकल्यावर आस्मा नी रितेश यानी सरळ कबूल

केलं की आपण विचारलेल्या प्रश्नांपैकी जेमतेम चार प्रश्नांची उत्तरं दिली, बाकी सरळ क्लीन बोल्ड. आस्मा रिझल्ट ऐकायलाही थांबली नाही.

दोन वाजता निकाल जाहिर झाला. विक्रम नी तन्वी दोघही सिलेक्ट झाली नी त्याना कंपनीच्या पॅनलने डिस्कशनसाठी बोलावलं. चेअरमन कोळसे पाटील साहेब, प्रिन्सिपॉल माने, एचओडी गोडबोलेसर हे सुद्धा उपस्थित होते.मॅनेजिंग डिरेक्टरनी चेअरमन साहेबांच्या हस्ते दोघाही कण्डीडेटस् ना अपॉइंट्मेंट लेटर्स दिली नी दहा दिवस मुदतीमध्ये जॉईन व्हायची ऑफर दिली. कॉलेजतर्फे तन्वी नी विक्रम याना बुके देऊन गौरव करण्यात आला.प्रोग्रॅम संपल्यावर दोघानीही लेटर वाचून पाहिलं. त्याना दोन वर्ष अॅप्रेण्टीस शीपवर नेमणूक दिलेली होती. तो पिरियड व्यवस्थित पूर्ण केल्यावर त्याना रेग्युलर स्टाफवर घेतलं जाणार होतं. या काळात त्याना दरमहा 35 हजार रुपये इन्सेंटिव्ह मिळणार होता. अॅप्रेण्टीस शीपच्या काळात त्याना कंपनीतर्फे सीडॅक कॉम्प्युटर कोर्स पूर्ण करायची फॅसिलिटी सुद्धा दिली होती.

कंपनीने दहा दिवसांचा पिरियड दिला असला तरी मुलं एव्हढी हौसावली होती की दोघही सहाव्या दिवशीच जॉईन झाली. पहिला पूर्ण दिवस रेकॉर्ड नी लिगल फॉर्मलिटिज पूर्ण करण्यातच संपला. त्यांच दैनंदिन दहा तासांच टाईट शेड्युल होतं. सकाळी नऊ ते सायंकाळी सात वाजेतो ट्रेनिंग होत. यात ९ ते ४ पर्यंत एक तास लंचब्रेक वगळता कंपनीच्या वेगवेगळया सेल मध्ये जॉब असायचा. ५ ते ७ या वेळेत आलटून पालटून मॅनेजमेंट वर लेक्चर्स किंवा कॉम्प्युटर ट्रेनिंग असायचं. दर चार दिवसानी असाईनमेंट पुरी करायची असत तेंव्हा रात्री ९ वाजता सुटका व्हायची. सकाळचा ब्रेकफास्ट, दुपारचं लंच, चार

वाजता लाईट स्नॅक्स एकदम दर्जेदार नी कंपनीतर्फ़े फ्री मिळायचं. रात्री नऊ वाजता क्वा ्र्टरवर रात्रीचा टिफिन पोचवला जायचा. कपडे धुवायला कंपनीचे लेबर्स होते. ते रूमवरून धुवायचे कपडे कलेक्ट करीत नी धूवून इस्त्री करून रूम वाईज वार्डरोब मध्ये व्यवस्थित ठेवून जात. प्रोग्राम रिगरस असला तरी इंटरेस्टींग होता. टाईम शेड्यूल शार्प असायचं नी अंमलबजावणी स्ट्रिक्ट असायची. चुकवाचुकवी टंगळ मंगळ अचूक पॉईंट आऊट केली जायची.

ॲप्रेण्टिसशीप संपली त्याच्या दुसऱ्याच दिवशी रवी खुरानानी आपल्या केबिनमध्ये बोलावून त्यांचं स्वागत केलं. विक्रमला बंगलोरला पोस्टिंग मिळालं. स्टार्टिंग सॅलरी पन्नास हजार नी त्या बाहेर जवळ जवळ वीस हजार रुपये वेगवेगळे अलाऊन्सिस कंपनीने ऑफर केल्यामुळे खुशीचा माहोल होता. विक्रम बंगलोरला रूजु झाला. विक्रमला कंपनीच्या वेगवेगळया प्रॉडक्ट्स चं डिझायनिंग करायचा मेन जॉब होता. विक्रम च्या हाताखाली चार टेक्निशियन्स होते. विक्रमने दिलेल्या लेआऊट प्रमाणे फायनल डिझायनिंग करून कॉम्पुटर प्रोग्रामिंग टेक्निशियन्स करायचे. जॉबना टाईम लिमिट असायचं. कारण इथून पुढे प्रत्यक्ष प्रॉडक्शन सेलमध्ये नियोजीत टार्गेट एवढे जॉब तयार करून डिस्पॅच केले जायचे नी निर्धारित टाईम लिमिटमध्ये ऑर्डर पूर्ण केली जायची. यात विलंब झाला तर ऑर्डर कॅन्सल व्हायचा धोका होता.

विक्रम हजर झाल्यावर त्याने पहिला ले आऊट प्रिपेअर केला. या पूर्वीची रेफरन्सिस पाहून सहा दिवसांचं टाईमलिमिट घालून त्या ले आऊट प्रमाणे फायनल डिझायनिंग आणि प्रोग्रॅमिंग साठी टेक्निशियन्सकडे दिला. चार दिवस झाल्यावर वर्क प्रोग्रेस पाहिला. जेमतेम निम्मे वर्कसुद्धा झालेलं नव्हतं. त्याने

चौघाही टेक्निशियन्सना चांगलं झापलं. टेक्निशियन्स पुरे पोचलेले होते. “ सर , हा जॉब फार कॉम्प्लिकेटेड आहे. त्यामानाने फार कमी टाईम दिलात तुम्ही.” असं त्यानी सांगितल्यावर विक्रमने पूर्वीची वर्क हिस्ट्री दाखवली. ती काळजीपूर्वक पाहिल्यावर एकजण म्हणाला, “पण सर तुम्ही दिलेल्या ले आऊट मध्ये तीन प्रोसेस फार वेगळ्या नी आम्हाला नवीनच आहेत त्यामुळे तुम्ही दिलेल्या टाईम स्पॅनमध्ये प्रोग्रॅमिंग पूर्ण करणं नाही जमणार. यापुढे प्लीज आमच्याशी कन्सल्ट करून टाईम शेड्यूल ठरवा.” त्याला घाम फुटला. वर्क प्रोटोकॉल प्रमाणे सबमिशनसाठी फारतर दोन दिवस ग्रेस पिरियड मिळाला असता पण विक्रमच्या प्रॉम्प्टनेस पुढे कदाचित एक क्रॉस मार्क आला असता.

आपला क्रू जाणिवपूर्वक आपल्याला खेळवतोय हे त्याने ओळखलं. ॲप्रेण्टिसशीप करीत असताना त्याने या सेलमधल्या टेक्निशियन्स पोरांचे उद्योग पाहिलेले होते. ती पोरं जॉब न करता गेम खेळत बसायची. एकदा त्याने विचारल्यावर त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, “सर, ही आमची वर्क पॉलिसी आहे. हा खरंतर एक दिवसाचा जॉब आहे पण आम्ही याच्या साठी सहा दिवसांचा कालावधि मागून घेतलाय.” त्यावर विक्रम अचंबित होऊन म्हणाला, “ हे सरळ सरळ चिटिंग आहे.” त्यावर मिळालेलं उत्तर ऐकून तो उडालाच, “सर ,आम्हाला इंजिनिअर्स सारखं लठ्ठ पॅकेज नाही मिळत. खरं तर प्रोग्रमिंग हे हार्ट ऑफ वर्क आहे. पण हे कोणच लक्षात घेत नाही. मरणार आम्ही पण क्रेडिट अपर रॅन्क मधले एम्प्लॉयी घेणार... नी एकदा हा जॉब कमी वेळेत करून दिला तर ती कायमची रीत होऊन बसेल नी आम्हाला कामाखाली मरायला होईल . म्हातारी मेल्याचं दु:ख नाही पण काळ सोकावता नये अशी आमची वर्क स्ट्रॅटेजी आहे. हा प्रायव्हेट सेक्टर आहे, मालक मंडळीनी ह्या फर्म्स कामगाराना रोजी

रोटी देण्यासाठी नव्हे तर कमीतकमी गुंतवणुकीत गबरगंड पैसा कमवण्यासाठी सुरू केल्यात."

पूर्वानुभव आठवता शहानिशा करून घेण्यासाठी त्याने प्लान केला. ऑफिस बॉय सुजित ला बोलावून घेतलं. त्याच्यासमोर दोनशे रुपये टाकून तो बोलला, "हे बघ जितू, मी आल्यापासून तू माझी एव्हढी खातिरदारी करतोस ना कि मी एकदम खूश आहे गड्या तुझ्यावर... माझं एक काम कर यार…"यावर खुशीत येवून जितू म्हणाला, "सर, बोलाना," मग विक्रम म्हणाला," अरे, मी या टेक्निशियन्सना जॉब दिलाय, आज चार दिवस झाले... पण अजून निम्मे काम पण झालेलं नाही ... ते टंगळ मंगळ करतायत ..." त्यावर त्याला थांबवीत जितू बोलला," सर, ते पाचही जण पूरे पोचलेले हायत... तुम्ही केबिनमध्ये असेपर्यंत काम केल्याचं नाटक करतात नी म[ाघारी गेम खेळत बसतात... तुम्ही येताना दिसला की पटकन विंडो बंद करतात...तुमचं काय काम आहे सर?" त्यावर " तू आत्ता बोललास ना? त्याच गोष्टीची मला खात्री करून घ्यायची होती. मी तुला याच गोष्टीवर लक्ष ठेवून मला टीप द्यायला सांगणार होतो...झालं माझं काम." तेंव्हा दोनशे रुपये परत करीत जितू बोलला, "सर ,ठेवा पैसे, मला कधि गरज पडेल तेंव्हा मागून घेईन. तुम्ही एवढे मोठे इंजिनिअर असून विश्वासाने बोललात ना माझ्याशी.. तेच माझ बक्षीस." त्या दिवशी विक्रम मुद्दाम इतर सेक्शन्समध्ये टाईमपास करत राहिला.लंचअवर पूर्वी केबिनकडे निघाला. विक्रमला कॉरिडॉर मधून येताना पाहताच एका टेक्निशियन ने बाजूच्याना कोपरखळी मारून सावध केलं त्यानी गेम बंद करून

जॉब ओपन केला. त्यांच्या कृति साळसूद असल्यातरी चेहेऱ्यावरचे भाव विक्रमने अचूक टिपले.

लंच अवरचा बझर झाला. पाचही टेक्निशियन्स लंच घ्यायला कॅंटिनकडे निघाले. तेंव्हा जितू येऊन म्हणाला, "साहेब तुम्ही बाहेर गेल्यापासून सगळेजन गेमा खेळत होते, तुमाला येताना बगितल्यावर त्यानी गेम बंद केले." ते परत आल्यावर विक्रमने वर्क रिपोर्ट मागितला. त्याचा अंदाज नी जीतूने दिलेली टीप खरी होती.जॉब काडीभरही पुढे सरकलेला नव्हता. "दोघानी डिझायनिंगवर वर्क करा नी फायनलाईज केलेला एरिया बाकीच्याना देऊन प्रोग्रॅमिंग सुरु कर. असं केलत तर एखादा दिवस जादा दिला तरी जॉब पुरा होईल." त्याची ही सुचना पण त्यानी उडवून लावली." पण सर, डिझायनिंग़ मध्ये थोडासा जरी बदल झाला तरी सगळं प्रोग्रॅमिंग डिस्टर्ब होतं नी सगळ्या कष्टावर पाणी पडतं... त्यामुळे मग एवढ डिस्टर्ब व्हायला होतं ना की तो जॉब पुन्हा हातात घेणं ही नको वाटतं.प्लीज सर तुम्ही आमचं ऐका... पाहिजे तर आमच्यापैकी कुणीतरी असोशिएट डायरेक्टरना भेटून टाईम शेड्युल वाढवून घेतो हवं तर, या पूर्वीही खुपदा जमखंडिकर साहेबानी आम्हाला टाईम शेड्यूल वाढवून दिलय...." आता मात्र विक्रमचा संयम तुटला. महद प्रयासाने आवाज न चढू देता तो म्हणाला,"टाईम शेड्यूल वाढवणं माझ्या अखत्यारित आहे, त्यासाठी साहेबांना भेटायची जरूरी नाही... एक्स्टेण्डेड टाईम स्पॅन मध्येही जॉब नाही पूर्ण झाला तर साहेबांचं ॲप्रूव्हल घ्यायला लागतं, नी तशी वेळ आली तर मी ते करीन, त्या साठी तुम्ही सराना भेटायची जरूरी नाही.आता मी काय सांगतो ऐका, जॉब पूर्ण होईपर्यंत लंच ब्रेक पूर्वी नी ऑफिस अवर संपताना प्रत्येकाने प्रोग्रेस रिपोर्ट ठेवा,

मी मागेन तेंव्हा ते मला द्या. फायनल वर्क झालं कि रिपोर्ट करा तो पर्यंत मी वाट पहात राहातो. मी माझ्या अधिकारात एवढंच करू शकतो.”

काहीही झालं तरी टाईम शेड्यूल वाढवून न देता जॉब पूर्ण करायचाच या जिद्दिने तो कामाला लागला. त्याने जॉब दिल्यापासून चौघानीही केलेल्या कामाचा डेटा मागून घेतला होता तो आपल्याकडे सेव्ह केला, नी तो स्वत:कामाला लागला. प्रथम त्याने डिझायनिंग करायला घेतलं.हे काम म्हणजे त्याच्या हातचा मळ... तीन तासात करेक्ट डिझाईन करून झालं. पुढचा प्रोग्रॅमिंगचा जॉब जरा किचकट , कंटाळवाणा नी वेळकाढू होता. ऑफिस अवर्स संपले नी एम्प्लॉईज बाहेर पडले. पाच मिनिटं वाट बघून जितू आला. “सर , तुम्ही थांबत असलात तर मी पण थांबतो...” त्याला जायला सांगून तो कॉफीमारून आला. अॅडमिनिस्ट्रेशन सेक्शन बंद झालातरी वर्क सेक्टर तीन शिफ्ट्मध्ये सुरू असायचा. त्याने प्रोसिजर प्रमाणे आपण उशिरा पर्यंत थांबणार असल्याचा रिपोर्ट रिसेप्शन काऊंटरला केला. क्वार्टर्सवर न जाता कंपनीच्या गेस्टरूम मध्येच झोपायच असं ठरवून गेस्टरूमची चावी मागवून घेतली. मग त्याने एकतानतेने जॉब प्रोग्रॅमिंग वर्क सुरु केलं. आज जेवायला जायचाहि मुड नव्हता. पहाटे तीन वाजता जवळ जवळ ८०% काम पूर्ण होत आलं. मग मात्र केलेलं काम सेव्ह करून आळोखे पिळोखे देत तो उठला.

सकाळी दहाला जाग आली. उठून आंघोळ उरकून तो कॅंटिन मध्ये गेला. गरमागरम साबू वडा नी कॉफी घेऊन शार्प टायमिंगला केबिनमध्ये शिरला. पुढच्या दोन तासात प्रोग्रॅमिंग कंप्लिट करून जॉब हातावेगळा केला. मग सगळा जॉब हिस्टरी डेटा नी डिझायनिंगसह प्रोग्रॅम पेन ड्राइव्ह वर कॉपी करून तो

जमखंडिकर साहेबांच्या केबिन मध्ये शिरला. जॉब ले आऊट टेक्निशियन्सकडे दिल्यापासून तो आपण तो जॉब कसा पूर्ण केला याचं रिपोर्टिंग करून सगळा एविडन्स पेन ड्राईव्हमधून आणला असल्याचं सांगितलं. मग पेन ड्राईव्ह त्यांच्या लॅपटॉपला जोडून दोन्ही फोल्डर कॉपी करून सरांच्या डेस्कटॉपवर पेस्ट केले. सरानी जॉब चा फ़ोल्डर ओपन केला नी अर्धा तास चेक करून आपल्या रेकमेंडेशन रिमार्क सह वर्क सेक्टरकडे फॉरवर्ड केला. मग कॉफी ची ऑर्डर देऊन ते बोलू लागले.“यू सी माय यंग चॅप, इथे तुझा नव्यानेच जॉब सुरु झालाय. टेक्निशियन्स कंपनीचे पर्मनंट एम्प्लॉयी आहेत. तू सांगतोस ती फॅक्ट आहे. तुझ्याकडे स्ट्रॉंग एव्हिडन्स ही आहे. पण तरीही त्यांची कान उघाडणी करणं या पलिकडे काही ॲक्शन घेण कठिण आहे.

त्याना वॉर्निंग दिली तर ते राजरोसपणे तुझ्याशी असहकार करतील. या वेळी तू जिद्दिने जॉब पूर्ण करून दाखवलास ही रिमार्केबल फॅक्ट आहे. पण प्रत्येकवेळी तुला हे जमायच नाही. यू रिलाय ऑन देम. हे टीम वर्क आहे. ज्याला जे जसं जमेल तसं तो करणार. कोणाची एफिशियन्सी वाढवता येत नाही. तू भले वर्क स्ट्रॅटेजीचं ट्रेनिंग देशिल, स्किल डेव्हलप करायचा सराव देशिल पण ते किती प्रमाणात वर्क आऊट करायचं हे ठरवायला ज्याचा तो मुखत्यार आहे. डोण्ट गेट नर्वस माय यंग बॉय. पण झोपलेल्याला जाग़ं करता येतं, झोपेचं सोंग घेणाऱ्याला उठवता येत नाही. जे आहे ते नाईलाजाने स्वीकारणं भाग आहे.या अशा सिच्युएशन्स मी यापूर्वी फेस केल्यात नी आजही करतोय. आय कमिट माय डिफीट ॲण्ड सरेंडर बिफोर सच सिच्युएशन्स.”

यातलं गांभिर्य लक्षाित येऊन विक्रम भलताच दिस्टर्ब झाला.

“आय ॲम सॉरी सर, आय ॲम ॲग्री विथ यू ! फॉर टाईम बी ईंग वी कॅन नायदर चेंज नॉर कंट्रोल द सिच्युएशन. पण माझा तसा प्रयत्न मात्र नक्की राहील. निदान कामाच्या वेळेत त्यांच गेम खेळणं बंद करणं यावर तरी मी काहीतरी सोल्युशन नक्की शोधेन. आय टेक इट् ॲज अ चॅलेंज” मग हसत हसत साहेब म्हणाले, “हे बघ, अशा रॉट्न गोष्टी विसरण्यातच शहाणपण आहे. असं काही सोल्युशन शोधलस तर मात्र ते ट्राय आऊट करण्यापूर्वी माझा सल्ला घ्यायला मात्र विसरू नको.”विक्रम वर्क रिपोर्ट विचारील असं टेक्निशियन्सना वाटल होतं पण दोन दिवस झाले तरी त्याने त्यांच्याकडे ढुंकूनही लक्ष दिलं नाही तेंव्हा मात्र ते लोक जरा सिरियस झाले. तरीही त्यानी सांगितल्या प्रमाणे चार दिवस गेल्यानंतरच त्यानी जॉब पूर्ण करून सबमिट केला.

मात्र विक्रमने लंच ब्रेक नी ऑफिस अवर नंतर रोजचे प्रोग्रेस रिपोर्ट दिले नव्हते. दहा मिनिटानीच विक्रमने सगळ्यानाही बोलावून चार दिवसांचे प्रोग्रेस रिपोर्ट मागितले. त्यानी फक्त पहिल्या दिवशी प्रोग्रेस रिपोर्ट ठेवले होते. पण विक्रमने ते मागितले नाहीत तेंव्हा त्यानाही विस्मरण झालं. पण आपली चूकी वर पांघरूण घालण्याच्या हेतूने एकजण निगरगट्टपणे म्हणाला, “पण सर ... आम्ही जॉब तर पूर्ण करून दिलाय . मग आता प्रोग्रेस रिपोर्ट काय करायचेत?” विक्रम जरबेच्या स्वरात म्हणाला “ हे तुम्ही ठरवणार की मी? मला पाच मिनिटात रिपोर्ट पाहिजेत...” तरीही एकजण धीर करीत बोलला, “ पण सर आधी डिझाईन्स प्रोग्रॅमिंग व्हेरिफाय करून सबमिट करायला पाहिजे ना ? आधी ते काम करूया. रिपोर्टस् चा आता काय उपयोग?” जरा लॉंग पॉज घेऊन विक्रम म्हणाला, “मित्रानो जॉब चार दिवसांपूर्वीच मुदतीत सबमिट झालाय, तिकडे प्रॉडक्शन सेल मध्ये जॉब बनायला लागलेत...” त्यानी थक्क होऊन

म्हटलं,“कसं काय शक्य आहे हे ? नी प्रोग्रॅमिंग कुणी कधि केलं?” हसत हसत विक्रम उत्तरला, “तीन दिवसात पाच टेक्निशियन्सना फिफ्टी पर्सेंट जॉब ही पूर्ण करणं अशक्य आहे हे जसं शक्य आहे तसंच एका बी.ई. झालेल्या सीडॉक केलेल्या इंजिनिअरला चौदा तास कंटिन्यू बसल्यावर एकट्याने तो जॉब डिझाईन करून प्रोग्रॅमिंग करणं कां शक्य असू नये? आणि हो… हे काम एका भुताने केलय...”

आपला पेन ड्राईव्ह देत तो म्हणाला, “विश्वास बसत नसेल तर हा ओपन करून पहा...हो पण आधी वर्क रिपोर्ट सबमिट करा नाहीतर इंस्ट्रक्शन फॉलो केल्या नाहीत म्हणून मला तुम्हाला शो कॉज द्यावी लागेल.” मग मात्र आपण फक्त एकच दिवस रिपोर्ट ठेवले ... नंतर विसरलो ... असं पाचही जणानी मान्य केलं. ठीक आहे पण आज पासून लंच ब्रेक पूर्वी अन् संध्याकाळी ऑफिस अवर्स संपताना दोन वेळचे वर्क रिपोर्टस् ठेवायला सुरुवात करा.” एवढ्यातच इंटरकॉमचा बझर वाजला. “ सर, युवर अंकल फ्रॉम देवगड हॅज कम ... शॅल आइ ब्रिंग हिम टू यू ?” त्यावर “येस येस इट्स् माय प्लेझर”... विक्रम आश्चर्याने थक्क झाला होता. काहीही पूर्व सुचना न देता दत्ताकाका अकस्मात कसे काय आले? असा विचार तो करीत असता रिसेप्शनिस्ट रूबी स्वत: काकाना घेऊन आली अन् लाऊंजमधून त्याच्या केबिनकडे अंगुली निर्देश करीत माघारी वळली.. त्याने काही विचारण्यापूर्वी दत्तकाका म्हणाले, “ अरे दोन दिवस चिक मंगळूरला युनियनचं अधिवेशन होतं, आम्ही दोन्ही जिल्ह्यातले मिळून अठरा लोक वीस सीटर करून आलो. येतानाच तुझ्याकडे दोन दिवस तळ ठोकून जायचं ठरवलेलं होतं...हल्ली तुम्ही मुलं म्हणता ना तसं सरप्राईझ देऊया म्हटलं

तुला...” दिलखुलास हसत , “काकाजी ... यु आर ग्रेट...” म्हणत खुर्चीतून उठून विक्रम ने काकाला चरण स्पर्श करीत नमस्कार केला.

त्याने दत्ताकाकाला सगळ्या सेक्शन्समध्ये अभिमानाने फिरवून आणलं. वर्कशॉपमध्ये कॉम्प्युटराईज्ड प्रोग्रॅमिंग प्रमाणे जॉब करणारी आटोमॅटिक मशिन्स चं काम कसं चालतं हे त्याने समजावून सांगितल्यावर काका भलतेच एक्झाईट झाले.“अरे बाबौ, हे म्हणजे अतर्क्यच आहे बाबा.”काका उद्गारला. त्या वेळी सुरू असलेला तो जॉब नेमका टेक्निशियन्सनी रखडवल्यामूळे विक्रमने एकट्याने पूर्ण केलेला होता. “काका, या जॉबचं डिझाईन आणि प्रोग्रॅम मी केलाय.” असं म्हणत मशिन जवळच्या ट्रे मध्ये असलेली ड्रॉईंगची ब्लु प्रिंट त्याने. काकाला दाखवली. काका हायस्कूलला मुख्याध्यापक नी डबल पोस्ट ग्रॅज्युएट होते. सेंट्रल गव्हर्नमेंट्च्या स्कीम खाली हायस्कूल्स मध्ये कॉम्पुटर लॅब सुरु झाल्यावर ते कॉम्पुटर वापरायला शिकले, एम. एस. सी. आय. टी. हा बेसिक कोर्स सुद्धा केला. मुलांसाठी घरात डेस्क टॉप आणला. आता तर त्यानी स्वत:साठी लॅपटॉप घेतला होता. त्यामूळे प्रोग्रॅमिंग किती जटिल नी महत्त्वपूर्ण आहे हे ओळखण्याची त्यांची कुवत होती.

त्यानी ड्रॉईंगचं बारकाईने निरिक्षण केलं नी त्याच्या पाठीवर कौतुकाने थाप मारली. “हे म्हणजे ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली ना तसंच म्हणायला हवं. हा कसला पार्ट आहे त्याचं त्रिमितीय ड्रॉईंग आहे. याला तरल कल्पनाशक्ति हवी नी मुख्य म्हणजे या सगळ्या मापांमध्ये अगदी डेसिमल पॉईंटमध्ये अचूकता हवी केसभराची चूकही क्षम्य नाही.ह्या ब्लू प्रिंटप्रमाणे पार्ट बनवणारं हे मशिन हे ही अचंबित करणारं...” थोडा पॉज घेऊन ते पुढे म्हणाले,“ पण काय

रे? ड्रिलिंग कटिंग करणारे पान्हे, पाती यांची धार अधे मधे कधीही बोथट झाली तर... ते आगाऊ कळतं का? नायतर पुऱ्या कामाचा सत्त्यानास...” आपला काका म्हणजे अद्भूत असामी आहे हे आपलं मत किती सार्थ आहे याची प्रचिती त्याला आली. “काका यू आर ग्रेट... तू इंजिनिअर झाला असतास ना तर या क्षेत्रात क्रांती झाली असती. टूल्स जराही बोथट झाली तरी लगेच अलर्ट मिळतो नी सिस्टीम पॉज घेते. मग दार उघडून ते टूल रिप्लेस करायचं.त्यासाठी प्रत्येक सिस्टिम समोर ट्रेंड लेबर असतात.

अर्थात शेवटी ते मशिनच आहे शार्पनेस कमी होऊन अलर्ट मिळेपर्यंतच्या फ्रॅक्शन्स मध्येही त्या टूलने काम केल्यामूळे थ्रेडिंग कट होऊ शकतं नी क्वालिटी चेकिंग मध्ये जॉब रिजेक्ट होतो. काही वेळा टूल तुटतं नी जॉब वाया जातो. या मी प्रोग्रॅम केलेल्या जॉबबद्दल आणखीही एक गंमतीशीर किस्सा आहे, तो लंच घेताना तुम्हाला सांगतो...” सगळे सेक्शन फिरून बघिस्तोवर एक वाजत आला होता. दीडला कंपनीचा लंचब्रेक झाल्यावर गर्दी झाली असती म्हणून त्याने लगेच कँटिन गाठलं. जेवताना त्याने टेक्निशियान्स सोबत कसा खटका उडाला तो किस्सा साहेबांशी झालेल्या चर्चेसह इत्थंभूत सांगितला. “अरे बाबौऽऽ” दीर्घ सुस्कारा सोडीत काका म्हणाले. “तुझे साहेब म्हणाले ते त्रिकालाबाधित सत्य आहे. असंतुष्टता, मत्सर नी अप्रामाणिकपणा या त्रिदोषातून जी विकृती निर्माण होते ना ती कोणालाही थोपवता येत नाही. आढीत एक आंबा कुजला की आजूबाजूचे आंबेही हळू हळू कुजू लागतात.

आढीतला कुजका आंबा निदान दृष्टिला उमगतो तरी नी तो वेळीच काढूनटाकला तर बाकीचे आंबे शाबूत राहतात . इथे पाच जणात विकृतीचं बी

नेमकं कोणामध्ये आहे हे उमगून काढणं म्हणजे कर्म कठिण. बरं कायदे नियम तरी किती कसे करणार? त्यानाही पळवाटा असतातच ना? त्याहीपेक्षा सुव्यवस्था नी सुसंवाद नी संघभावना यावर सामूहिक कार्याचा दर्जा नी यशस्विता अवलंबून असते नी कायद्याचा बडगा दाखवून या बाबी साध्य होत नाहीत. उलट अधिकारी नियमावर बोट ठेवायला लागला की काम करणारा टोपल्या टाकायला लागतो. ” जेवण उरकून लंच ब्रेक होण्याच्या सुमारास काकाना घेऊन विक्रम कॅन्टिन बाहेर पडला. लंच अवरमध्ये असो. डायरेक्टरना भेटून हाफ डे लिव्ह घेवून काकाला घेवून विक्रम क्वार्टर वर गेला. चार वाजेतो आराम करूनते नॅशनल पार्क पहायला गेले. रात्री जेवण झाल्यावर दत्ताकाका म्हणाले, “हे बघ विक्या... अरे कॉम्पुटरवर आपण केलेल्या कामाचा फाईल्स शिल्लक राहतात ना रे? म्हणून तर पाच सहा महिन्यानी सिस्टीम डिफ्रॅग करावी लागते म्हणे.

म्हणजे तुझ्या ऑफिसमधली ती पोरं ती गेम खेळतात त्याचा संदर्भ... डाटा... तो मिळेल ना रे ? ” काकाला काय म्हणायचं आहे ते त्यानेओळखलं “ नाही काका , पुरावा म्हणून वापरता येईल डेटा नाही मिळत. तू हा विषय अगदी पक्का डोक्यात ठेवलास की काका. ” काका म्हणाले , “होय ना , हसून सोडण्या एवढी क्षुल्लक बाब नाहिये ती. ही विकृत प्रवृत्ती खरंतर समूळ उपटून काढयला हवी. ते नाही जमलं तर किमान जरब बसेल इतपत तरी धडा त्याना शिकावायलाच हवा. बरं मला सांग की हे गेम कॉम्प्युटर मधून डिलिट करून टाकले तर? नी अधून मधून सिस्टम चेक करून बघायच्या . पुन्हा सेटप मारतील त्याना शो कॉज देऊन जरब बसवता येईल.” त्यावर तो बोलला,“ काका . कॉम्प्युटर मधले गेम अगदी प्रायमरी , ती पोर नेट वरचे भारी भारी गेम

खेळतात.” किंचीत विचार करीत टाळी वाजवून काका म्हणाले “अस्सं... प्राणांतिक कळ जावी असा वर्मी फटका तर बसेल पण वळ उठणार नाही नी रक्त फुटणार नाही असा उपाय सांगतो.” “तुला माहिती असेल, माणसाला अखेरची घरघर लागली ... त्याला ऊर्ध्व लागणं म्हणतात. तर त्या वेळेला हेमगर्भाच्या मात्रेचे चार वळसे उगाळून चाटवतात. एखादे वेळी ती लागू पडते नी माणूस बचावतो. एखादे वेळी त्या मात्रेचाही काय उपयोग होत नाही नी माणूस गचकतो. पण मरणाऱ्यावर काही उपचार केले नाहीत अशी खंत तरी वाटत नाही. माझा उपाय असाच आहे. फरक इतकाच की मी नाडी बघून हेमगर्भाचा वळसा द्यायला सुचवतोय. गुण येणारच. वाकड्या मेढीला वाकडं नेम (खड्डा) काढावं अशी कोकणी म्हण आहे. अशा निगरगट्टाना तसाच उपाय योजायला हवा. फटका असा वर्मी बसायला हवा की ब्रम्हांडी कळ गेली पाहिजे पण वळा मात्र उमटता नये. माझा उपाय असाच वरमशीर आहे. त्याना असा कोकणी हिसका देवूया की यंव रे यंव...! तू एकच कर. आत्ता ते दाराकडे तोंडं करून बसतात त्यामुळे ते काम करतायत की गेम खेळतायत हे समजत नाही. त्यांची सिटिंग अॅरेंजमेंट फिरव ... म्हणजे कॉम्पुटरचे स्क्रीन जाणाऱ्या येणाऱ्यालाही सहज दिसतील . आत्ता ते अगोदर सावध होतात ... पण उलटे बसल्यावर मात्र काम न करता गेम खेळायची हिम्मत तरी कोण करणार नाही. हा बदल ते पहिल्यांदा ते पाहतील ना तेंव्हा चोरांची तोंडं कशी कांडेचोरासारखी काळी ठिक्कर पडतात ना बघच तू... अर्थात त्यातले काही बनेल आहेत ते काम करताना मुद्दाम पुन्हा पुन्हा चुका करून वेळ काढूपणा करतीलही... त्याना दहा बारा दिवस सक्तीने ट्रेनिंगला काढायचे नी तिथे कोण इंट्रक्टर असेल त्याला कान पिचकी देऊन काम चोराना ते कंटाळेपर्यंत चक्की पिसायला लावायची.

त्यांचं काम सुरू असताना लक्ष ठेऊन जे चूक करतील त्याना तिथल्या तिथे दुरुस्ती सुचवून कामाचा उरका वाढवता येईल.”दोन दिवस उटी म्हैसूर पासून फिरून दत्ताकाका गावी गेले. त्यानी सुचवलेला उपाय योग्य वेळी अंमलात आणायच्या संधीची तो वाट पहात होता . महिना अखेर रूटिन प्रमाणे स्टाफ मीटिंग लागली. अजेंड्यावरचे मुद्दे संपल्यावर मॅनेजिंग डायरेक्टर साहेबांची परवानगी घेऊन त्याने आपला अनुभव थोडक्यात सांगितला नी हा प्रॉब्लेम मिटवायचा हुकुमी उपाय आपण सजेस्ट करू का ? अशी विचारणा केली. “बी इन ब्रिफ़ अॅन्ड सजेस्ट प्रक्टिकेबल सोल्युशन. ” डायरेक्टर म्हणाले. मग त्याने सिटिंग अॅरेंजमेंट उलटी फिरवायचा तोडगा सुचवला.

खरं तर या बाबतीत आधी जमखंडिकर सरांशी चर्चा

करायला हवी होती. पण आत्ताच मिटिंग सुरु असताना आपल्याला हे सुचलं नी राहवलं नाही अशी मल्लिनाथी त्याने केली. त्याचं बोलणं पूर्ण झाल्यावर क्षणभर सन्नाटा पसरला. मॅनेजिंग डायरेक्टरनी उभं राहून जोर जोरात टाळ्या वाजवायला सुरुवात केल्यावर सगळेच उभे राहिले नी टाळ्यांचा कडकडाट झाला. हात ऊंचावून सर्वांना बसायची खूण करून साहेब बोलू लागले, “आय अॅम प्राऊड ऑफ माय यंग प्रॉमिसिंग कलिग मिस्टर विक्रम. हिज सजेशन इज सुपर्स्टिशस नो डाउट ... हेन्स वी सिनिअर मेंबर्स वील थरली डिस्कस ऑन द मॅटर अॅण्ड मेक अ वर्क आउट प्लॅन. बट नन विल डिस्क्लोज द नेम ऑफ मास्टर माईंड. ऑल आर अल्सो वॉर्न्ड नॉट टू स्पिक अ सिंगल वर्ड अबौट चेंज इन सिटिंग अॅरेंजमेंट अॅण्ड द पर्पज बिहाईंड इट इव्हन आफ्टर इट

टेकस् एफेक्ट, अॅज इट इझ अ पॉलिसी मॅटर. माय यंग चॅप युवर सजेशन इज अॅप्रिशिएटेड अॅन्ड ही विल् बी रिवार्डेड इन टर्न ऑफ थ्री इनक्रिमेंटस ! ”

आठवडाभराने डायरेक्टरने लेखी नोटिस काढून ऑफिसच्या इंटिरिअर डेकोरेशन आणि रिनोव्हेशनसाठी चार दिवसांची सुटी डिक्लेअर केली. चार दिवस मस्त एंजॉय करून स्टाफ फर्म मध्ये आला. कॅरिडॉर मध्ये रंगरंगोटी केलेली दिसली. केबिनच्या काचा बदलून तळाकडे फुटभर उंचीपर्यंत गॉगल ग्लास बसवलेल्या होत्या. होत्या. आतली टेक्निशियन्स ची सिटिंग अॅरेंजमेंट फिरवलेली होती. हा सगळा बदल बघितल्यावर त्यातले धोके ओळखून एकजण म्हणाला, “आता स्क्रीनवर रिफ्लेक्शन येऊन डोळ्याना त्रास होणार... हे सगळं उलटं झालं आता. तुम्ही कुठच्या ही ऑफिसमध्ये जाऊन पहा काम करणा-याचं तोंड एंट्रन्सकडे असतं. ” कॉम्पुटर टेबल भिंतीला फिट केलेलं असल्यामूळे हालवता येणारं नव्हतं. त्यांची चरफड बघून विक्रम मनातल्या मनात हसत होता. टेक्निशियन्स आसनस्थ झाले अन त्या नी विण्डो ओपेन केल्या. विक्रम ने पुढे जाऊन निरीक्षण केलं, खिडकीच्या तावदानाला तळी गॉगल ग्लास बसवल्यामूळे कॉम्प्युटर डिस्प्लेवर रिफ्लॅक्शन येत नव्हतं.

“तुमच्या एका शंकेचं निराकरण झालं ना मित्रानो? डिस्प्लेवर रिफ्लॅक्शन येत नाहिये ... इंटिरियर डेकोरेटर्स भलतेच हुषार असतात नी त्यापेक्षाही कंपनीच्या अॅडमिनिस्ट्रेटर्सनाही फोरसाईट असते. आता एक बरं झालं तुमचं वर्क सुरु असताना मला लक्ष ठेवता येईल नी एखादी स्टेप चुकली तर तिथल्या तिथे करेक्शन देता येईल.” मग त्याने काकाना फोन लावला , “ काका, मी ऑफिस मधून बोलतोय्, तुम्ही सांगितल्या प्रमाणे बिनबोलत कोकणी हिसका

दाखवला. तुमचा उपाय इतका भारी आहे ना काका, की, डायरेक्टर्सनी माझी तारीफ करून लगेच मी सुचवलेल्या उपायाची अंमलबजावणी केली. मी दिलेल्या हेमगर्भाच्या मात्रेचा वळसा चांगला लागूही पडला. सविस्तर संध्याकाळी सांगतो. ”

*************

## ५. आधी गेली अक्कल .....

पडवण्यातले पापा करंगुटकर पंचक्रोशीत मालदार असामी म्हणून प्रसिध्द! चार साडेचारशे कलमाच्या दोन बागा, मच्छिमारीच्या सहा पाती (मोठ्या होड्या) चार ट्रक नी कायम मजूरी वरचे पन्नास गडी एवढा मोठा बारदाना . ते चारही भाऊ एकत्र रहायचे , पण मोठं कुटुंबनी दहाबारा गडी कायम जेवायला असायचे म्हणून त्यांची दोन घरं होती, एका घरात कुटूंबातली माणसं रहायची नी दुसऱ्या गडी माणसं आला गेला यांचा वावर असायचा. तशी देवगडला त्यांची वखार होती तिथून बाहेर गावानी मासळी पाठवली जायची. आलटून पालटून एकेक भाऊ तिथे असायचा. तसंच तळेबाजारातही पेठेत मोठं घर होतं. रस्त्याच्या दर्शनी भागात किराणा दुकान नी आतल्या भागात निवासाची सोय होती. तिथे पापांची दुसरी बायको राधा मयेकरीण रहायची. पापा आठवड्यातून दोनतीन दिवस गावात नी बाकीच्या वेळी तळेबाजारात मुक्कामाला असायचे. पडवणं एका बाजूला असल्यामुळे पापांचा गोवा दारूचा चोरटा धंदा नी स्मगलिंगही चालायचं. गोव्याहून मुंबईला पॅसेंजर घेवून जाणाऱ्या बोटीतून दारू यायची. विजयदूर्ग बंदरालगत दर्या खोल नसल्यामूळे बंदरा पासून अर्धा मैल लांब खोल पाण्यात बोट नांगर टाकून थांबे नी मोठा भोंगा होई . मग बंदरातून पॅसेंजर भरून पडाव सुटत . पापांच्या मच्छिमारी करणाऱ्या होड्या त्या आसपासच्या भागातच थांबलेल्या असायच्या. पॅसेंजर

येईपर्यंतच्या मधल्या वेळात माल उतरवून घेवून होड्या पडवण्या कडे रवाना व्हायच्या.

पडवण्यात जायला जवळची वाट म्हणजे तरी पलिकडे आबू जोशाच्या घरामागची घाटी चढून जावं लागे. घाटी म्हणजे नुस्ता उभा शूळ पहिलं मोडण गाठी पर्यंत पोटऱ्यांमधे गोळे यायचे नी कानशिलं गरम व्हायची. कितीही ताकदवान गडी असला तरी तो एवढा गळाठून जायचा कि, कडेला असलेल्या धोंडींवर बूड टेकून दम खाल्ल्याशिवाय रहात नसे.ह्या मोडणापासून सडा सुरु व्हायचा नी पुढच्या मोडणावर घाटी संपेपर्यंत सतत वाऱ्याच्या झुळुका येत राहिल्यामुळे जादा हैराणी होत नसे. पण हा टप्पा संपता संपत नसे. नव्याने घाटी चढणारा जाम भेंडाळून जायचा नी एकसारखं अजून किती मकाण राहिलं? कधि संपणार ही घाटी? विचारून विचारून सोबत्याला हैराण करीत असे जस जसं मोडण संपत येईल तसतसा वाऱ्याचा वेगही जरा वाढायला लाग़ायचा. घाटी संपून सड्याचा सवथळ भाग सुरु झाला कि डाव्या मावळतच्या दिशेला पडवण्याची वेळा दिसू लागे. पाढरी शुभ्र वाळू नी त्यापुढे पार क्षितिजापर्यंत गेलेला निळाशार दर्या हे दृष्य एवढं विलोभनीय असे कि घाटी चढून आलेली हैराणी कुठच्याकुठे पळून जात असे.

उजवीकडे उगवतच्या बाजूला अडिजेक मैलाच्या अंतरावरचं गोवळातल्या ईश्वराच्या देवळाचं त्रिकोनी शिखर दिसत असे. त्याच्या बाजुला सडेवाड्करांची दहावीस घरं नी विजयदुर्गातून येणारा कच्चा रस्ता गेलेला दिसायचा. मागच्या अंगाला खूप सखलवटीत गाबतडीच पाजं नी तरीवरचं हनुमंताचं वीतभर उंचीचं देवूळ बघितल्यावर आपण किती उंचावर चढून

आलोय ह्याचा नेमका अंदाज यायचा. ह्या सड्याचं वैशिष्ट्य म्हणजे इथे बारा महिने बत्तीस काळ सतत वारा असायचा. मध्यरात्रीच्या दरम्याने मतलय बंद होवून दर्या वरचा खारा वारा सुटायचा तेंव्हा तर वाऱ्याला जास्तच वेग असे. पाऊसकाळात तर दिशा काळवंडून मुसळधार पाऊस सुरु झाल्यावर वाऱ्याच्या अशा काय कावट्या सुटायच्या कि , पाऊल पुढे टाकणं दुस्तर व्हायचं नी माणसं सर ओसरेपर्यंत झाळीच्या आडोशाला बसून रहायची. वीसेक मैल औरस-चौरस पसरलेला सडा म्हणजे सगळं फोंडं जांभं कातळ. पण गोवळाची हद्द संपून पडवण्याची शीव सुरु झाली जसजसं पुढे जावं तसतशा चार पाच एअराच्या खरी सुरु झालेल्या दिसत. खरी म्हणजे कातळाच्या सखलवटीत मळीसाठून बनलेली जमिन. काही खऱ्यांमध्ये तर कमरभर- गळाभर उंच माती नी कडेनी वाव दोन वाव भागात उडदा एवढी नी मोहरी एवढी रेव साठलेली असे.दरवर्षी पावसात व्हावटीच्या पाण्याने त्यात भरच पडायची. सड्यावरच्या गाबतांच्या खरीत तर पांढुरक्या रंगाची वस्रगाळ माती मिळे ती आजूबाजूच्या गावातले मूर्तिकार गणपती बनवायला न्यायचे. सड्याचा उतार पडवण्याच्या दिशेने तीव्र होत गेलेला होता नी त्या भागात मोठ मोठ्या हांजी मिळायच्या. ह्या हांजी व्हावटीतुन आलेल्या सुपिक गाळीव मातीने भरलेल्या असायच्या. अधून - मधून हांजी धरून गच्च झाळी वाढलेल्या असायच्या. त्याला आळे म्हणत. काय काय आळयांचा घेरा दोन - तीन गुंठ्यांहून जादा भरला असता.आळयांमध्ये खैर, करंदी नी वाकेरीचं असं काटेरी गचवण वाढलेलं होतं की आत शिरणंही मुश्किल. अशा काही आळयांमध्ये डुकरांची हुकुमी बसल असायची. पडवण्याच्या पावणाईची जत्रा भरे त्यापूर्वी आठवडाभर गाव पारध व्हायची. देवीचा कौल झाल्यावर गावकरी सड्यावरचे असे अळे धरून रान

काढीत तेव्हा दोन तीन डुकर, पाचसहा ससे नी भेकरी हुकुमी मिळायची. मात्र एरवी वर्षभर गावातल्याना पारध करायची बंदी होती.

सड्यावर दोनतीन ठिकाणी कातळावर असलेल्या खोलगट तळपांमध्ये बारमास पाणी मिळे. गावदरी जवळ उताराला नी टापूवर म्हाजन, केळकर, पडवळ, करंगुटकर, तावडे, नरसुले, लिंगायत नी गाबीत, तेली यांच्या हापूस कलम बागा होत्या. ते लोक कातळात रांजणाच्या आकाराचे खड्डे खोदीत. त्यांच मुख माणूस जेमतेम वाटावेल एवढं दोन वीतीचं गोलाकार असे नी आतला भाग मात्र चांगला ऐसपैस नी उंची पुरुषभर असे. पावसाळी व्हावटीच्या पाण्याने रांजण भरले कि त्यांच्या मुखावर आंजणी कुंभ्याचे टाळे टाकून त्यावर पातळ पसरट दगड ठेवून झाकून ठेवीत. कार्तिका पासून तो मृगाची शितडी पडेपर्यंत एक दिवस आड कलमं शिपावी लागत. असं दोन सिझन शिंपणं केलं की मग कलमाना पाण्याची गरज नसे. जामसंड्याला मोरोपंत गोगट्यानी कलम लागवड सुरु केली तेंव्हा पडवण्यातल्या बापूराव केळकरानीही गावदरीकडून सड्याकडे जाणाऱ्या घसरडीच्या भागात कलमं लावायची सुरुवात केली. त्यांच्या ठिकाणात कातळात एक पुरातन रांजण होता.त्यात पावसाळी पाणी साठलेलं असे. त्यापासून प्रेरणा घेवून त्यानी पाणी साठवणासाठी रांजण खणून घेतले. ते पाणी पुरवेल एवढ्या बेताने दर दोन वर्षाआड दहा पंधरा कलमं लावीत लावीत मोठ्या बागा उठवल्या. त्यांचं बघून मग गावात इतरानीही रांजण खोदून बागा उठवल्या. कातळवट उताराची जमिन, खारावारा नी दिवसभर मोकळं उन्ह असं हापूस कलमाना मानवणारं हवामान असल्यामूळे इथल्या कलम बागा अख्ख्या देवगडात आगप माल येणाऱ्या म्हणून प्रसिध्द

होत्या. इथल्या मालाला रंगही चांगला नी सतत वाऱ्यामुळे मालही निर्मळ असायचा.

इथला दर्या तर अत्यंत धोकेदायक. किनाऱ्यापासून पंचवीसेक फूटापासून एकदम खोल गर्ता होत्या. नवखा माणूस मजेत लाटा घेत घेत कमरभर पाणी होईतो पुढे पुढे जात राही त्यापुढे उताराची खोल भाग सुरु झाला कि अकस्मात पाण्याला कमालीची ओढ असे. काय होतं हे कळण्यापूर्वी माणूस आत खेचला जायचा. कायम कमरभर तर अधे मधे पुरुषभर उंचीच्याही लाटा घोंगावत यायच्या नी त्यांचा आवाजही घुमायचा. वैशाखा अखेर पडवण्याच्या वेळेची म्हणजे दर्याची गाज आजूबाजूच्या तीन चार गावांपर्यंत ऐकायला जायची की,“ पावस् जवळ ईलो” असं लोक समजायचे. किनाऱ्याच्या उजव्या दिशेला चार मैल अंतरावर देवगड आणि विजयदूर्ग बंदर सातेक मैलावर. गावातल्या बहुसंख्य भंडाऱ्यांचा नी गाबतांचा मासेमारीचा व्यवसाय असल्यामुळे किनाऱ्यावर दहाबारा ठिकाणी कायम होड्या, पडाव बांधायचं काम बारमास सुरु असे. कलमा बागा नी मच्छिमारी मुळे गावात सगळ्या घरवडी सधन आणि कायम चार पैसे बाळगून असायच्या. गाव चौदा वाड्यांचा, नी बहुसंख्य घरं चिरेबंदी नी माडीची. औरस चौरस पंधरा हात मापाचा मधला चौक उंच उठवून माडी काढलेली असे नी त्यावर स्वतंत्र छप्पर असायचं. चौकाच्या चारही अंगानी बसक्या छपराच्या पडव्या काढलेल्या असत. बारमास कायम जोराचा वारा असल्यामुळे छपरं जमिनीला टेकतील इतकी , बसकी नी उलाल ठेवायला लागत. बहुसंख्य लोकांची घरं ऐसपैस नी एकाच धाटणीची. सगळ्या घरांमध्ये उंच बांधणीची पापा भंडाऱ्याची दोन्ही घरं मात्र लांबूनही नजरेत भरायची.

हापूस कलमांचं ठोक उत्पन्न आणि मच्छिमारीचा बिनभांडवली पण चलतीचा धंदा यामुळे पडवण्याला सुखवस्तू लोकांचा गाव समजत. सणासुदीच्या दिवसात तर पडवण्यातलं वैभव दृष्ट लागण्यासारखं असायचं. गणेश चतुर्थीत मोठे मोठे गणपती नी देखावे यांची चढाओढ असायची. गाबीत , भंडारी यांच्या घरात सहासात फुटी भव्य मूर्ती असायच्या. शिवाय गणपतीच्या शेजारी पुराण कथांच्या संदर्भावर आधारित गरूड, मारुती, समुद्रमंथन, दशावतार , जटायु रावण युध्द असे मूर्तींचे सीन असत. एकट्या गणपतीक काय शोभा नाय, अगदी काय नाय तर निदान एखादी भावली तरी (गौरीच्या रुपात स्त्री मुर्ती) व्हयीच असं लोक म्हणत . त्यातही पापांचा गणपती अख्ख्या गावात सगळ्यात मोठा नी सोबत दोनतीन तरी अन्य मूर्ती हमखास असत. त्यांचा गणपती विजयदुर्गच्या प्रख्यात तारकर पेंटरांकडून आणीत. पडवण्यातले सगळे गणपती अनंत चतुर्थीपर्यंत असत. मोठे गणपती नी सीन असायचे म्हणून आजुबाजूच्या गावातल्या बायाबापड्या नी पोरं मुद्दाम गणपती बघायला पडवण्यात यायची.

चतुर्थीच्या दहा दिवसात दर्शनाला येणाऱ्याना मूठ भरभरून साखर फुटाणे,बत्तासे. पेढे, मोसंबी सफरचंदाच्या फोडींची खिरापत घरोघरी वाटीत असत. पापांकडेतर दुपारी अकरा वाजल्या पासून ते अडीच वाजेपर्यंत जे कोण दर्शनाला येतील त्याना आग्रह करकरून महाप्रसाद वाढला जाई. नोकरचाकर ,कामगार ह्याना पापा हात सोडून मजूरी देत. गावातही अडल्या नडल्याला मदत मिळायची. पंचक्रोशीतल्या सार्वजनिक नी देवस्थानांच्या कार्यात, जत्रा- सप्ते यात तर ते भरभरून पैसा पुरवीत. म्हणून पंचक्रोशीतले लोक पापाना मोठा मान

द्यायचे . त्यामुळे त्यांच्या अवैध धंद्यांविरूध्द खबर देणं दूरच, उलट लोक त्याना सहाय्यच करीत .

विजयदूर्गात कस्टमवाले असायचे. त्यांना गस्तीसाठी बंदरातल्या मच्छिमारांच्या होड्याच घ्याव्या लागत. त्या होडीवाल्यांचे नी पापांचे लागेबांधे असायचे. तसेच पापांचे खबरेही बंदरात पेरून ठेवेलेले असायचे. कस्टमवाले गस्त घालायला सुटले की होडीवाले निशाणाच्या काठीला पांढरा फडका बांधित, काहीवेळा कस्टमवाले सुटण्या पूर्वीच खबरींच्या होड्या पुढे रवाना होत. त्यामुळे पापांची माणसं किंवा माल कस्टमच्या कचाट्यात कधिही गावत नसत. गावातल्या घरात तर ते चुकूनही माल ठेवीत नसत. सड्यावरच्या बाग़ांमध्ये पाणी साठवणाच्या रांजणातून आणि गच्च झाडकळ वाढलेल्या आळयांमध्ये माल दडवलेला असे. ती ठीवंही स्वत: पापा नी त्यांचे भाऊ यानाच ठाऊक असायची. पापांचा पोलिस स्टेशनला नियमित हप्ते देण्याचा प्रघात नव्हता.अधून-मधून स्मगलिंगचा माल उतरल्यावर पोलिसाना खबर मिळायची नी पोलिसांची रेड पडायची. घरादाराची झडती व्हायची पण एकही आक्षेपार्ह वस्तू पोलिसाना सापडत नसे. देवगडला वखारीजवळ मासळी ट्रकात चढवीत तेव्हा मच्छीच्या फाटीतून माल रवाना व्हायचा. मच्छिमारीत टाकावू मासे सुकवून त्याची कुटी खत म्हणून विकली जाई .त्या कुटीच्या पोत्यांच्या आडोशाला मालाचा स्टॉक असायचा पण कुटीचा असा जीवघेणा परमळ सुटलेला असे की कुटीची पोती चढवणारे हमालसुध्दा दारु प्याल्याशिवाय अर्धा तास तासभर थांबून काम करू धजावत नसत.

पोलिस नी त्यांचे खबऱ्ये पापांच्या पाळतीवर असायचे पण मालाची देवघेव त्यांच्या विश्वासू माणसां करवी व्हायची. एकदा दुबईहून सोन्याचा मोठा स्टॉक घेवून अरब जयगडला आलेला होता. तिथल्या एजंटला एक रकमी एवढा व्यवहार झेपणारा नव्हता म्हणून त्याने पापांना भेटायला हस्तक पाठवला. निरोप मिळाल्यावर तिन्ही सांजेला पापा रक्कम घेवून बाहेर पडले. अरब देवगड बंदरात वेळेबाहेर (मोठ्या बोटी किनाऱ्या पासून ठराविक अंतरावरून खोल पाण्यातून जातात त्या भागाला वेळा म्हणतात ) थांबलेला होता. एजंटच्या हस्तका बरोबर होडीत बसून पापा निघाले. ते संशयास्पद रित्या निघाल्याची वार्ता खबऱ्यांकरवी कळल्यावर पोलिसही त्यांच्या मागावर निघाले. अरबाच्या लाँचजवळ होडी उभी करून पैशाची बॅग घेवून पापा लाँचवर चढले नी दहा मिनिटात पोलिसांची होडी आली. देवग़डचे ठाणेदार देरेकर नी सोबत त्यांचे दोन सहकारी होते. होडीजवळ आल्यावर पापा रिव्हॉल्वर रोखीत स्वत: समोर आले, "तू फक्त आकडो बोल...उद्या दोपारसर रक्कम पोच होयत्" त्यानी समजवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांची ऑफर धुडाकावून लावीत तो पोलिसी खाक्यात गुरकावून म्हणाला, " मी लाँच जप्त करून पंचनामा करणार... लाँच बंदराकडे घ्या. " हा ऐकणार नाही हे ओळखून पापानी त्याच्या छातीवर दणका मारून त्याला दर्यात लोटून टाकले . सोबतच्या पोलिसाना, "जीव हवो आसलो तर आमच्या पाटना येव नुको... आदी सायब बुडताहा त्येका होडयेत घ्येवा नी बंदर गाटा." असा दम भरून त्यानी सोबत्याना इशारा केला . त्यासरशी त्यानी धडाधड होडीत उड्या टाकल्याबरोबर लाँचही सुरु झाली नी पापांची होडीही सुटली.

पापा बंदरावर पोचले नी माल घेवून रातोरात पडवण्याला रवाना झाले. माल निर्गतीला लावून सकाळी विजयदूर्ग डेपोच्या गाडीने ते रत्नागिरीला गेले. दहा वाजता देवगड, तळेबाजार इथे शोध घेवून पोलिसांची जीप पडवण्यात गेली. त्यांच्या तीनही भावाना अटक झाली. देवग़डच्या वखारीतले नोकर, तळेबाजारच्या दुकानातला नोकर नी पापांची दुसरी घरवाली अशी बऱ्याच लोकाना लॉकअपमध्ये टाकले. माणसाना मारझोडही झाली पण पापांचा नी मालाचा ठाव ठिकाणा कोणालाच सांगता आला नाही. दोन दिवसानंतर पापा सकाळच्या विजयदुर्ग गाडीने रत्नागिरीला गेल्याचा माग लागला. तिसऱ्या दिवशी काळबादेवीतल्या मयेकरांकडे त्यांची चुलत आत्ते बहिण दिलेली होती तिच्या घरी जावून पोलिसानी त्याना ताब्यात घेतले. रत्नागिरीतल्या प्रसिद्ध करमरकर वकिलानी त्यांच वकिलपत्र घेतलं नी चारच दिवसात सगळे जामिनावर सुटले. त्या दरम्याने दरेकरांची वर्ध्याला बदली झाली. दहा वर्षं तारखांवर तारखा पडत राहिल्या नी नंतर पापांसह सग़ळेच निर्दोष सुटले.

तळेबाजारात गावाबाहेर कालवीत जाणाऱ्या वाटेवरच्या एक दोन घरांमध्ये पापांचा दारूचा स्टॉक ठेवलेला असायचा . गावातले दोन गडी अर्ध्या कापलेल्या गोणपाटात दहाबारा बाटल्या भरून तळेबाजारात दुकाना शेजारी बसून रहात. गिऱ्हाईकाने दुकानात पैसे दिले की सांकेतिक खूण केली जाई नी बाहेर बसलेला गडी गुपचूप बाटली काढून देई. तळेबाजारात दुकानावरही अधे मधे पोलिस छापा मारीत पण तिथेही पोलिसाना हात हालवीत परत जावे लागे. अर्ध्या वयाच्या गाबतिणी किंवा कुळवाडणी आजुबाजूच्या गावानी दारवेची फायटं पोचवायचं काम करीत. टोपलीत तळी माल नी वर मासे ठेवून राजरोसपणे नी बीनबोभाट माल पोच केला जायचा. ह्या बायकाना बघून कधिच

कोणालाही संशय येणंही शक्य नव्हतं. आजूबाजूच्या गावानी पोचवायचा इतर ऐवजही पाटीवाल्या बायांमार्फत पोच केली जात असे. डोकीवर मच्छिच्या पाट्या घेवून जाताना गावदरीबाहेर माल त्याना दिला जाई. रकमेची वसूलीही त्याच बायका करून आणित असत.

तळेबाजारात पोलिस आऊट पोस्ट सुरु झाले तेंव्हा वेंगुर्ल्याकडचा पाटकर कोतवाल आणि दोन अन्य हवालदार ठाण्यात हजर झाले. पाटकरा कोतवालाचा सासरा तेंव्हा जिल्हाबोर्डाचा मेंबर असल्याने तो भलताच गुर्मीत रहायचा. त्याला बाहेरचा नाद होता.बुधवारी आठवडाबाजार भरायचा त्याला कालवीतल्या गाबतिणी मासे विकायला यायच्या. त्यांच्या जथ्यात एक दांडगी दुंडगी, उजळ वर्णाची बाई असायची. बाजारात फिरताना पाटकराची तिच्यावर नजर गेली. त्याने हवालदाराला पाठवून तिला पोलिस ठाण्यात बोलावून घेतले. पोलिस ठाण्याची इमारत बाजारा पासून जरा लांब एकवशी होती. तिला लांबून इमारत दाखवून हवालदार निघून गेला. बाई इमारती जवळ गेली नी बाहेरूनच सायेब सायेब करून हाका मारल्या. पाटकराने तिला आत यायची खूण केली. बाई आत जायला तयार होईना. “तुमका माशे होये तर भायर् येवन् घ्येवा... मी भूतू येन्या सारक्या नाय.” पाटकर प्यालेला होता, बाहेर येवून “ लय नकरे करू नुको...हय कोन बगूक नाय हा...तुका धा रुपाये द्येन...” असं सांगून तो तिला हात धरून ओढायला लागल्यावर त्याचा हात झिंजाडून पाटी तिथेच टाकून ती पळाली. ती पळाली नी रडत रडत पापांच्या दुकानात गेली. पापांच्या पाया पडून तिने कोतवालाची आगळिक सांगितली. पापानी त्याला बोलवायला गडी पाठवला.

पाटकर कोतवालाला पापांचा निरोप सांगून पाटीवालीची पाटी घेवून गडी माघारी आला. पाच मिनिटात कोतवाल येताना दिसल्यावर पापा बाईला घेवून दुकाना बाहेर गेले.कोतवाल जवळ आल्यावर, “आमच्यो बाया बापड्यो रस्त्यार पडलेलो म्हाल समाजलंस कायरे कोतवाला?” असं म्हणत काडकन त्याच्या अशी कानफटात मारली की गडी भेकांडला. “ पुन्ना रूपी खैच्या बायल मानसा कडे डोळो वर करून बगलस ना तर तुज्ये डोळे फोडीन ” बाजारात हमरस्त्यात हा प्रकार घडला. आजूबाजूचे व्यापारी जमले . एकंदर रागरंग बघून “तुका लॉकप मदी टाकतय” अशी पोकळ धमकी देत कोतवालाने काढता पाय घेतला. त्या संध्याकाळीच पाटकर कोतवाल निघून गेला नी दोन दिवसानी त्याच्या बदली नवा कोतवाल तळेबाजारात हजर झाला.

दहा बारा वर्षात पापा भलतेच गबरगंड पैसेवाले झाले. दोन जीप आल्या , पाच मोटार लाँची नी तीन मर्सिडीज ट्रक आले. चार बाजूनी वहाती गंगा सुरु झाली. त्यांची स्वत:ची ट्रकभर मासळी रोज कोल्हापुरला जायला लागली.बोटी बंद झाल्या नी गोवा दारू बंदझाली.त्याऐवजी त्यानी उन्हाळी सिझनला आंबा ट्रान्सपोर्ट सर्विस सुरु केली आता सोन्या-चांदी व्यतिरिक्त इतर स्मगलिंगही त्यानी बंद केले. सोन्याची ही चढाओढीने खरेदी ते टाळीतच. पण माल घावूक असेल तेव्हा एक रकमी एवढी मोठी रक्कम देणारा मिळाला नाही की एजंट लोक त्या पार्टीला पापांकडे पाठवीत. पापा समक्ष व्यवहार करीत नसत. त्यांचे दोन विश्वासू हस्तक आबा बेळणेकरआणि बाबू तेली खरेदी नी विक्री दोन्ही व्यवहार सांभाळीत नी भरपूर कमिशन काढीत. कदाचित पोलिस केस वगैरे झालीच तर पापा भक्कमपणे त्यांच्या पाठीशी रहात. आबा नी बाबू

अँबेसेडार मधून फिरायचे. एरव्ही उन्हाळी आंबा ट्रान्ससपोर्ट आणि मच्छीचा व्यापार या व्यवहारावर त्यांची नजर असायची .

सांगली, कोल्हापूरचे मोठे पेढीवाले सोन्या चांदीची ठोक खरेदी पापांकडे करीत. बेळणेकर नी तेली या व्यवहारात मधल्यामधे कमिशन काढतात हे पेढीवाल्यांच्या लक्षात आल्यावर काही पेढीवाले गाड्या काढून समक्ष देवगडला येवून पापांची भेट घेवून सौदा करू लागले नी दोघांचे कमिशन बंद झाले . अर्थात माल पोच करायची व्यवस्था करायला त्यानाच जावे लागे. सलग चार पाचवेळा विक्रीचे व्यवहार असे परस्पर झाल्यावर त्यानी आपापसात संगतमत करून नामी युक्ती शोधून काढली. सांगलीतल्या पेढीवाल्याला चाळीस किलो चांदी नी दहा किलो सोनं एवढा घावूक माल पोच करायचा होता. नेहेमीप्रमाणे मासळीच्या लाकडी बॉक्सांमध्ये भरून माल रवाना झाला. ऐवज पाठवायचा असेल असे अशा वेळी बाबा किंवा बाबू दोघांपैकी एकजण मागून पुढून सुटत असे. गाडी मार्केटला पोचण्यापूर्वी वाटेत निर्मनुष्य भागात माल उतरून घेतला जात असे नी भाड्याची कार ठरवून माल पार्टीला पोच केला जातअसे. रात्री अकरा वाजता बावडा घाटात पोलिसानी ट्रक अडवला. ताडपत्री बाजूला करून हौद्याच्या डावी कडच्या तीन रांगा चाळवून ऐवजाच्या चार पेट्या उतरून घेतल्या नी ट्रकवाल्याला जायला सांगितलं.

ट्रक ड्रायव्हरलाही आपल्या गाडीत असा काही ऐवज आहे ही गोष्ट माहिती नसे. तिथून सुटल्यावर चंबुखडीच्या अलिकडे बाबू तेल्याने ट्रक थांबवला . पोलिसानी घाटात गाडी उभी करून मासळीचे चार बॉक्स घेतले ही बाब ड्रायव्हर क्लिनरने त्याना सांगितल्यावर त्याने पार्टीला समक्ष भेटून घाटात

रेड टाकून पोलिसानी माल जप्त केल्याचे सांगितले नी तो टाकोटाक देवगडला आला. पापाना भेटून घाटात पोलिसानी रेड टाकून माल जप्त केल्याची बातमी त्याने सांगितली. पंचनामा वगैरे काही न करता पोलिसानी माल हडप केला ही आश्चर्याची गोष्ट...पण कोर्ट केस ही झंझटं मागे लागण्यापेक्षा जे झालं ते ठीक ...“सरसलामत तो पगडी पचास” असं बोलून पापानी झाल्या प्रकरणावर पडदा टाकला.

दोन दिवसानी ट्रक ड्रायव्हर नी क्लिनरला बोलावून पोलिसानी रेड कशी टाकली... काय काय झालं त्याची नीट चौकशी केली. गाडीत मच्छीचे ऐंशी बॉक्स भरलेले होते, केवळ अर्ध्या तासात त्यातले मालाचे बॉक्स अचूक शोधून ते पोलिसानी जप्त केले याचा अर्थ उघड होता... धंद्यातल्या माहितगार माणसाने पोलिसाना टीप दिलेली असणार ...! हा विषय कानी पडल्यावर पापांची दुसरी बायको म्हणाली, “मी तुमका सांगतय... पोलिस बिलिस सगळी बंडलबाजी आसा... किती वर्सा ह्यो धंदो सुरु हा, पोलिसानी कितीव पिचाटलानी तरी टरकातले सगळे पेटये खोल्ल्याशिवाय म्हाल तेंच्या हातीत गवासणां शक्य नाय... ह्या पोलिसांचा काम नाय ...घरभेद्यानी बनाव करून तुमच्या टकल्यारसून हात फिरवल्यानी हा . चोर तुमच्या बगलेत ऱ्हवणारे... त्या बेळणेकरान् ही वाणी मोड दाकवल्यान... नी तो चामटो तेली... तो दुकु सामिल हा. तेंका लय टकल्येर चडौन ठेवलाहास तेचे ह्ये परिणाम ... सगळ्या येवारात त्ये मलय खातत तरी समाधानी नाय... ”

“तुजो अंदाज हजार हिश्यान बरोबर हा... माज्या टकल्यार हात फिरवणारो आजून जलामलेलो नाय. माका ह्या बाराबंदरचा पानी खालेल्या

भंडाऱ्याक वाणी मोड दाकवनार काय ? माजो भंडारी दणको बगलानी काय पाटलोनीत नाय मुतले भडये तर माका दोन बापसाचो समज तू राधे... माका जां काय सांगलस ना तां मातर खयपण वकू नको, नायतर भडये सावद व्हती.म्हाल जसो ग्येलो तसो परत येयत की नाय बग तू " पापानी ग्वाही दिली नी कसा काय सापळा रचायचा तो बेत आखला. चार दिवसानी काहीतरी निमित्त करून बाबू तेली नी आबा बेळणेकर दोघानाही लाँच मधून विजयदूर्गला जायला सांगितलं. लाँच नजरेच्च्याटप्प्या बाहेर पोचली नी काय होतय हे कळण्यापूर्वीच तांडेलानी दोघानाही पकडून त्यांचे हातपाय बांधले नी लाँच बंदकरून नांगर टाकला.

" ह्या तुमी काय येवजलास? " आबाने विचारल्यावर जग्या तांडेल म्हणाला, "वांयच दम धरा, मोटो डोस देवचो हा... पापा येतलेच धा मिंटात." त्याप्रमाणे दहा मिनिटानी पापा आले." रे जग्या,ह्येंका जरा प्यॉटभर खारा पानी खावंदे ,म्हंजे घाटात खालेलो म्हाल वकॉन पडात..." त्यांच्या रडण्या भेकण्याकडे लक्षन देता तांडेलानी त्याना दर्यात टाकलेनी. दोनतीन मिनिटं पोटभर खारं पाणी खायला लावून त्याना वर ओढून घेतल्यावर दोघानाही भडाभड ओकाऱ्या झाल्या. जरा सावध झाल्यावर तेली म्हणाला," पापा , वाणयाच्या नादाक लागॉन तुमचा श्यान खाला मी ... " मग मात्र बेळणेकरानेही तोंड उघडलं नी नकली पोलिस पाठवून आपणच माल कसा हडप केला ते खडाखड सांगून टाकलं .

"म्यानेजरगिरी करीत लय मलय खालास तरी तुमची समादानी नाय झाली...खालेल्या ताटात हगलास भडव्यानो तुमी... पन खावचा कसा ह्येच्या पक्षी खालेला पचवायचा कसा? ह्या येवजूक अक्काल लागता ती कमी पडली

तुमची... तुमी शाप भयाक्री , म्हणान आदी गेली अक्कल नी मग्ये झाली नक्कल म्हंतत तशी तुमची गत झाली . पोलिसानी टरक अडवल्यावर लगेच हौद्यातल्यो म्हालाच्च्यो पेटयो उज्जू सोदून काडलानी ह्यां माकां कळलां ना तवाच तुमचां बिंग फुटला येडझयानो! तुमका अशे सोडणार नाय मी...आदी माल खय दडवलाहास तेचो ठिकाणो सांगा... माजे तांडेल थंय जावन म्हाल घ्येवन इले की तुमका सोडीन ” पापानी पुरता डाव टाकलेला आहे हे दोघेही समजून चुकले. माल घरी दडवलेला होता. आलेल्या माणसांकडे माल द्यायला बायकाना चिठ्ठ्या लिहून दिल्यावर पापांचे तांडेल निघाले. संध्याकाळी काळवं पडताना माणसं माल घेवून परत आली. माजी युक्ती आता फुटली... म्हाल पाटवूक आता येगळी यवजना करूक झाली... ह्येंका माज्या सगळ्या येवारांची आतली बारीक- सारीक म्हायती हा... ह्येंची बोलती बंद करूनच ह्येंका सोडूक व्हये नायतर ह्ये सापासारको डूक धरती. दोघानाही भरपूर दारू पाजून पापानी त्यांच्या जीभा छाटून टाकल्या नी त्याना विजयदुर्ग बंदरात उतरून टाकायचं फर्मान सोडलं.

*************

## ६. कोरोनाची तिसरी लाट

म्हणता म्हणता कोरोना देशभर पसरला. कणकवली परिसरात कोरोना पसरला. पंधरा दिवसात कोरोनाने वीस बळी घेतले. मग हळू हळू आजुबाजूच्या गावांनी कोरोनाने चांगलेच हात पाय पसरले. कणकवलीत पिसुरे, आब्दे डॉक्टरांचे मोठे दवाखाने. त्यांच्या कडे सग़ळया तपासण्या करणाऱ्या सुसज्ज लॅबोरेटरी आणि तीस चाळिस बेडच्या टोलेजंग इमारती!एरवी गर्भ श्रीमंत रुग्ण, श्रीमंत कुटुंबातल्या मुली सुना किंवा मध्यम वर्गीय घरातल्या अडलेल्या बाळंतिणी ॲडमिट व्हायच्या. पेशंट तसे बेताचेच असायचे. कारण त्यांची बीलं सामान्यांना परवडणारी नसायची. पण कमवून बसलेल्या डॉक्टरांना कसलीच चिंता नव्हती. एकदा तावडीत सापडलेल्या रुग्णाला पुरा धुतल्या शिवाय पंजातून न सोडण्याची त्यांची ट्रेड पॉलीसी अमेरिका नी चायना ट्रेड पॉलीसीलाही मान खाली घालायला लावील इतकी सुप्रिम ठरणारी !

कोरोना आला आणि पिसुरे, आब्दे डॉक्टरांची चलती सुरु झाली. त्यानी कोरोनाचे रुग्ण ॲडमिट करून घ्यायला सुरुवात केली. डॉक्टर आब्दे , नी त्यांचा मुलगा- सून असे तीन डॉक्टर पण कोरोनाच्या दहशतीमुळे तिघंही कायम मास्क लावून केबिन मध्येच थांबायचे. अगदि स्टाफ नर्स , वॉर्ड बॉयना सुद्धा त्यांच्या केबिनच्या दारात थांबून डॉक्टरांशी बोलाव लागे, त्यापुढे जायची मुभा त्याना नव्हती. सिरियस रुग्ण आय.सी.यू.त असत. तिथे राऊण्डला गेल्यावर

खिडकीतून डोकावत रुग्णाच्या प्रोग्रेस चार्टवर जुजबी नजर टाकल्याचं नाटक करून तिघंही माघारी फ़िरत.

कोरोना विभाग सुरु झाल्या दिवशीच त्यानी मिरज सांगली भागातून एम. बी. बी.एस. झालेले तीन मुलगे आणि एक मुलगी अल्प वेतनावर नेमून घेतलेली. कोरोना रुग्ण ॲडमिट करणं, त्याना तपासणं सगळे सोपस्कार नवशिके डॉक्टर करायचे. मोठे डॉक्टर फ़क्त कोण पेशंट आला, काय कंडिशन आहे, एवढं इंटरकॉमवरून विचारायचे. एवढी चौकशी केल्यावर रागरंग बघून बिलाचा अंदाजे मोघम आकडा सांगायचे. प्रत्यक्ष काय ट्रिटमेंट द्यायची, रुग्ण किती दिवस राहणार सगळा हिशोब डिस्चार्ज देताना मिळेल असं निक्षून बजावायचे आणि तत्काळ भरायची रक्कम सांगायचे. कोरोना दिवसे-दिवस वाढू लागला आणि रोजची लाखो रुपयांची आवक सुरु झाली. हॉस्पिटल मधिल काही खोल्यांमध्ये जुजबी सोयी करून तिथे नव्याने आय.सी.यू. कक्ष थाटण्यात आले.

आब्दे डॉक्टरांकडिल परिवर्तनाची बित्तंबातमी मिळताच पिसुरे पतिपत्नीनेहि त्यांच्या पावलावर पाऊल टाकत तीन उमेदवार डॉक्टर नेमले. खरं तर आब्दे- पिसुरे दोन्ही डॉक्टर एकमेकांचे प्रतिस्पर्धक , पण कोरोना आला आणि दोघांनिही एकमेकांशी असलेले संबंध सुधारले. त्यांच्या नित्य गाठीभेटी , फोनाफोनी सुरु झाली. काही मालदार केसेसच्या बाबतीत आब्दे पिसुऱ्याना आणि पिसुरे अब्द्यांना कन्सल्टिंगसाठी राजरोस बोलवायला लागले. प्रसंग परत्वे पेशंटची देवाण घेवाणही होऊ लागली. इमर्जन्सी ऑक्सिजन सिलेण्डर ,

रेमडेसीवीर सोडाच अगदी नर्सेस, उमेदवार डॉक्टर सुध्दा एकमेकांकडे मदतीसाठी ये जा होऊ लागली.

कोरोनावर हुकुमी उपचार नाहीत. आलेला रुग्ण त्याची आयुष्य रेषा किती बळकट आहे त्यानुसार बचावायचा किंवा आठ दहा दिवस तग धरून डॉक्टरांना भरपूर कमाई ची संधि देऊन राम म्हणायचा. बचावणारे तसे नगण्यच ....... मरणारेच बहूसंख्येने असायचे. हळू हळू ही बाब लोकांच्या निर्दशनाला येऊ लागली. मिडीयावरही कोरोना आणि त्याच्या वरचे उपचार यांवर उलट सुलट मत मतांतरं प्रसिद्ध व्हायला लागली. ज्यांची हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याची कुवत नव्हती ते गोरगरीब लोक घरगुती पारंपारिक काढे , कोण कोण काय काय पाळं मुळं सांगतील तसे उपचार घेऊन जीव जगवण्याची शिकस्त करू लागले. आश्चर्याची बाब म्हणजे असे घरगुती उपचार घेतलेल्यापैकी बहुसंख्य माणसं कोरोना पचवून खडखडीत बरी व्हायला लागली. कणकवली जवळच्या फोंडा बाजारात पूर्वापार वेगवेगळया आजारांवर आयुर्वेदिक जडीबुटी नी औषधं मिळत असत.

फ़ोंड्याच्या आजूबाजूला कातकरी वैदू यांचा बहुसंख्येने रहिवास. ते लोक रोज वेगवेगळी ताजी पाळं मुळं, कुडेपाक, गरूड वेलीचा काढा ही औषधं कोरोनावरचा रामबाण उपाय असं छातीठोक सांगून विकू लागले. फ़ोंड्याकडे जाताना रस्त्यालगत वैदू, कातकरी कुटुंबाच्या पालांवर भट्ट्या पेटवून त्यावर मातीच्या मडक्यांतून काढ्या ओढ्यांची मिश्रणं रटरटू लागली, नी रस्त्यावरुन जाताना त्यांचे दर्प नाकात जाऊ लागले. माफ़क, गोरगरीबाला परवडणारी किंमत आणि त्याहीपेक्षा उपयोग नसला तरी जीवावर बेतण्याचा धोका नाही,

म्हणून सर्व सामान्य लोक ही औषधं निर्धास्तपणे घेऊ लागली . यातही नित्य कुडेपाक आणि गरुडवेलीचा काढा घेणं हे कोरोनावरचे रामबाण उपाय मानले जाऊ लागले.

आरंभ काळी कोरोना पॉझिटीव रुग्ण शिलकीतला पैसा काढून, दागदागिने मोडून, कलमांच्या बागा गहाण टाकून, जमिनी विकून, प्रसंगी पै पाव्हण्यांकडे उधारी उसनवारी करून जीव बचावेल या आशेने आब्दे - पिसुरे डॉक्टर गाठीत. पण पैशापरी पैसा घालवून कुटूंबाला कंगाल करून लाख मोलाचा जीव वाचेल याची शाश्वती नव्हतीच. दीड दोन वर्षानंतर मात्र कुवत नसलेल्या मध्यम वर्गीय माणसांचा दवाखान्यांकडे जायचा ओघ हळू हळू कमी होत गेला. बहूसंख्य समजूतदार माणसं आजार अंगावर काढून घरच्याघरी काढे ओढे घेत, जीव जगला तर जगला ..... लाखो रुपये मातीत घालून डॉक्टरांची भर करण्यापेक्षा देवावर भार ठेवून समाधान मानू लागली. ज्यांच्याकडे पैशाचं पाठबळ होतं ते लोकही निरूपाय म्हणून ॲडमिट होत तेही डॉक्टरांची नजर चुकवून काढे , चाटणं असे आयुर्वेदिक उपायही करीत. रुग्णाला भेटायला येणारे नातेवाईक खाण्याच्या डब्यांतून, आंघोळीच्या कपड्यांतून चोरुन घरगुती औषधं गुपचूप पोच करीत. असा दुहेरी उपचार घेणारी बहूसंख्य माणसं मात्र कोरोनाच्या कचाट्यातून बचावायलाही लागली.

हॉस्पिटल मध्ये दाखल झालेले रुग्ण आय.सी.यू.तून जनरल वॉर्डात हलवले की घरची माणसं सुटकेचा सुस्कारा सोडायची. पण हा आनंद अल्प काळच टिकायचा. एकतर रुग्ण एक-दिड दिवसात आटोपायचा. क्वचित एखादा घरापर्यंतचा पल्ला गाठून दोन तीन दिवसात गावचं स्मशान जवळ

करायचा. वर्ष दीड वर्षात एक गोष्ट लोकांना पुरेपूर उमगली की, हॉस्पिटलमध्ये भरती होणं, आय.सी.यु.त ठेवणं, रेमडेसीवीर, प्लाझ्मा हे उपचार म्हणजे हॉस्पिटलांची चार पाच लाख बीलं भरून माणूस शेवटी गमावायचा नी आपल्या माणसासाठी पाण्यासारखा पैसा ओतला हे समाधान मिळवण्या इतपतच कामाचे ...... हे कोरोनातून बचावण्याचे शाश्वत उपाय नव्हेत. ही बाबही जनसामान्यांच्या लक्षात येवू लागली.

आरंभकाळी ॲडमिट होणारी बहुसंख्य माणसं लाखो रुपयांची बीलं भरून मरताना बघून दवाखान्यात काम करणारी माणसंही अंतर्मूख व्हायची. येणाऱ्या रुग्णाना डॉक्टर लोक कसे लुटताहेत हे उघड्या डोळ्यानी बघून डॉक्टरांच्या नावाने बोटं मोडीत बसायची. डॉक्टरी उपायातला फ़ोलपणा आपोआपच लोकाना उमगून येऊ लागला तसतशी रुग्णांची संख्या घटत चालली. आणखीहि दोन गोष्ट याला कारणीभूत झाल्या .एक म्हणजे सततच्या लॉकडाऊन आणि वाहतूक निर्बधांमुळे व्यापार रोजंदरी ठप्प झाली. आंबा वाहतूक बेभरवशी झाल्यामुळे हुकमी मिळकतीचा मार्ग रोडावला. दोन वर्ष होवूनही कोरोना आटोक्यात येत नाही... कशाचीच शाश्वती नाही हे वास्तव ओळखलेली माणसं आता सावध पवित्रा घ्यायला लागली. त्यात जडी बुटी - काढे ओढे यांचे दृष्य परिणाम शाश्वत वाटायला लागले.

ॲडमिट होणाऱ्या परिचिताना डॉक्टरांकडे काम करणारी नर्स, वॉर्डबॉय हेच सावध करू लागले. "आता आमी हंय काय चल्ला हां तां बगतव गेला वरीस भर... आमी सांगणा चूक... पण तुमी आमचे बऱ्याचे म्हनान सांगतो, हय पेशंटाक आक्सिजन देतत तेवडो खरो ... बाकी औशदां विन्जिक्शना देतत

तेच्यात काय दम नाय... हंय धा बारा दिवस काडून चार पाच लाखाची डाक्तरांची भर करून पेशंट वरची तिकिट काडतत. काय काय पेशंटांक पै पावणे फोंडा बाजारात्सून काढे नी भुकटी गपचीप हानून देतत ... तेचो मातर गुण पडता... ” हा कान मंत्र ऐकून परिचित मंडळी तसे उपाय करीत नी रुग्ण कोरोनातून बचावतही. वर्ष भरानंतर डॉक्टरांच्याही निदर्शनाला आलं की, पूर्वी जे उपचार करूनही रुग्ण बचावत नसत त्याच उपायानी वाचणारांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे, पण ॲडमिट होणारांची संख्या मात्र बरीच घटत चालली. आब्दे पिसुरे डॉक्टरांनी या गोष्टीवर बराच खल केला. त्यांच्या चर्चेत काढे , पाळा मुळांची भुकटी हे सर्व सामान्यांमध्ये प्रसृत झालेले हुकमी उपाय हे सर्वांना पटलं. ॲडमिट होणाऱ्या पेशंटाना त्यांचे नातलग डॉक्टरांना फ़सवून चोरून मारून ही औषधं पोचवीत असणार म्हणून रुग्ण बरे होण्याच प्रमाण वाढलं यावर सगळयांचंच एकमत झालं.

आता सावध झालेल्या डॉक्टरांनी पेशंटना भेटायला येणारानी आणलेल्या सामानाची काऊंटरवर तपासणी सुरु केली. चोरुन आणलेल्या भुकटीच्या पुड्या , काढ्याच्या बाटल्या जप्त व्हायला लागल्या. अर्थातच कोरोना मुक्तांची संख्या पुन्हा घटायला लागली. डॉक्टर इतकच करून थांबले नाहीत. फोंडा बाजारात राजरोस विकल्या जाणाऱ्या जडीबुटी विरुद्ध आरोग्य मंत्र्यांपर्यंत तक्रारी गेल्या. झरझर चक्रं फिरली नी पोलिसानी रेड टाकली. पोलिसानी अवैध औषध निर्मिती करणाऱ्या भट्ट्यांची तोडफ़ोड केली. त्या ठिकाणी जी औषधं , जडी बुटी सापडली त्यासह तिथल्या माणसाना कैद केलं. त्याना तुरुंगात डांबून त्यांच्यावर अवैध औषध विक्री विरोधात केसेस भरल्या गेल्या. संपूर्ण राज्यात या पोलिस कारवाई चा बराच गाजावाजा झाला.

माध्यमांमधून उलट सुलट चर्चा झाल्या. नी हे प्रकरण थंडावलं. अर्थात नंतरही चोरून औषध निर्मिती आणि विक्री सुरूच राहिली. वर्ष दीडवर्ष उलटलं नी हळू हळू लोकं कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाला. लोकांच्या मनातली कोरोनाची दडस कमी होत गेली नी परिस्थिती पूर्ववत व्हायला लागली.दरम्याने अतिवृष्टीमुळे महापूर, दरडी कोसळणं या नव्या आपत्तींमुळे कोरोना प्रकरणातला दमही संपत आला नी मिडिया वरची हाकाटी कमी कमी होत गेली. मात्र मुरब्बी व्यापारी लॉबी कोरोनाची तिसरी लाट येणार अशा वावड्या उठवीत राहिली. आता आब्दे पिसूरे डॉक्टर चौकडी कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची प्रतिक्षा करीत आहेत.

********-

## ७. स्कायलॅब पडली

त्या वर्षी ११ जुनला शाळा सुरु झाली. प्रार्थना संपली आणि क्लासटीचर आपआपल्या वर्गांवर गेले. स्टाफ रूममध्ये आम्ही चौघे जणच उरलो . विषय एकच ... स्कायलॅबचा. गेले पंधरा वीस दिवस वर्तमान पत्रांमध्ये पहिल्या पानावर रकाने भरून स्कायलॅब कसं भरकटलं आणि महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर कोणत्या ठिकाणांवर ते कोसळण्याची शक्यता आहे ? त्याच्यामुळे केवढी मोठी हानी संभवेल याची रसभरीत वर्णनं असायची. रेडिओवरही बातमी पत्रांमध्ये दिवसभर याच उलटसुलट बातम्या आणि संकट प्रसंगी लोकानी कोणती खबरदारी घ्यावी याच्या पोकळ चर्चा व्हायच्या. अमेरिकेचे राजदूत थॉमस रिबोलवीच यांचे नाव पेपर वाचणाराना तोंडपाठ झाले होते. कारण पेपरमध्ये त्यांचा हवाला देवून काय काय नवीन माहिती दिलेली असे. आमच्या गप्पा सुरु असताना हेडमास्तर पुजारी सरही गेल्या साताठ दिवसांचे लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाईम्स पेपर घेवून स्टाफ रूम मध्ये आले. त्यानी पेपरचा जुडगा टेबलावर टाकताच आम्ही अधाशासारखे पेपर्सवर तुटून पडलो.

७८ टन वजनाची नऊ मजली इमारती एवढी स्कायलॅब १४ मे १९७३ला अमेरिकेने अंतराळात सोडली होती. जवळ जवळ ४/५ वर्षे ती पृथ्वीभोवती प्रदक्षिणा करीत आपले काम चोख बजावत राहिली. कधिमधी रात्रीच्या वेळी एक छोटासा तारा आकाशात वेगाने फिरताना दिसे . तो तारा नसून अमेरिकेने सोडलेली स्कायलॅब आहे असे जाणते लोक सांगत. पण अकस्मात अंतराळात

झालेल्या सौर वादळामुळे स्कायलॅबचे पॅनल्स जळून गेले. स्कायलॅबची उर्जा पुरवठा यंत्रणा बंद होवून इंजिन्स बंद पडली आणि स्कायलॅब भर्कटली. नियंत्रण सुटलेली स्कायलॅब मृत्यूदूत बनून पृथ्वीकडे झेपावू लागली. ती नेमकी कोणत्या भागावर कोसळेल याचा नक्की अंदाज कोणत्याही तज्ज्ञ शास्त्रज्ञाला देता येईना. त्या वेळी पुऱ्या गावात अवघे तीन रेडिओ होते. एक ग्राम पंचायतीत , दुसरा दादा बामणाकडे आणि तिसरा हरीभाऊ ठाकरांच्या सासवेकडे. दादांचा बॉम्बे पोर्ट्रस्टमध्ये मोठ्या हुद्यावर असलेला भाऊ शानु ह्याला बक्कळ वरकमाई व्हायची म्हणून त्याने स्टेटस सिंबॉल म्हणून घरी रेडिओ दिलेला.

हरीभाऊंची सासू, तिला सगळे लळतीण काकू म्हणत. तिचा धाकटा मुलगा शामराव बंगलोरला कुठच्या तरी अमेरिकन कंपनीत मॅनेजर होता. गप्पा रंगात आल्या की लळतीण माना वेळावीत डाव्या हातावर उजव्या हाताची मूठ आपटून ठसक्यात सांगायची, “आमच्या शामरावास महिन्याला अठ्ठावीस हज्जार रुपये पगार आहे. ” शामराव बायको मुलांसह जीप गाडी घेवून गावी आलेला असताना दादा बामणाच्या भावाने घरी रेडिओ बसवला हे त्याला कळले. मग त्याने मुद्दाम कोल्हापुरला जावून एअर व्हॉईस चा रेडिओ आणून ओटीवर बसवला. लळतीणीच्या मोठ्या मुलीने शेजारच्या हरीभाऊशी आईच्या इच्छेविरुद्ध पळून जावून लग्न केले. म्हणून आई मुलीचे बोलभाषण बंद होते. पण लळतीण हरीभाऊशी बोलायची. चारीही नातवंडं कायम आजीच्या घरीच असत.

जेवणखाण, पूजा वगळता हरीभाऊचा मुक्काम कायम लळतीणीच्या ओसरीवर असे. मंगल प्रभात, बातम्या, कामगार सभा, पुन्हा प्रपंच आणि रात्री

दहा वाजता आपली आवड हे कार्यक्रम तो ऐके. सोबतीला वाडीतले पाचसहा रिकामटेकडे बापये , गाणी आयकायला चटावलेली पोरही अधे मधे येवून टेकायची. दिवसभर मोठ्या आवाजात रेडिओ सुरुच असायचा. आम्ही तीन शिक्षक लळतीण काकूच्या शेजारीच असलेल्या हिर्लेकरांच्या बंद वाड्यात खोल्या घेवून रहायचो. स्कायलॅब प्रकरण सुरु झाल्यावर आम्हीही बातम्या ऐकायला जायचो. नासाच्या वैज्ञानिकानी स्कायलॅब हिंदी महासागरात कोसळेल अशी एक शक्यता वर्तवली आणि जगातल्या इतर देशांपेक्षा भारतात सर्वाधिक चिंतेचे वातावरण निर्माण झाले. रेडिओ वर ही माहिती ऐकल्यावर हरीभाऊ म्हणाले,“ हे गोऱ्यांनी योजून केलेले कपट कारस्थान आहे. आपली चामडी बचावण्यासाठी त्यानी ते स्कायल्याब मुद्दम भारताकडे ढकलून लावलेनी असणार. त्यांचा काय भरवसा ? ”

ऐकणारे त्याना काय काय विचारीत रहात. “आता आमी आकाशात फिरताना बगली ना ती चान्नी... असोन असोन केवडी मोटी आसनार? लयच तर चार हात लांब नी तीन साडेतीन हात रुंद... नी ती पडली तर असा काय लुकसान होनार? ” कधिकाळी मुंबईत त्याने लांबून विमान बघितलेले, त्यावरून त्याने केलेला अंदाज. त्याला समजावीत हरीभाऊ म्हणाले, खुळो काय तू? हुंबयत नव माळ्याची इमारत बगलस ना तू ? तेवडा मोटा इमान हा तां... हय पडला तर पुरी वरची वाडी नायशी करून टाकीत. तां पडात तवां मोटो फटाक्या सारको आवाज व्हयत तेना कानाचे पड्डे फाटती. सगळ्या म्होरी आग लागोन निस्ती लंका होयत् लंका... ”

ही भयाकारी माहिती गावभर पसरली आणि सगळीकडे एकच घबराट पसरला. भरीस भर म्हणजे चारसहा दिवसात मुंबईत राहणाऱ्या पंधरावीस चाकरमान्यांची कुटुंब जीव वाचवायला गावी आली. आता सांज सकाळ बाया बापये रेडिओवाल्यांच्या घरी नी ग्रामपंचयातीत गर्दी करायला लागली. गर्दीचा आवाका वर्णन करताना हरीभाऊ सांगायला लागले, " आम्हांस आता दिवसाडी हजार पानें, दोन रत्तल सुपारीची खांडे , चार मुठी तंबाखू नी दोन पांढरा धागा विडी बंडले पुरत नाय. " लोक बसल्या बसल्या बिड्या फुकीत, कोणी पानाचे तोबरे भरीत नी जाताना एक विडा बनवून कडोसरीला खोचून घेवून जात. बातम्या संपल्या की जाणते ऐकलेली माहिती जानपद माणसाना समजावून सांगत.

दोन दिवसानी हायस्कूलात गावाची सभा झाली. अस्मानी अरिष्ट टळावे म्हणून ग्रामदैवत गांगेश्वराला नित्य लघुरुद्रासह अभिषेक सुरु करायचे ठरले. वाडी वाडीवार सकाळ संध्याकाळ एक रामनाम जप सुरु करायचेही ठरले. गाव सभा झाल्यामुळे खरोखरच जगबुडी होणार म्हणून लोक काळजारले. सुतार वाडीतली राधे आक्का नवरा बाळगीना म्हणून माहेरी आईकडे रहायची. ती कोंबड्या पाळून चरितार्थ चालवी. मागिलदारी प्रशस्त आंगण होते ते निगडीच्या - आंजणीच्या गच्च सलड्यानी बंदिस्त करून नी वरती रापणीची जाळी लावून ती दिवसभर त्यात कोंबड्या सोडून ठेवी. चार पिल्लां पासून पन्नासेक कोंबडी झाली. रोज तीस चाळीस अंडी ती विकी. बियाण्या पुरते चार पाच कोंबडे राखून बाकीचे कोंबडे आणि खुडुक तलंगा विकी. गाव मिटींग झाली नी राधे आक्का चितागती झाली. घरात ती नी म्हातारी दोघीच, बापया माणूस कोण नाय. अस्मानी सुलतानी झालीच नी न जाणो म्हातारी एकटी

राहिली तर वादी दुष्मन तिला लुटून खातील. म्हणून कोंबडी विकून टिकून बियाण्यापुरती चार पिल्ली घेवून घरदार बंद करून गोठिवऱ्यात मावळयाच्या आश्रयाला जावून रहाचये तिच्या मानाने घेतले.

आम्हाला कळल्यावर आम्ही तिची समजूत घालायचा खूप प्रयत्न केला. त्या वेळी बेतवार कोंबड्याचे पंधरा ते वीस रुपये मिळत. आडसंधीला लोक किंमत पाडून देणार. इथे काय नी गोठिवऱ्यात काय मरण यायचे असले तर ते काय चुकणार नाय. आम्ही समजावायची शिकस्त केली. तिने एकच पालुपद लावले. आमची भावकी बरोबर नाय. मी कोंबड्याच्या धंद्यात चार पैशे कमावातय ते लोकांच्या डोळयार येतेत. उद्या आमी मेलाव तर सोदे घरदार लूटून न्हेतीच पन आमका धड अग्नि देती की जाग्याक सडवती काय सांगता येणार नाय. माजो बेत ठरलो तो थरलो. हय अवघाती मरण्या पक्षा मावळयाच्या सावलीत निचिंतीन सुकान डोळे मिटती. दोन दिवसात मिळतील त्या पैशाना सगळी कोंबडी विकून बियाण्यापुरती चार पिली आणि जोखमीचं सामान घेवून दाराला टाळं मारून आक्का आयशीला सोबत घेवून गोठिवऱ्यात निघून गेली.

गावात जशी अवकळाच पसरली. एरवी चार जिन्नस शिलकीला राखून पोट आवळून राहणारी भावरथी लोकं. त्यांचीही बुद्धी फिरली. जगबुडी तर नक्की होणार मग शिलकीला कोणासाठी ठेवायचं? बऱ्याच जणानी मुडे फोडले. कोंबडी बाळगणारे पूर्वी बियाणं म्हणून चार कोंबडी राखून ठेवीत असे. पण आता माणसांचा विचारच बदलेला, जीव आहे तोवर खावून घ्या! लोकानी बियाण्याचे कोंबडे कापूनमटण रांधून खाल्लं. मुंबैवाल्यासाठी गाडग्या मडक्यात दडवलेल्या काजी भाजायला बाहेर काढल्या. लावणीच्या टायमाला खायला

म्हणून माती लावून साठवून ठेवलेल्या फणसाच्या आठिळा, शिंक्यात घालून साठवणीला ठेवलेले गोलिम, सुकटे बाहेर काढली. चार दिवस आहेत तोवर सुखात खावून मरा. असा सगळयांचा दृष्टिकोन बनला.

बंदराच्या मावळत खाडीच्या मध्यभागी चाळीस एकरात पसरलेलं जुवं ( बेट ) होतं . तानु बाणे नी भगवान वालम यांच्या घरवडी तिथे खंडाने शेती करून पावसाळी चाळीस खंडी भात पिकवीत. जुव्यावर गोड्या पाण्याचा जिवंत झरा असायचा. त्या पाण्यावर उन्हाळी वांगी,मिर्च्या, मुळा, चवळी, नवलकोल अशी भाजी पिकवीत. जुव्याच्या कडेला गच्च कांदळ नी चिपी वाढलेल्या. ३०/४० फुट उंच गोदे कांदळ, कळंब असायचे. तसेच डेरेदार आंब्याची झाडं आणि गगनावेरी उंच वाढलेले साठ सत्तर माड . त्या आडोशाला पर्ल्या नी लवू भंडारी दारवेची हातभट्टी लावीत. दिवसा लांबून धूर दिसला असता म्हणून रात्री भट्टी लावीत. बासष्ट साली मोठे जोवूळ (चक्री वादळ) झाले. वारे एवढ्या सोसाट्याचे की, घों घों असे भयाकारी आवाज यायचे. मळयातले माड - पोफळी मुळासकट उन्मळून पडले. गावदरीत एक उंच झाड शिल्लक राहिले नाही.पण जुव्यातल्या राखणदार असा जागृत की तिथल्या झाडांची एक टाळीही मोडली नाय. ते सोडाच पण माडाच्या आमसुख्या सावळीही गळल्या नाहीत.

जोवूळ शमल्यावर जुव्यातली झाडे धक्काही न लागता शाबूत राहिली हे सगळयाना अजाबच वाटले. म्हणून येणाऱ्या अस्मानी सुलतानीतून बचावण्यासाठी तानु आणि भगवान दोन्ही घरवडी घरदारं बंद करून बायका पोरं, गुरं-ढोरं घेवून जुव्यावर रहायला गेली. त्यांच्या पाठोपाठ लवूची घरवडही

गेली. जुव्यावर कावणं बांधून तिथे गेलेले लोक निश्चिंत झाले. त्यांचं बघून जुव्याचा मालक आबा खोत तोही गुरं ढोरं नी कुटुंब कबिला घेवून जुव्यावर रहायला गेला.जुव्यावरचा राखणदार अस्मानी सुलतानी झाली तरी आपल्या केसालाही ढका लागू देणार नाही असा ठाम विश्वास बाळगून ती लोकं निर्धास्त झाली.

गावदेवावर लघुरुद्र अभिषेक आणि वाडी वाडीवार सकाळ संध्याकाळ सामुहीक नाम जप सुरु झाले. रात्री भजनी मंडळांच्या बाऱ्या चालू झाल्या. गावातल्या झाडून सगळया मुंबईकरांची कुटुंबं येवून गाव भरला. रेडिओ वाल्यांच्या ओटीवर नी ग्राम पंचायतीच्या चावडीत बातम्या आयकायला बोट शिरेना अशी गर्दी व्हायला लागली. एरव्ही देवधर्माची खिल्ली उडवणारे अमेरिकन वैज्ञानिक साळसूदपणे लोकाना आवाहन करू लागले, 'विल पॉवर वाढवा... ' बातमी पत्रात हे आवाहन सांगितल्यावर हरीभाऊनी विचारले, "काय हो सर ! ही विल पावर काय भागनगड आहे? तो अमेरिकेतला कोणसासा शास्त्रज्ञ ते वाढवायस् सांगतोहे म्हणे" मग मी त्याना अर्थ सांगितला. "अहो विल पॉवर म्हणज्ये इच्छाशक्ती... ती स्कायलॅब मानवी वस्तीत पडणार नाही अशी ठाम इच्छा लोकानी मनातल्या मनात करायची ..." त्यावर खो खो हसत ते म्हणाले, "हे म्हंजे परभारे पावणे तेरा... वा रे वा गब्रूनो!

ह्यानी विद्वास करणारे शोध लावायचे नी ते आंगलट आले की हे पोकळ सल्ले देवून काखा वर करायस् मोकळे. त्यास्नी आधी विचारायस् हवे, की ते स्कायल्याब सोडलेत तेव्हा आम्हास विचारले होतेत काय ? नी विलपावर वाढवायची म्हंजे फुग्यात हवा भरायची नायतर भांड्यात पाणी ओतावे इतके

सोपे आहे काय सोद्यानो? वील पावर वाढावायची म्हणजे नेमकें काय करायस् हवें ते सांग म्हणावें सोद्यानो ... पाखंडी हरामखोर साले. हे एक नंबरचे सोदे... ''नमस वाडीतला आबा वालम गिरणीत जॉबर होता. तो फंड घेवून गावात आल्यावर त्याने महिना दीड / दोन रुपये व्याजाने कर्ज द्यायचा धंदा सुरु केला. महिन्याला शंभर रुपयावर दीड/ दोन रुपये व्याज हे गावातल्या अडाणी लोकाना कमी वाटे.

या धंद्यात आबाचा चांगलाच जम बसला. तो डायरीत लिहून ऋणकोचे नाव लिहून त्याची सही/ आंगठा घेई नी महिना भरला की वाडी वाडीवार वसुली करीत फिरे. मुसलमान वाडीत तर घरठेप कर्जदार होते. सगळयांचा मच्छिमारीचा धंदा असायचा. ते आठवडाभर दर्यात असत नी शुक्रवारी वाडीत येत. त्यावेळी आबा फेरी मारायचा पैसे मिळाले नाहीत तर त्याबदल्यात मुसलमान मासे देत. गरीब कुळवाडी भाजी देत, कोण कोण भात देत, कडदण देत, नारळ बोंड , केळघड, गीमात आंबे – फणस- काजी देत. जे मिळेल ते नगण्य पडत्या भावात आबा पदरात पाडून घेई.

मजुरीवर बाया माणसे ठेवून त्यांच्या करवी भाजी, मासे,नारळ मांडावर किंवा गावात फिरून ते विकी. कडदण, तांदूळ, नाचणे गावतल्या किराणा दुकानदाराना विकी. रोज उठल्यावर कुठच्या वाडीत जायचे ते ठरलेले असे. त्याच्या सोबत तीन चार दारुडे भले मोठे चिव्याचे दांडे घेवून असायचे. त्यामुळे बिनबोभाट वसूली व्हायची. लोक त्याच्या माघारी म्हणत 'आज दाण्डेकराचो फेरो येयत्...' यातला विनोद असा कि, हातातला दाण्डा खण्ण खण्ण आपटून गावभर वर्दी देत फिरणाऱ्या महाराला गाव रहाटीत 'दाण्डेकर' ही उपाधी असे.

साताठ वर्षात आबा चांगलाच वधारला. गावातल्या पोस्टात पैसे ठेवले तर बातमी फुटेल म्हणून तो राजापुरच्या पोस्टात जावून दाम दुपटीच्या योजनेत रक्कमा गुंतवी.

स्कायलॅब पडायची आवई उठली नी कसं कोण जाणे पण काही जहांबाज लोकानी आबाच्या व्याजबट्ट्याच्या धंद्यामुळे गावताले पाप वाढले नी नको ते अरिष्ट आले असा एक सूर लावल. भोळ्या भाबड्या लोकाना ही ही गोष्ट पटली. कारण सुमारे आठवडाभरापेक्षा अधिक काळ गाव देवाला अभिषेक करून , वाडी वाडीवार सकाळ संध्याकाळ जप, भजने करूनही संकट टळले नाही हे जरा विपरीतच होते. पूर्वी प्लेग आला, मलेरिया, नारू अशा महामाऱ्या आल्या होत्या तेंव्हा सप्ताहभर गावदेवावर रुद्राभिषेक केल्यावर त्यांचा जोर कमी झाला होता. कधिमधी ऐन लावणीच्या टायमाला पाऊस दडी मारी. मळे कोरडे होवून भाताची रोपं सुकायला लागत . मग जाणते लोक देव बुडवीत. ग्राम दैवत गांगेश्वराची पिंडी बुडे पर्यंत घाभारा पाण्याने भरीत. त्यानंतर दोन तीन दिवसात हुकमी धो धो पाऊस सुरु होई. यापूर्वी अनेकदा याची प्रचीती घेतलेली होती. असे देवाचे सत्व असताना अजून संकट टळत नाय त्याअर्थी कायतरी मोठे आडमेळे असणार असं जाणते म्हणू लागले.

गावात उठलेली आवई कर्णोपकरणी आबाच्या कानावर गेली.

स्कायलॅब पडणार ह्याचा चांगलाच धसका आबानेही घेतलेला होता. हा जनापवाद कानावर गेल्यावर आबाने गिरमाईच्या जागृत थळावर कौल घेतला. देवीने हा धंदा बंद करायचा कौल दिला. न जाणो या गोष्टीवर बारा पाचाचा मेळ बसला तर गाव आपलं हगणं मुतणं बंद करील हे आबाने ओळखलं. मग धूर्त

विचार करून आबा ऋणकोना सांगू लागला, “मी आता व्याजबट्टो बंद करणार... तुमचा कर्ज आसा तां चार आणे आठ आणे हिश्शान मुद्दल फेडा... तुमचो हात चलात तेवडां , काय जमात तां देवा नी तुमी मोकळे होवा नी माकाव मोकळो करा.” साताठ वर्षे महिनोमाल व्याज भरून लोकजेरीला आलेले ... पण मुद्दल काय फिटले नाय नी महिनोमाल दाण्डेकराचा फेरा काय सुटला नाय... जगबुडी झालीच तर आबाच्या कर्जात रहायला नको असा भावरथी विचार बहुसंख्य लोकानी केला नी कशीबशी होईल तेवढी जम करून बरेचसे लोक मोकळे झाले.

काही लोक सोदे होते, त्यानी आबा मनातून भ्यालेला आहे हे ओळखून रड खड करून कायतरी किडूक मिडूक पुढे करून आपआपली आंग वटावणी करून घेतली . ऋणको येवून व्यवहार पुरा करून गेला की आबा डायरीतले त्याचे पान फाडून टाकी. पाचसहा दिवसात बारा- चौदा आणे हिश्शाने व्यवहार मोकळे झाले. काही लोक अगदी निब्बर होते. त्यांचा नादच आबाने सोडला नी डायरी बंद करून टाकली. गिरमाईला पाच नारळाचे तोरण बांधून चूक भुल बक्षिस कर म्हणून गाऱ्हाणे घातले नी व्याजबट्टा बंद केला. झाला व्यवहारही आबाचा चांगलाच फायदा करून गेला.

त्याने जमलेल्या ठेलीभरून नोटा देवघरात पत्राच्या ब्यागेत ठेवल्या. मात्र या वेळी जगबुडी होणार म्हणताना साठवलेली रक्कम राजापुरात जावून पोस्टात पैसे ठेवायच्या फंदात तो पडला नाही. गेले दोनचार दिवस नमस वाडी, बाणे वाडी, मोंडे वाडी , आग्रे वाडी, शिडम अशी तास दीड तास चालीच्या लांब अंतरा वरची मुले अलिकडे शाळेत यायची बंदच झाली. शाळे लगतच्या चार

दोन वाडीतून जेमतेम पन्नासेक मुले शाळेत येत. मग़ तासभर कविता , पाढे म्हणून घेवून आम्ही शाळा सोडून देवू.

त्याच दरम्याने हेडमास्तरानी सहा सेलवर चालणारा नवा

ट्रांझिस्टर आणला. रेडिओ पेक्षा या ट्रांझिस्टरवर कार्यक्रम चांगले ऐकायला येत.आम्ही संध्याकाळ पर्यंत आकाशवाणी वरचे कार्यक्रम ऐकून आला दिवस साजरा करू. रात्री सुद्धा आम्ही सगळी शिक्षक मंडळी सरांच्या बिऱ्हाडी बातम्या, श्रुतिका नायतर आपली आवड ऐकत बसू.आताशा दिवसाडी सुद्धा कामाशिवाय कोण माणूस गावात फिरेनासा झालेला. दिवस जाता जात नसे. तशात अकरा जुलैचा दिवस उजाडला. आदल्या दिवशीच्या बातम्यांमध्ये अकरा तारखेला ती स्कायलॅब कोसळणार असे भाकित वर्तवलेले होते. शाळेत जेमतेम पंचवीस पोरे असतील नसतील . प्रार्थना झाल्यावर सगळेजण सभागृहात सरांचा ट्रांझिस्टर लावून ऐकत असताना अकस्मात निवेदन सुरु झाले. पहाटेच्या सुमाराला अमेरिकेची स्कायलॅब ऑस्ट्रेलिया जवळ हिंदी महासागरात कोसळली, तिचा हवेतच स्फोट होवून ती फुटल्यामुळे काही भागांचे तुकडे लोकवस्तीत पडले. पण मनुष्य हानी किंवा इतर मालमत्तेचे काही नुकसान मात्र झाले नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जिम कार्टर यानी ऑस्ट्रेलियन जनतेची माफी मागितली.

अरिष्ट निभावले... गांगेश्वराने आपल्या लेकराना सुखरूप ठेवले म्हणताना सगळा गाव देवळात अभिषेक सुरु होता तिथे जमला. काही जणानी बंदरावर जावून जुव्यावरच्या लोकाना स्कायलॅब दर्यात कोसळली, धोका टळला, तुम्ही गावात या अशी वर्दी दिली. लघुरुद्र अभिषेक आटोपला. भल्या

गुरवाने गांगोला कडकडावून गाऱ्हाणे घातले, नी देवाच्या पाया पडून लोक घराकडे परतले. दोन चार दिवसात मुंबैवाल्यांची कुटुंबे मुंबईला परतू लागली. राजापुर डेपो तून सोडलेल्या जादा गाड्या भरभरून मुंबईला रवाना झाल्या. आठवडाभराने संध्याकाळी बैल गाडीत सामानाची बोचकी नी बियाण्याच्या कोंबडीच्या पिलाची डालगी घेवून राधे आका सुतारीण नी तिची म्हातारी गोठिवऱ्यातून परत आली. लोकांच्या मनातला धसका संपला. जनजीवन पूर्ववत अगदी सुरळीत सुरु झालं. मांडावर बसलेल्या बापयांच्या गप्पात सहज कधितरी स्कायलॅबचा विषय निघाला की, गप्पिदास दारूडा नथू भंडारी हडकण्या मारी ... “ तां अमेरिकेतला पडोचा म्हनत ना ते रोजीची गोष्ट... गिरमाईच्यान सांगतय, इराकतीक लागली म्हनान मी फाटपटी उटान भायर गेलय ... तेवड्यात मावळतच्या दिशेक मोटो उजेड दिसलो , मोटा इमान जळत पेटत खाली दर्यात पडलेला दिसला. पन ह्यां काय आक्रित घडताहा, माजी काय ट्यूब पेटली नाय . साडे धा वाजता शाळकरी चेडू सांगत इला की, तां अमेरिकेचा इमान पडोचा हुता ना तां तिकडे लांब दर्यात पडला... तवां मी समाजलय की, फाटपटी माका जां दिसलाना तां ताच व्हता...”

**************

# ८. सलाईन थेरपी

के. के. अ‍ॅग्रो प्रॉडक्टस च्या डायरेक्टर बोर्डाची दुपारी अडीज वाजता सुरू झालेली मिटिंग रात्री साडे दहाला संपली. चौदा वर्षाच्या कारकीर्दीत इतकी लांबलेली ही पहिलीच मिटींग! प्रदीप मिटींगमधून बाहेर पडला तरी टेन्समध्येच होता. गॅट करार झाल्यानंतरअसंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या अक्षरश: टोळधाडी सारख्या भारता मधल्या अ‍ॅग्रिकल्चर सेक्टरमध्ये घुसल्या.विक्रेत्यांना भरपुर कमिशनचं आमिष दाखवून, जबरदस्त अ‍ॅडव्हर्टायझिंग, आणि गव्हर्नमेंट ऑफिसर्सना तोबरे चारून खिरापतीसारखे मिळवलेले आय. एस. आय. मार्क! ह्याच्या जोडीला प्रचंड आर्थिक पाठबळ आणि मार्केट कॅप्चर करण्यासाठी वाट्टेल त्या हीन पातळीवर जायची नीतीमत्त!!!! के.के.सारख्या रिनाऊण्ड रिलाएबल ग्रूपलासुद्धा त्यांचा फटका बसला. त्यांच्या अ‍ॅग्रो प्रॉडक्टस् ची विक्री खप खूप घसरायला लागली. हे असं फार काळ सुरु राहणं कंपनीला परवडणारं नव्हतं, कंपनी बँकरप्ट व्हायला वेळ लागला नसता.

के.के.चे बिगबॉस मिस्टर कलियथ यानी तर सरळ सरळ कंपनी बंद करून इंव्हेस्टमेण्ट एनकॅश करण्याचा सल्ला त्यांचे पार्टनर मिस्टर खन्ना याना दिला. कलियथसरांच्या दृष्टिने ते ठीकच होतं. वेगवेगळया सेक्टर्समध्ये त्यांचे आणखी तीन-चार बिझनेस सुरु होते.इथली इंव्हेस्टमेण्ट इलेक्ट्रॉनिक्स सेक्टरकडे वळवून त्यानी नवा बिझनेस सुरु केला असता. खन्ना सराना मात्र कंपनी बंद करणं पटत नव्हतं. त्यानी जीवाचं रान करून ग्रूप नावारूपाला

आणलेला... बहुराष्ट्रीय कंपन्यांचा हा भुलभुलैया फारकाळ टिकायचा नाही. त्यांची देखभुलवणी स्ट्रॅटेजी काही काळ टिकणारी... पवसाळ्यात रुजणाऱ्या कुत्र्याच्या छत्र्यांसारखी अल्पजीवी आहे, असं त्यांचं ठाम मत! केवळ ट्रेड पॉलिसीवर मार्केट कॅप्चर होत नसतं,नव्याची नवलाई संपली की त्यांची ही सद्दी मोडीत निघेल हे खन्ना ओळखून होते. त्यांची फर्टिलाझर्स नी पेस्टिसाईडस् वापरून उत्पादनात काडीचीही वाढ होत नाही हे लक्षात आलं लोक त्यांच्याकडे पाठ वळवून त्याना जमिनीवर उतरतील असा त्यांचा विश्वास होता.

के.के. ग्रूपला डॅश देणारी बहुराष्ट्रीय कंपन्यांची किटकनाशकं नी टॉनिक्स (म्हणजे चक्क कॉन्सन्ट्रेटेड खतं) लॅब टेस्ट मध्ये अगदीच सुमार असल्याचं निष्पन्न झालं. केवळ ‘रामबाण, खतरनाक,वज्रटोला’ अशी लक्षवेधक नावं देवून भारतातल्या शेतकरी - बागायतदाराना तात्पुरतं आकृष्ट करण्यात यश मिळालं तरी त्या उत्पादनांचा दर्जा नी प्रभाव पारखल्या शिवाय तो विश्वास ठेवणार नाही. उलट एखादं उत्पादन सुमार दर्जाचं आहे असं पारखून बघितल्यावर भारतातल्या शेतकरी बागायतदारानी तो ब्रॅण्डच मोदीत काढून त्यांच्या इतर उत्पादनांकडेही कायमची पाठ फिरवली असती. कृषि उत्पादनाच्या बाबतीत तर एका सीझनमध्येच त्याची लायकी काय आहे हे पारखता येतं. खन्नासराना कृषि क्षेत्रातलं मुलगामी ज्ञान होतं. म्हणून कलियथसरानी कंपनी बंद करण्याचा पक्काविचार बोलून दाखवल्यावर ग्रूपमधली त्यांची पूर्णम्हणजे ७०% पार्टनरशीप स्वत: घेण्याची तयारी खन्ना सरानी दाखवल्यावर मात्र पारडं फिरलं. मार्केट पॉलिसीत कलियथ हाखन्नाचाबाप होता आणि खन्नांच्या एफ़िशिअन्सीवर त्यांचा पूर्ण भरवसा

होता. त्यानी सिक्युरिटी म्हणून २०% पार्टनरशिप विकायचं मान्य केलं आणि दोघेही समान पार्टनर झाले.

पार्टनरशीपचं सेलडीड झाल्यानंतर प्राप्त परिस्थितीत कंपनीच्या ट्रेड पॉलिसीत आणि मार्केट स्ट्रॅटेजीत काही धोरणात्मक बदल करणं गरजेचं होतं म्हणून ही आजची मिटींग होती. ग्रूपच्या मालाचा सेल खुपच कमी झाल्यावर कुणाला काहीही कल्पना न देता असिस्टंट मॅनेजर साळगावकर कंपनी सोडून गेले आणि नोकरवर्गाच्या तोंडचं पाणीच पळालं. सगळीकडे मोठमोठ्या कंपन्या एकामागोमाग एक धडाधड कोसळून पडत बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या ताब्यात जायला लागल्या. के.के. ग्रूपचंही असंच काहीतरी होणार अशी शंका सर्वांनाच वाटू लागलेली. म्हणून ऑफिस अवर्स संपल्यावरही ठराविक नोकरवर्ग मिटींग संपेपर्यंत प्रिमायसिसमध्ये थांबून राहिलेला. प्रदीप बाहेर येताच ज्युनिअर्सनी त्याला अक्षरश: गराडा घातला. “कंपनी सुरूच राहणार आहे. फक्त थोडेफार ॲडनिस्ट्रेटिव्ह चेंजेस होणार आहेत” असं प्रदीपने सांगितल्यावर सगळ्यानीच सुटकेचा निश्वास टाकला.

के.के. ग्रूपचा क्वालिटी कंट्रोल काळाच्या कसोटीवर तावून सुलाखून सिद्ध झालेला होता. प्रदीप प्रॉडक्शन सुपरवायझर म्हणून आपलं काम डोळयात तेल घालुन करायचा. प्रत्येक फार्म्युला दोन-दोनवेळा चेक व्हायचा. मिक्सिंग तर प्रदीप जातीनिशी हजर राहून करून घ्यायचा. कॅन सिल्ड झाल्यावर सुद्धा ॲट रॅण्डम एक दोन कॅन्स फोडून आतल्या प्रॉडक्टचा फॉर्म्युला पुन्हा चेक केला जायचा. एवढी सगळी खबरदारी घेवूनही मध्यंतरी कंपनीवर एक मोठेच बालंट आलं. हापूस आंब्याच्या झाडावर तुडतुडे पडतात. ते मारण्यासाठी कंपनीने

पावडर फॉर्ममध्ये काढलेलं एक प्रॉडक्ट कोकण एरियात भलतंच पॉप्युलर झालेलं. प्रतिवर्षी कोकणात त्या पावडरचा विक्रमी सेल व्हायचा. पण दहा वर्षांनी त्या पावडरबद्दल ग्राहकांच्या असंख्य तक्रारी यायला लागल्या. त्या पावडरचे रिझल्टस आता पहिल्या प्रमाणे मिळत नाहीत त्या अर्थी कंपनीने मूळ फॉर्म्युला बदलेला असणार असा सार्वत्रिक ग्रह झालेला. देवगडच्या एका जुन्या डीलरने तर कोर्ट मॅटर केलं.

भयानक पेपरबाजी झाली. कंपनीने खप वाढावा म्हणून फॉर्म्युला बदलून सौम्य केला असणार... एक ना दोन, अनेक आरोप झाले. डीलर एवढा जहांबाज की त्याने हापूस बागायतदारांकडून त्या पावडरचे पाच -सहा वर्षांचे जुने रॅपर पैदा करून ते एव्हिडान्स म्हणून सादर केलेले. त्यावर पावडर मधल्या कण्टेण्टचा तपशिल फॉर्म्युल्यासह नमूद केलेला असल्यामुळे कंपनी पहिला फॉर्म्युला बदलून बागायतदारांची कशी लूट करीत आहे ते सप्रमाण सिद्ध करायचा चंगच कोकणातल्या बड्या बागायतदार लॉबीने केलेला. जमा केलेली सँपल्स गव्हर्नमेंट लॅबमध्ये चेकिंगला गेली. लॅबोरेटरीतले टेक्निशियन्स मॅनेज करायचा सल्ला कलियथनी दिला. पण खन्ना साहेब मात्र फर्म राहिले. कंपनीच्या क्वालिटी कंट्रोल सेलमधल्या प्रदीपच्या टीमवर त्यांना जबरदस्त विश्वास होता. एकही बॅच फेल जाणार नाही अशी त्यांची पक्की खात्री.

लॅब पुण्यात असल्यामुळे तिथले तंत्रज्ञ-केमिस्ट कोकणातल्या आंबा व्यावसायिकांशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रिलेशन्स असणारे नी पैशाच्या आमिषाला कालत्रयी बळी न पडणारे असणार, त्याना मॅनेज करायचा प्रयत्न अंगलट आला असता हे प्रदीपनेही खन्ना सरांच्या निदर्शनाला आणून दिलं. लॅब टेस्टचे

रिपोर्टस् आले. वेगवेगळ्या वर्षांचे फॉर्म्युले चेक केल्यावर कंपनीचा फॉर्म्युला परफेक्ट असल्याचं सर्टिफिकेट मिळालं नी केस कंपनीनी जिंकली. कंपनी कायद्याच्या कचाट्यातून सहीसलामत सुटली खरी पण एक नवा प्रॉब्लेम निर्माण झाला. कोकणातला पावडरचा खप पूर्ण बंद झाला. ही गोष्ट कंपनीला परवडणारी नव्हती. कंपनीसमोर काहीतरी वेगळं ऑप्शन स्टँड करायचं एक नवं आव्हान उभं राहिलं. सगळे टेक्निशियन्स, फार्मासिस्टस् टॉप रँकचे अधिकारी कमर कसून कामाला लागले. प्रदीपचा एक क्लासमेट बब्या भिडे! एम. एस्सी. केल्यावर तो कृषि विद्यापीठात केमिस्ट्री डिपार्टमेंचा एच. ओ.डी. झाला. तो जात्या भलताच जिनिअस! प्रदीप कायम त्याच्या कॉन्टॅक्ट मध्ये असायचा. कंपनीने तुडतुड्यांवर जी पावडर विकायची त्याचा फॉर्म्युला खरंतर बब्याच्या सुपिक डोक्यातूनच निघालेला. म्हणून प्रदीप मुद्दाम बब्याला भेटायला गेला.

प्रदीपने बब्याच्या केबिनमध्ये प्रवेश केल्या-केल्या बब्याने सलामी दिली. “ मग काय म्हणतोय तुझा क्याँव क्याँव ग्रूप?” के.के. ग्रूपचा उल्लेख तो नेहेमीच क्याँव क्याँव ग्रूप असा करायचा. कंपनीवरच्या केसची माहिती सांगून त्यालाआपला प्रॉब्लेम विचारल्यावर हसत हसत बब्या म्हणाला, “ अरे लेको , निसर्ग हा क्याँव क्याँव ग्रूपचा बाप आहे बाप! पेपरात झळकलेल्या तुमच्या केसच्या बातम्या वाचल्या तेंव्हाच त्यात काय गोची झाली असणार ते पुरतं ओळखलं मी. सतत एकच एकच कॉम्बिनेशन वापरल्यामुळे तुमचा फॉर्म्युला तुडतुड्यानी पचवलाय् आता! त्यांची रेझिटन्स कॅपॅसिटी वाढलीय् ... आता बसा यँव यँव करीत ! जुने फॉर्म्युले बदला आता.” मग लेटरहेडचा कागद ओढून त्याने नव्या फॉर्म्युल्याचे सगळे डिटेल्स फडाक्कन लिहून दिले.

प्रदीपचा म्हणजे पर्यायाने कंपनीचा प्रॉब्लेम चुटकीसरशी सॉल्व्ह झाला. पडून राहिलेल्या प्रॉडक्टस् मध्ये वेगवेगळी केमिकल्स टाकून 'चॅलेंजर ' हे पूर्ण नवीन प्रॉडक्ट कंपनीने लाँच केलं. 'चॅलेंजर' चे रिझल्टस फेव्हरेबल मिळू लागताच प्रॉडक्ट जोरदार खपायला लागलं. कोकण एरियात गेलेली पत कंपनीने पुन्हा हासिल केली. बब्याचा गुरुमंत्र हुषारीने राबवून खतांच्याही जुन्या फॉर्म्युल्यात बदल करून हापूस कलमांसाठी काही स्पेशल खतं सुद्धा कंपनीने नव्याने बाजारात आणली. पारंपारिक पावडर/ ग्रॅन्युल्स ऐवजी लिक्विड फॉर्म मधली बायो केमिकल खतं ही संकल्पना बब्याच्याच सुपिक डोक्यातून निघालेली. त्यांचा तर विक्रमी सेल व्हायला लागला. गव्हर्नमेंट जॉब मध्ये सबघोडे बारा टक्के. तिथे बब्याचा टॅलण्ट वाया जात होता.प्रदीपमुळे त्याला सगळी एक्सपिरीमेंटस् वर्कआउट करून पहायला मिळायची. प्रदीप कोणतंही नवीन प्रॉडक्ट विक्रीला ठेवण्यापूर्वी ते आपल्या कुणकेश्वरच्या बागेत ट्राय करून पहायचा.

काही वेळा त्याचे चुलते बाबुकाका यांचा या गोष्टीना विरोध व्हायचा. पण त्याचे चुलत नव्या विचारांचे होते. त्यांची दृष्टी व्यावसायिकाची होती. बाबुकाकांच्या मते शेळया-मेंढ्यांची लेंडी, शेण खत आणि टाळ मातीची हुरणी भरणी एवढी मेहनत -मशागत आणि गंधक पावडरीची राखेची फवारणी यापरती अन्य खते किंवा फवारणी करायची गरजच नव्हती. पण त्यांच्या या पद्धतीनी उत्पन्न वाढलं नसतं. बब्याने दिलेल्या फॉर्मुल्या प्रमाणे बनवलेलं ग्रॅन्युअल फॉर्म नधलं ग्रो मोअर खत कोकणात भलतंच पॉप्युलर झालं. सराट्यासारखी कलमं चार महिन्यात हिरव्यागार पर्ण संभराने भरून जायची.

पण अटलजींच्या सरकारने गॅट केल्यावर भारतीय बाजारात घुसलेल्या महाबलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यानी के. के. ग्रूपला चांगलाच दणका दिला.

कंपनीचा निम्मा धंदा कोकणातल्या आंबा व्यवसायावर अवलंबून होता. साधन शुचिता धाब्यावर बसवून बहुराष्ट्रीय कंपन्यानी नव्याने बाजारात आणलेलं कल्टार घातल्यावर कलमाना हमखास मोहोर येत असला तरी ते वाढ निरोधक असल्याने त्याचा वापर कलमांचे आयुष्य कमी करणारा होता. पण ही बाब कंपनीने व्यावसायिकांच्या निदर्शनाला आणून दिली नाही . उलट उत्पन्नाची हुकुमी शाश्वती मिळते म्हणून त्याचा खप भरमसाठ वाढू लागला. खप वाढला तशी त्याची किंमतही चौपट पाचपटीने वाढवून बहुराष्ट्रीय कंपन्यानी खोऱ्याने पैसा ओढायला सुरुवात केली.

बहुराष्ट्रीय कंपन्यांची कीटक नाशके तर सजीवांच्या आरोग्यावर विघातक परिणाम करणारी ... आंतर प्रवाही ! त्यांचा अंश फळातही उतरायचा. त्यांच्या सेवनामुळे पुढची पिढी जन्मत: विकृत उपजण्याचा धोका होता . त्यांच्या वापर निसर्गातल्या सजीवांच्या शृंखला खंडित करणारा होता. पण तत्कालिन परिणाम चटकन नजरेत भरण्या एवढा प्रभावी असल्यामुळे भरमासाठ किंमतीची उत्पादनेही व्यावसायिक बेदरकारपणे खरेदी करू लागले. साळगावकर कंपनीसोडून गेल्यावर प्रदीप असिस्टंट मॅनेजर झाला. त्याने बब्याच्या मदतीने नवनीन फॉर्म्युले वापरून कंपनीची उत्पादने मार्केटमध्ये स्पर्धा असूनही टोकून राहिली. बहुराष्ट्रीय कंपन्यांची विकृत -विध्वंसक मार्केट स्ट्रॅटेजी बब्याला अजिबात पसंत नव्हती. त्यांच्या विघातक आंतरप्रवाही कृषि उत्पादनांचे विपरीत परिणाम स्पष्ट करणारे अनेक लेख त्याने वृत्तपत्रां मधून

प्रसिद्धही केले. पण वृत्तपत्रातून समाज प्रबोधन होण्याचा आगरकर टिळक यांचा जमाना आता राहिला नव्हता. मजेची बाब म्हणजे ज्या पेपरमध्ये विघातक कीटक नाशकांचे परिणाम स्पष्ट करणारा बब्याचा लेख प्रसिद्ध व्हायचा, त्याच पेपरच्या पहिल्या पानावर पाऊण पान भरेल एवढी सायपर मेथ्रिन किंवा कॉन्फिडॉर असल्या घातक कीटक नाशकाची जाहिरात छापलेली असायची.

सामान्य लोक असल्या चकचकित जाहिरातीना पटकन भुलायचे. हापुस आंबा, द्राक्षे, डाळिंब या व्यापारी फळांचे उत्पादक आणि वार्षिक मक्त्याने बागा घेणारे ठेकेदार यांचा डोळा तत्कालिन नफ्यावर असतो. दूर्गामी परिणामांचा विचार, चिकित्सा करीत राहण्याच्या फंदात पडण्यापेक्षा भरपूर नी हुकुमी उत्पनाची गॅरेण्टी देणारं कोणतंही औषध- कीटक नाशक चढ्या भावाने खरेदी करायलालोक तयारअसत. चकचकीत रॅपर्स, देखण्या पॉलिथीन बॅग्ज आणि गिऱ्हाईकाला खरेदीवर २०-२५ % कमिशनची भुलथाप ही आता विक्रीची अॅश्युरिटी बनली. उण्या महाग किंमतीची लोकाना मुळी फिकीरच नव्हती. मल्टिनॅशनल कंपन्यांच्या घातक - अनैतिक ट्रेड पॉलिसीवर प्रदीप आणि बब्याची गंभीर चर्चा सुरु होती.

कृषिमंत्र्याना मॅनेज करून विदेशी कंपन्यानी आपली काही प्रॉडक्ट अव्वाच्या सव्वा किंमतीने सरकारच्या गळयात मारली. अन् कृषि मंत्र्यानी राज्यातल्या सगळया कृषि महाविद्यालयाना काही ठराविक बियाणी, खतं-टॉनिक्स, किटक नाशकं घेण्याची नी त्यांच्या वापरामुळे उत्पादनावर होणाऱ्या परिणामांचे रिपोर्टस् शासनाकडे सादर करण्याची अकथित सक्तीच झाली. बाब

अगदी सरळ साधी सोपी... शासनाने पुरवलेल्या बियाणी खतं याविरुद्ध रिपोर्ट करण्याचं धाडस कोणी कसं काय केलं असत? बब्या जाम उखडलेला होता. सरकारच्या या गळचेपी विरुद्ध ब्र ही न काढता तोंड दाबून बुक्क्यांचा मार म्हणतात तशी गत झालेली. पण प्रदीपला सहाय्य करून मल्टीनॅशनल कंपन्यांच्या मोनोपोलीला शह दिल्याचं समाधान त्याला मिळायचं. दुसरं म्हणजे तो एच.ओ. डी. असल्यामुळे आठवड्यातून चारदोन लेक्चर्स दिली की नवे नवे फॉर्म्युले शोधायला लागणारा निवांत वेळ त्याच्यापाशी मुबलक असायचा. अशाच उद्विग्न मानसिक अवस्थेत असताना आज पर्यंतच्या सगळया पद्धती मोडीत काढील आणि मल्टिनॅशनल कंपन्याना तोंडात बोट घालायला लावील अशी भन्नट 'सलाईन थेरपी ' त्याला सुचली. नावासह संपूर्ण पद्धतीच एवढी फॅण्टॅस्टिक होती की ती वर्कआउट झाल्यावर के.के. ग्रूपला त्यांचा प्लाँट एक्सपाण्ड करावा लागला असता. दोन दिवस सविस्तर चर्चा करून संपूर्ण थेरपीचं पेपर वर्क करून प्रदीप परत गेला.

पेपर वाचल्यावर युरेका-युरेका म्हणत नाचत सुटलेल्या आर्किमीडीज सारखीच खन्नांचीही अवस्था झाली. रिव्हॉल्विंग चेअर मधून टुण्णकन उठून ते म्हणाले, "रियली बिविचिंग, वी मस्ट सेलिब्रेट नाऊ " त्यानी प्रदीपला अक्षरश: ओढित फाईव स्टार हॉटेलमध्ये नेलं. प्रदीपला त्याचं एक्सपिरीमेंट वर्कआऊट करण्यासाठी भली मोठी अमाउंट सँक्शन करून त्याच्या दिमतीला ड्रायव्हरसह स्वतंत्र ए.सी. गाडी खन्नानी दिली. मग सगळा प्रोग्रॅम चॉकआउट करून बब्याच्या सहा पी.जी.च्या रिसर्च स्टुडंटसची टीम घेवून थेरपीची प्री टेस्ट घेण्यासाठी त्याने सरळ कुणकेश्वर गाठलं. रात्री जेवणं उरकल्यावर ही नवीन सलाईन थेरपी तो भावाना समजावून देवू लागला.

पारंपारिक पद्धतीत खतं झाडाच्या खोडापासून फुटभर अंतरावर गोलाकार चर खणून त्यात घतली जातात. ती संपूर्ण मात्रा काही झाड शोषून घेत नाही. जवळ जवळ निम्मे पेक्षाही अधिक मटेरियल फुकट जातं. स्प्रिंकलिंग पद्धतीने किंवा फवारणी करून दिलेल्या खतांच्या बाबतीतही वेस्टेज फार असायचं. या दोन्ही पद्धतीत मिळणाऱ्या रिझल्टसचा कालावधी, प्रभाव आणि आऊटपुट याचं ही काहीच उत्तर नेमकेपणाने देणं अशक्य असतं.

बब्याच्या थेरपीत झाडाच्या मुळापासून दीड फूट उंचीवर झाडाच्या बुंध्याची गोलाई बघून त्याच्या मध्य भागापर्यंत पोचेल अशा अदमासाने आठ ते दहा इंच खोल तिरपं ड्रील मारून त्यात गाभणाएवढी जाड स्टीलची पोकळ सुई खुपसायची, त्या सुईला सलाईन सारखी बॉटल जोडून काही जैवीक, झाडाच्या पेशीजल सदृश वाढीला पूरक पोषक द्रवरूप रसायनं, प्रतिकारशक्ती वाढविणारी रसायनं झाडाच्या आंतर भागात थेट पुरवायची. ही द्रवरूप रसायनं संपृक्त असल्याने आणि त्यांची निर्मिती लॅबोरेटरीत तज्ज्ञ केमिस्टस कडून करवून घ्यायची असल्याने त्याच्या डोसच्या तुलनेत किंमत अवाजवी वाटावी अशी असेल. ण्णत्याबरोबरत्याची मात्राही पारंपारिक औषधांच्या तुलनेत खूपच अल्प असणार. औषधाची मात्रा तीन ते पाच मिली म्हणजे अक्षरश: खोडाला मारलेल्या सुईत मावतील एवढेच काही थेंब इतकी अल्प असणार. पण त्यांचे दृष्य परिणाम अल्प काळात आणि नजरेत भरावे इतके प्रभावी मिळण्याची नव्याण्णव टक्के खात्री देता येणार होती.

ही माहिती ऐकताच भावांचे चेहेरे उजळले. आतापर्यंत अलिप्तपणे बाजूला बसून निर्विकार मुद्रेने श्रवण करणारे बाबूकाका मात्र नाराजीच्या सुरात

म्हणाले,“आता तूच सांगतोहेस म्हणून होय म्हणायचे इतकेच. आता तूच बघ, एकाच ठिकाणातली दहा झाडे घे... ती सारखी वाढतात काय? तर नाही..... एकाच वयाच्या सारख्याच अंगलटीच्या दोन मुलांची भूक वेगळी, त्यांच्या आवडीनिवडी नी शारिरीक गरजा दिखी वेगळ्या म्हणून त्यांचे आहार पण वेगळे नी कमी अधिक . एकजण दीड भाकरी खाईल तर दुसरा दोन खावून सुधा पुरे म्हणायचा नाय. दोघांची भुक एकाच मापात नाय मोजता यायची... एवढे मोठे झाड ते काय खाते नी किती खाते हे फक्त बृहस्पतीच जाणे... ते शास्त्र तुम्हा आम्हाला अगम्य... तुमच्या बाता आयकायलाच बऱ्या.. इतकें मोठे झाड नी ते म्हणे चार नी पाच थेंब्यात सुधारणार...माती नी गोबर... पैसे उकळून झाडाच्या जीवाशी खेळायचे धंदे ... दुसरें काय...! झाडाची नीट मेहनत करायला हवी. त्यापेक्षाही त्याला जीव लावायला हवा. मग त्याला धर म्हणून सांगावे लागत नाय नी ते कल्टार की फल्टार काय ते ते पण घालायला लागत नाय. ”

“तुला खरे नाय वाटणार कदाचित...तू तेव्हा जल्माला दिखी यायचा होतास. मे महिन्यात आमचा गोठा जळला. जेमेतेम परिस्थिती, तेव्हा तांबडा पैसा नदरेला पदायची मारामार. आमच्यावर जसे आभाळच कोसळले. तुझा बापूस एवढा खंबीर , पण ठिकाणात गेल्यावर घो घो रडायला लागला. गोठा बांधायचा म्हणजे कर्ज बोडक्यावर येणार... मग ना ईलाजाने विठू बोंडाळ्याकडे मळा गहाण टाकून कर्ज काढले. तुझा बापूस गुरे चरवायला गेला की कलमांच्या मुळात बसून रडायचा. तुला खोटे वाटेल पण कलमाना त्याची दया आली.डिसेंबरातच आगप फूट आली. त्या काळी एक म्हण होती डिसेंबर शिकंदर जानेवारी सरासरी! डिसेंबरातली फूट म्हणजे आगप माल ... चढ्या

दराने जाणार,जानेवारी म्हणजे मोठ्या प्रमाणात मागस माल जाणार नी बाजार कोसळणार, पडत्या भावाने जेमतेम आंगवाटावणी झाली न झाली अशी गत. त्या वर्षी कलमांचे एकशे साठ रुपये झाले. कर्ज फिटून चार पैसे शिलकी पडले.”

“तुझा बापूस जिता असे पर्यंत त्याची कलमातली रोजची फेरी काय कधि चुकली नाय. तो मेला हार्ट फेल होवून तो सुद्धा कलमात! हे म्हायतीच आहे तुम्हाला! आता ती तुमची कल्टार... फवारण्या नी खते...त्याने कलमे फळांच्या भाराने मोडेस्तोवर धरतात. पण दोनतीन वर्सानी फळ हे एवढे असोल्या सुपारी एवढे... आंबा काय धड पिकत नाय. देठाकडून कुसत जातो नी प्रत्येक फळात पोपी! जळले तुमचे शोध... सगळे पैशाचे खेळ.” बाबुकाकांच्या तोंडाला लागण्यात अर्थ नव्हता. अन त्यांचे बोलणे फार गंभीरपणे घ्यायचीही गरज नव्हती,कारण आता सगळा व्यवहार त्यांचे मुलगे सांभाळित असत. दुसऱ्या दिवशी टीम कामाला लागली. पाचशे कलमांची बाग त्यातल्या निवडक शंभर कलमांवर प्रायोग सुरु झाला. तीन दिवसात सगळ्या कलमाना ड्रिलिंग करून सुया घुसवून मोहोर येण्याचा डोस देवून झाला. पहिल्या राऊंड नंतर तीस दिवसानी दुसरा नी पुन्हा वीस - वीस दिवसानी इम्युनिटी वाढवायचे दोन-तीन राऊंड असं शेड्युल बब्याने आख़ून दिलेलं नी इंजेक्शन मधून द्यायची लिक्विड तो स्वत:च्या देखेरेखी खाली जात निशी तयार करून पुरवणार होता.

दुसरा डोस द्यायला टीमआली तेंव्हा सगळ्या शंभरही कलमाना नखनिशिखांत फूट आलेली दिसली. प्रयोग यशस्वी होणार यात शंकाच नव्हती पण इतके ट्रिमेण्डस रिझल्टस दिसल्यावर टिमला हुरुप आला. नंतर

प्रिझर्व्हेटिवचा फायनल डोस द्यायला टीम आली तेंव्हा प्रदीपची गाडी दिसल्यावर त्याचे भाऊ धावतच पुढे आले. प्रदीपला खाली उतरायलाही तकस न देता ते म्हणाले , “ आता फळ सुपारी एवढं झालय नी एकेका देठाला पाच - पाच सहा- सहा अशी घोसाने फळं उतरलेली आहेत. गळ म्हणशील तर अजिबात नाही नी एकाही फळावर कसला रोगा-बिगाचा प्रादुर्भाव नाही...फळान फळ अगदी स्वच्छ आहे. असा उतारा बाबू काकांच्या आठवणीत सोडच पण आमच्या पहाण्यात ही कधी-कुठे आलेला नाही. ”प्रदीपचे मन आनंदाने भरून गेले. चहा घेवून टीम बागेत गेली. फळ चांगले पोसावे, त्याला रंग यावा यासाठीचे केमिकल देवून झाले.आणखी साधारण दोन महिन्यानी फळाची वाढ पूर्ण झाली की खन्ना साहेबाना प्लॉटवर आणायचे, व्हिडिओ शूटींग करायचे नी मल्टिनॅशनल कंपन्याना जमालगोटा द्यायचा असा बेत त्याने मनोमन योजला.

रात्री जेवणखाण झाल्यावर बाबुकाकानी प्रदीपला जवळ बोलावले. “प्रदीप, तुझा प्रयोग बघून मी चाट झालो बाबा...हे असे काही घडेल अशी मीस्वप्नात दिखी कल्पना केली नव्हती. आम्ही गाढव ठरलो ह्या ज्ञानापुढे... उरी फुटेतो धोंडे फोडून कलमाना तळया बांधल्या.गाड्यांवारी लेंडी ,शेणखत नी दर पावसात टाळाचे भारे घालून हुरणी भरणी केली. पण दोन-तीन खेपा सोडल्या तरउभ्या हयातीत फार मोठे उत्पन्न काय मिळाले नाय कधि... पणआमची भूकही कमी होती. कलमे मोडेपर्य&त धरतील, लाखो रुपये मिळतील नी आम्ही पायावर पाय डाळून घृतकुल्या मधुकुल्या खाऊ, छानछोकी करू हीमुळी आमची इच्छाच नव्हती. अती पैसा मिळवून तरी त्याचे करायचे काय? हा सुद्धा प्रश्नच! आमचे पोट ते केवढे नी खाणार तरी किती नी

काय काय? आज अठ्यायंयशी उमर आहे माझी पण अजुनही आकडी कोयती बांधून कलमात जावून विरडभर काम करतो मी.

मला सुपारीच्या खांडाचे पण व्यसन नाय. चहा कसला तो मी उभ्या हयातीत चाखलेला नाय. अजून आरोग्य शाबूत राखून आहे मी. नी आमची पोरे बघा... तुला डायबेटिस, गजाला प्रेशर प्रत्येकाच्या मागे काय ना काय व्याधी आहेच. आम्ही कोलव्याच्या घरात हायात काढली. पोराना कलमांचे लाखो रुपये मिळतात. त्यानी भले थोरले दहाखणी घर बांधले स्ल्याबचे... तुला कंपनीची गाडी आहे... तुझे ईथले दोन्ही भाऊ यंदा आंगोपत्ती गाड्या घेतील यंदा. तुझ्या प्रयोगानी कलमांच्या जीवावर पैशाची जशी टाकसाळच गावली म्हण त्याना! आता ते सालाबाद नोकरदारां सारखे हुकमी उत्पन्न घेतील. छान आहे... कलमे जशीह्यांची देणेकरीच ... त्यांना पिळून सवाई दिढी ने दुपटीने चौपटीने वसूल करा तुम्ही नी एक दिवस होऊंदेत त्यांचे सराटे!! मला खुळ्याला तुमचे शोध-बोध कुठचे समजायला? आम्ही जे केलेते डोळसपणे नी कलम शाबूत राहिल ये योजून! ''जरा दम खाल्ल्यावर आवंढा घोटून ते पुढे बोलु लागले. ''गोठ्याजवळ एक आंबा होता. कधितरी कपडे वाळत घालायची दोरी अडकवायला म्हणून मी त्याच्या खोडात तीन इंची तारचूक मारली .

काम झाल्याकर दोरी सोडली पण चूक काढायचे काय माझ्या लक्षात राहिले नाय. ह्या गोष्टीला आठ दहा वर्षे उलटली नी चूक मारलेल्या जागी मूर झाली. दोन आंगळे चार आंगळे म्हणता म्हणता चांगली वीतभर घब झाली नी आंबा हळू हळू वठायला लागला म्हणून तोडून टाकावा लागला. ह्या माझ्या हातानी चूक ठोकल्यामुळे पंधरा वर्षात सोन्यासारखे झाड वठून गेले.

तुझ्या प्रयोगात तर दाभणाएवढ्या सुया मध्याभागापर्यंत ठोकलेल्या आहेत नी त्या कायम तशाच ऱ्हायच्याहेत म्हणे... त्या बघितल्यावर मला आंब्यात ठोकलेल्या चुकेची आठवण झाली. तू काहीही म्हण पण त्या झाडांचे भवितव्य मला कठिणच दिसते आहे.. काहीवर्षे जातील तोपर्यंत ... आणि दुसराही विचार आला माझ्या मनात माणसाला अन्ना ऐवजी नुसती टानिकची इंजेक्षने दिली तर तो कितपत कार्यक्षम राहिल ? तुम्ही हे आयते खाणे त्यांच्या तोंडात घालणार म्हटल्यावर हळू हळू झाडाना त्याचीच सवय होईल नी जमिनीतून सोधून खाणे मिळवायचे ही त्यांची सवयच मोडेल... हे तुमचे प्रयोग पिशागती असल्यासारखे वाटतात मला... "

"झाड लावले की त्याने फळ द्यायला हवे ही अपेक्षा रास्तच आहे, नी झाड काही ना काही फळ देतेच. पण ती झाडाने कृतज्ञ भावनेने दिलेली देणगी आहे. माणसाने झाड लावले तरीही तो काही माणसाचा हक्क नाही. कारण तुम्ही नाही लवलेत तरी निसर्ग क्रमाने झाडे उगवतात नी वाढतातच ना? तुम्ही आधी एखादे तरी झाड लावा, त्याअलारक्ताचे शिंपण करून वाढवा तेंव्हाच तुम्हाला फळासाठी 'आ' करायचा नैतिक अधिकार आहे.तुम्ही ज्यांच्याकडून अपेक्षा करताहात ती झाडे तुमच्या बापजाद्यानी लावलेली आहेत. तुमच्या राक्षसी अपेक्षा पुऱ्या करण्यासाठी तुम्ही त्यांच्या जीवाशी अनैसर्गिक चाळे कराल तर निसर्ग तुम्हाला कदापि माफ करणार नाही. झाड वाढायला खूप वेळ लागतो पण नायसे व्हायला नाय लागत. तुम्ही शहाणेसुर्ते चांगल्या संस्कारात वाढलेले असून माकडाच्या हातात हे कोलित देताहात. पैशाला चटावलेले ठेकेदार उद्या जग दुनियेच्या बागांचा तुळांकार करतील. "

बाबुकाकांचं बोलणं ऐकल्यावर रात्री प्रदीपला झोप लागली नाही. सकाळी उठून टीम परतीच्या प्रवासाला लागली. बब्याला भेटायला प्रदीप कृषि विद्यापीठात गेला. “आपल्या प्रयोगांचे रिझल्टस अनइमॅजिनरी आहेत.” त्यावर काहीही प्रतिसाद न देता चष्मा काढून त्याच्या काडीशी खेळकरीत शून्यात दृष्टी लावीत बब्या सांगू लागला,“अरे पद्या , आपल्या त्या प्रयोगात एक यॉंव यॉंव राहिलच बघ... आपण झाडाच्या खोडात सुई ठोकणार ना ते छिद्र भरून येत नाही त्या भागात पावसाचे पाणी जाऊन तिथला भाग कुजायला लागेल. गावठी भाषेत आपण त्याला मूर म्हणतो.

झाडांच्या जीवन प्रणालीत खोडाला पडलेले छिद्र बुजायची प्रक्रियाच नाही. कदाचित आठ दहा वर्षे जातील पण त्यानंतर मात्र जखम चरत जावून झाड वठून जाईल. ” त्यावर जड आवाजात प्रदीप म्हणाला,“मी सुद्धा तुला तेच सांगायला आलोय.” “आमच्या बाबू काकानी काल रात्री हीच शंका बोलून दाख़वली. त्यानी तर पुढचेही भाकित केले. सतत आयते खाणे खायची सवय लागली ना तर अन्ननिर्मितीची आपली क्षमताच झाड विसरेल. नी त्याही पेक्षा पैशाला चटावलेल्या ठेकेदारांच्या हातात हे कोलीत मिळाले तर बघायलाच नको.” मग त्याने बाबू काकांचे बोलणे खड्यान खडा बब्याला सांगितले.“जिनिअस! सिम्पली एक्सायटिंग प्रेडिक्शन.” बब्या म्हणाला. “तुझ्या त्या बाबू काकाला खरं तर पीएच. डी. द्यायला हरकत नाही. आम्ही उभी हयात विज्ञानाच्या क्षेत्रात घालवली पण चूक करण्यापूर्वी एवढी क्षुल्लक बाबही आपल्या लक्षात आली नाही. इतके शिक्षण घेवूनही आपल्याकडे एवढाही दूरदर्शीपणा नसावा? छेऽ छे... मला तर या खुर्चीत बसायचीसुद्धा लाज वाटते. रिअली हॉरिबलऽऽ...!”

"प्रदीप, एवढ्या उच्च पदव्या मिळवल्या त्याची घमेंड, स्वत:च्या स्वतंत्र बुद्धिमत्तेचा अतिरेकी अभिमान आणि सुखाला चटावलेली वृत्ती यांचा तर हा परिणाम नसेल? की आमच्या अतिरेकी भोगलालसे पायी आम्ही आमची सदसद्विवेक बुद्धी नी तारतम्यही गहाण टाकले? आमच्या पिढीला असले अतिरेकी आततायी विचार सुचतातच कसे रे? मागचा पुढचा विचार न करता आम्ही माकडाच्या हातात कोलित द्यायला निघालो. आधीच कितीतरी स्पायसीज कोकणातून नामशेष झाल्यात... छे ऽऽ मलातरकल्पनाही करवत नाही.आमच्या डोळयात झणझणीत अंजन घालून ताळयावर आणणाऱ्या तुझ्या काकाला मानलं आपण. पन काय रे आपलं प्लॅन तू कंनीत डिस्क्लोज करून मोकळा झालास ना? जैवीक फॉर्म्युले त्यांचे डिटेल्स वगैरे ..." सुस्कारा सोडीत प्रदीप म्हणाला, " सुरुवातीला आपण सलाईन थेरपीचं पेपर वर्क केलं ते पेपर्स मी खन्ना सराना दाखवले . नी ते वाचल्यावर त्यानी आपला प्लॅन अॅक्सेप्ट केला. पण तसं घबरायला नको. अजून वेळ गेलेली नाही. जैविक फॉर्म्युल्यांचे डिटेल्स तू अजून दिलेस कुठे? आपल्या प्रयोगाचं खरं यश नी रहस्य त्या फॉर्म्युल्यात आहे नी ते फॉर्म्युले तुझ्या डोक्यात आहेत.

मी फक्त तू दिलेली सँपल्स प्लॉटवर ट्राय केली नी तिथेच संपवली. हे दुष्टचक्र इथेच थांबवाला हवं . भविष्यात या शोधामुळे काय नी किती दुष्परिणाम संभवतील ह्याची तर मला कल्पनाही करवत नाही. हे म्हणजे माकडाच्या हातात कोलीत देण्यासारखे भयावह आहे. ह्या सगळया गोष्टीना बूच लावायची जमालगोटा आयडिया माझ्याकडे आहे. असं कर मला एक फुलस्केप पेपर दे." बब्याने त्याला फुलस्केप पेपर दिला. प्रदीप त्यावर काहीतरी लिहू लागला. प्रदीपचं लेखन पूर्ण होईतो बब्याची उत्सुकता अगदी शिगेला

पोचली होती. लिहून झाल्यावर प्रदीपने पेपर बब्याकडे सरकवला. बब्या चष्मा लावून वाचू लागला. बब्याने कागद वाचून फक्त “ ओ माय् गॉड ... यू आर रिअली ग्रेट पद्या” असे उद्गार काढले. प्रदीपने के.के. ग्रूपमधली आपली नोकरी सोडल्याचं रिझायनिंग लेटर होतं ते!

***********

## ९. कर्माच्यो गती

दर दोन वर्षाआड होणारी पाटणे वाडीतली सार्वजनीक सत्यनारायणाची पूजा म्हणजे पंचक्रोशीसाठी कौतुकाची बाब. आम्हा पोराना ते आनंद पर्वच! आमच्या घरापासून हाकेच्या अंतरावर पाटणेवाडी सुरु व्हायची.आमची घरं भुरडी लगत सखलवटात. आमच्या घरामागे उंचच उंच डेग सुरु व्हायची. अगदी ताकदवान बापया सुद्धा मागिलदारच्या अंगणा पासून तो डेग संपून सपाटी सुरू हो ई पर्यंतचा अजमासे दोनशे वाव लांबीचा टेणा जराही न थांबता किंवा वेग कमी न करता धावत पार करू शकणार नाही एवढा जीवघेणा.पावसाळी व्हावटीमुळे माती धुपून रेवा सकेर वर साठलेली , त्यावरून जपून चालावे लागे. चढण तर अशी जीव घेणी की अर्ध्या टेण्यावर पोचला की माणूस पेटीच्या भात्यासारखा श्वास घ्यायला लागे. सपाटी गाठल्यावर पन्नासेक ढेंगांच्या अंतरावर दोन फाटे फुटायचे. डावी कडची वाट गावात चव्हाट्या कडे जायची नी उजवी कडची वाट पाटणे वाडीत.

वाडीच्या तोंडाशी पहिलंच घर काश्टीवाल्या भिक्याचं. वाडीत भिकाजी नावाचे चार इसम... चौघांची स्वतंत्र ओळख पटवण्यासाठी लोक त्याना काश्टीवाला भिक्या, धोतीरवाला भिक्या, पानवाला भिक्या नी टकलू भिक्या या नावानी संबोधित. वाडीत जवळ जवळ ऐंशी उंबरा. वाडीच्या मध्यापासून ते खाली पार भुरडी पर्यंत दुतर्फा आगरवट भागात पानाची बीयं असायची. तिथेच वाटेच्या खालच्या अंगाला वाडीतला एकमेव पाणवठा. बावीस हात खोल,

गोल आड. आडाचा घेर ही खूप मोठा, म्हणून छताडभर उंच घडीव चि-याचा कठडा बांधलेला.उन्हाळ्यातसुद्धा आडाला दीड पुरुष पाणी असायचं. वाडीतला घरवंदांचा भाग मळेवटी पासून माडभर उंचावर, पाण्याच्या दृष्टीने ओसाड.

पाटणे हे काय आमच्या गावातले मूळ रहिवाशी नव्हते. त्यांचा मूळ गाव तिकडे लांब वलाटीत. अंतर्गत कलहातून एका पाटण्याची पुरी घरवडच भाऊबंदानी गावातून अक्षरश: पिटाळून लावली. दोन कर्ते पुरुष त्यांच्या बायका नी पोरं नेसत्या वस्त्रांनिशी गडाच्या दिशेने चालत राहिले. दोन दिवसानंतर त्यांचा मुक्काम आमच्या पाणखोलात पडला. आमच्या गावचे अण्णा खोत दयाळू... त्यानी पाटणे कुटुंबाला आसरा दिला. त्यानी वीस एकराचं ओसाड पडण त्याना कायम स्वरूपी बक्षिस पत्राने दिल. आरंभ काळात पाटणे आजूबाजूच्या विहिरी वरून पाणी न्यायचे.घरवडी वाढत चालल्या तसे कोणी कोणी भुरडी नजिकची आगरं खरेदी केली. कोणी कोणी आमची नी बर्व्यांची आगरं खंडाने अर्धेलीने घेऊन पानमळे लावले. पण पिण्याच्या पाण्याची जिकिर कधिच सुटली नाही.

कोण कोण पाणके बोलावून पाचसहा ठिकाणी विहिरी खणुन झाल्या पण कुठेच पाणी लागले नाही, त्या काळी वाडीत तिघा चौघांच्या सारवट गाड्या होत्या. ते फोण्डा बाजारात खायची पानं विकायला नेत नी परतीच्या खेपी गावातल्या नी आजुबाजुच्या गावातल्या दुकानदारांचा किराणा आणून द्यायचे. फोंडा बाजारात गडमठातल्या बाबू देवधराचा मोठा बोलबाला. त्याला कर्णपिशाच्च वश आहे ... तो म्हणेल ते खरे होते अशी त्याची ख्याती. एकदा

बाजराला जाणा-या विठू. सख्या नी बच्चू तिघानीही ठरवून गडमठात जाऊन त्याची भेट घेतली. सव्वा रुपया दक्षिणा ठेवून विठू म्हणाला, " बाबू नानानू आमच्यो चार पिडयो पाणखोलात ग्येल्यो पन आमचे पान्याचे वनवास काय कमी होयत् नाय... तुम्ही आमका वाडीत पानी आखून द्येवा... पंचवीस नारळ नी सवा पंचवीस रुपाये तुमच्या थळावर आनून भक्षिस करीन."

बाबू देवधराने विठू पाटण्याचं आव्हान स्वीकारलं... "तुमच्या भागात जित्या पान्याचो झरो काय दिसत नाय ... पन माजी इद्या इरेक टाकून मी तुमका पानी काडून द्येयन्... माजो चेडो मी कायमचो थंय ठेवीन... दर गटारी अमवाशेक तीन कोंबडे द्येवन तेचा देना फेडूक लागात... तां चुकलां तर दुसरे दिवशी पन्याचो ठेंब नदरे पडणार नाय." बाबू ने आखून दिल्या जागी टोलेजंग आडाचे खोदकाम सुरु झाले. पुरी वाडी कामाला लागली. दीड महिन्याच्या अविश्रांत मेहेनतीनंतर वाडीचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटला. पाटण्यानी बाबू देवधराला वाजत गाजत आणून मानाचा फेटा नी बोलल्या प्रमाणे दक्षिणा देवून त्याची संभावना केली. गाव जेवणावळ घातली. नी तेंव्हा पासून दर वर्षी गटारी अमावास्येला चेड्याचं देणं भागवून खाऱ्या नैवेद्याच वाड भोजनही व्हायचं नी दर दोन वर्षाआड विहीरीवर सत्यनारायणाची महापूजा घालायची प्रथा सुरु झाली.

वाडीतला घर ठेप एक तरी बापया मुंबईत नोकरीला. सार्वजनीक पुजा हा पाटण्यांचा जसा मानबिंदू! दोन वर्षाआड पूजेसाठी झाडून सगळे मुंबयकरी बायकापोरांसह गावी यायचे. हात सोडून खर्च व्हायचा.दर डोईपट्टी ठरलेली नसायची. कार्यक्रमाची आखणी वाड प्रमूख नी वाडीतले बापये मिळून करीत.

पूजेपूर्वी चार दिवस घरठेप स्वेच्छा वर्गणी वाडी प्रमुखाकडे जमा होई. पूजा झाल्यावर दुसऱ्या दिवशी दुपारी जमाखर्च सांगिताला जाई. सहसा तूट येतच नसे... पण आलीच तर जमलेली मंडळी खिशात हात घालून पैसे काढून देत नी तूट भरून रक्कम शिल्लक उरत असे.

पूजेच्या रात्री आसमंतातल्या नामांकित भजनी बुवाना चढ्या दराने सुपाऱ्या देवून भजनाचा झगडा असायचा. आजुबाजुच्या पाच गावातली मंडळी रात्री तीर्थ प्रसादाला नी भजन ऐकायला जमायची. मुख्य भजनं रात्री उशिरा सुरु होत . तत्पूर्वी संध्याकाळची आरत झाल्यावर वाडीतली मंडळी एक बारी करीत. वाडीच भजन मंडळ असं नव्हतं पण कोणीतरी बरा गाणारा बुवा होई. रात्रीच्या भजनासाठी बोलावलेल्या बुवांपैकी कुणाचं तरी सामान मंडपात आलेलं असायच, तेच पेटी, मृदुंग, टाळ वगैरे वापरला जाई. एका वर्षी गावातल्या पाण्डु बुवाचा मेव्हणा कुणकेश्वरचा जोईल बुवा, त्याला सुपारी दिलेली होती.त्याने इतक्या लांबून पेटी, तबला, टाळ वगैरे सामान न आणता भावोजीचं सामान वापरायचं ठरवलं. त्यामुळे पाण्डु बुवाने पुजेच्या ठिकाणी पेटी, मृदुंग, टाळ आणून पहिला नंबर धरून ठेवला.

संध्याकाळची आरत झाली नी पाटणे मंडळीच भजन सुरु झाल. एक दोन अभंग झाले नी सखाराम बुवाने भारूड सुरु केलं. आपल साहित्य वापरून पाटण्यानी भजन सुरु केलं हे कळल्यावर पांडुबुवाचा पारा चढला. पाटण्यांचा सभागती अपमान करायचं योजून पांडु मास्तर तावातावाने पुढे गेला नी, “भजन बंद करा... कोणाच्या हुकुमाने दुसऱ्याचा सामान वापरताहास? साले उपरे येवन् शिरजोर झाले... आपल्या मालकीचा सामायन घ्येवची कुवत नाय नी चल्ले

भडये भजनां करूक ...” एकदम रंगाचा बेरंग झाला... जाणती बापये मंडळी पुढे होऊन हाती पायी पडू लाग़ली... तशी पांडुबुवाला अधिकच जोर चढला... त्याने पाटण्यांची आई माई उद्धरायला सुरुवात केली... पाटण्यांमधले जाणते सोनशेट , गोपाळ शेट नी आबा यानी काहीतरी मसलत केली नी ते पुढे सरले ... शिव्या देणाऱ्या पाण्डुची गचांडी धरून त्याला बाजूला खेचून आडवा घातला. त्याच्या धोतराचा सोगा घेवून त्याचे हातपाय मागच्या बाजुला बांधून त्याच्या डोक्यावरची टोपी तोंडात कोंबून त्याचे तोंड बंद केले. आबा म्हणाला “ तू कोण नी काय आसस तां आता ह्या काळोकात काय आमी वळकीत नाय... उद्या उजवाडलां की मगे तुका वळकू नी तुजा काय म्हन्ना हां तां दुकु आयकू...” समोरच्या पोराना बोलावून सोनशेट त्यांच्या कानात बोलला, “ ह्येका न्हेवन् काष्टीवाल्या भाग्याच्या गोठ्यात टाका. नी उजवाडेसर सोडू नुको ... ” मग भजनकऱ्यांकडे वळून तो म्हणाला , “तुमी करा भजन...”

त्या वर्षी पूजेला तर एकदम अजाब ... पुजे पूर्वी दोन दिवस मांडाजवळून टर्र टर्र टर्र आवाज यायला लागला म्हणून आम्ही पोरं बघायला धावलो. पेट्रोलवर चालणारे जनरेटर होते ते. वाडीत येणाऱ्या रस्त्यापासून ते पूजेच्या मांडापर्यंत बल्बनी ट्यूब लाईट ची रोषणाई पहायला सगळा गाव जमलेला. आम्ही स्प्रिंग फिरवून चालणारे घरगुती ग्रामोफोन बघितलेले ... इथे त्याची सुधारित आवृत्ती दिसली. मांडावर वाजवलेली गाणी आमच्या घरातही स्पष्ट ऐकू आली. हम है राजकुमार, कलियोंने घुंघट खोले, मेरा नाम चिन चिन चू , मेरी दोस्ती मेरा प्यार, अशी तेंव्हा गाजणारी हिंदी गाणी प्रथमच ऐकायला मिळाली. तसंच हिंदी गाण्यांच्या कालींवर बांधलेली कलियुगाचा आला फेरा बायको पुढती झुकतो नवरा (हँसता हुवा नूरानी चेहेरा च्या चालीवर) नी

‘आजची ताजी खबर ... ओ मामा थांबा जरा ओ मामा ऐका जरा’, ‘मी मर्द गडी बैलांची जोडी खिल्लारी’ असली मराठी गाणी दोन दिवस कान किटवीत राहिलेली .

तेंव्हा दोन दिवस दोन कार्यक्रम ठेवलेले... पहिल्या दिवशी भजनं नी दुसऱ्या दिवशी स्टेजवर नाच गाण्यांचा कार्यक्रम. रेकॉर्ड प्लेअर वर गाणी वाजवून नाचाचे कार्यक्रम झाले. (तेंव्हा रेकॉर्ड डान्स हा प्रकार आम्ही प्रथमच पाहिला.) वाडीतली मुलं मुली यानी एकत्र नृत्य करण्याचा तो काळ नव्हता. त्या साठी मुंबई वरून मुलामुलींचा ताफा आणलेला होता. तशी वाडीतल्या चार दोन मुलानी मात्र त्या ताफ्यात नाचकाम केलेनी. पण वाडीतली एकही मुलगी सहभागी झालेली नव्हती. मुलींच्या ताफ्याची मालकीण कुणी पापादेवी नायडू नावाची अर्ध्या वयाची बाई ...गळयात सोन्याचे लफ्फेदार चौपदरी हार नी दुपदरी गोफ , हातात चार चार बांगड्या पाटल्या, दोन्ही हातांच्या बोटात तीन तीन आंगठ्या अशी सोन्याने मढलेली... भारी भारी साड्या नी चमकदार तोकड्या पाठीची पोलकी घालून ओठ रंगवून असायची.

पापादेवी वाडीतले बापये, मुंबई वाली पोरं यांच्याशी सलगी करायची. उडदळीत परम्या गावड्याचा हातभट्टीचा धंदा चालायचा. तिथे एकवशी कोपरा गाठून बसून दारुडे गावठी दारू प्यायचे. तिथेच उडदळित दारुड्या बापया/पोरां बरोबर बसून बसून पापादेवी सिगारेटी ओढते, इंग्लिश दारू पिते, तिला दुवक्त मासे मटण लागतं ह्या असल्या बातम्या वाडीतले शाळा सोबती मोठ्या फुशारकिने रंगवून रंगवून सांगायचे. सत्यनारायणाच्या पुजेला वाडीतल्या नवीन लग्न झालेल्या जोडप्याला बसवायची प्रथा असायची. त्या वर्षी पूजेपूर्वी चार

दिवस गोंद्याच्या मुलाचे लग्न ठरलेले... पण दुर्देव आड आले... .. लग्ना दिवशीच नवरीची अडचण आल्यामुळे लग्न रद्द झाले.म्हणून सार्वजनिक पूजा झाल्यावर तिसऱ्या दिवशी लग्नाचा बेत धरला. कार्यक्रम उरकून आलेला ताफा नी वाडीतली बरिचशी मंडळी कार्यक्रम उरकल्यावर दुराऱ्या दिवशीच मुंबईला रवाना झाली . पापा देवीला गाव आवडलेला नी वाडीतल्या जाणत्यानी तिला लग्न सोहोळा पाहायला आग्रहकरून थांबवून घेतलेनी. लग्नाचा दिवस उजाडला. वरपिता गोंद्या, वरमाय काशी नी नवरदेव जगु पुण्याहवाचनाला बसले.

त्या वेळी वाड प्रमुख भलाजी पाटणे नी धोतीरवाला भाग्या पापादेवी जवळ जावून अजिजीच्या सुरात म्हणाले, “म्हंजे तुमी नाय म्हटलास ... तरी आमका राग नाय ... पन पुण्यावाचन म्हंजे द्येवाचा कार्य... वर मायका कार्या पुरतो तुमचो हार द्येवा घालुक नि न्हवरदेवाक गोफ नी याक आंगटी द्येवा... कारेक्रम झालो की आपली डाग ताब्यात घ्येवा... ” पापादेवीने क्षणभरही विलंब न लावता डाग काढून दिले. पुण्यावाचन उरकून वऱ्हाड बाहेर पडण्यापूर्वी दोघही दागिने काढून पापादेवीकडे देवू लागली तशी पापादेवी म्हणाली, “अरी रहने दो भाभीजी... शादी पुरी होनेतक मत निकालो ... तुमी काय पलून ज्याते काय कुटे? आनी मी बी संगत ऱ्हायेल की तुमचे... ” नी गोफ तेवढा तिने परत घेऊन गळयात घातला

सगळ्या वऱ्हाडातून पापादेवी लग्नघरी पोचली. गोंद्या गरीब तसा त्याचा पाव्हणाही गरीब. नवरीच्या अंगावर मंगळसूत्रातली डवलीसुद्धा सोन्याचं पाणी दिलेली खोटी . ते चित्र दाखवून मांडव शोभे पुरते पापादेवीने हार, बांगड्या,

पाटल्या, आंगठ्या नवरीला तात्पुरत्या घालायला देण्याची विनंती भलाजी पाटणे नी धोतीरवाला भाग्या ह्यानी केली नी पापादेवीने ती मान्यही केली. त्यावेळी मात्र वाऱ्हाडासोबत आलेली वाडीतली जाणती म्हातारी सुशाबायो म्हणाली, “ग्ये पापाद्येवी ….. तु ह्यां काय चलवलस तां माका काय बरां वाटत नाय... ही जोकमदारीची वस्तू... गरजेक मध द्येवचो पन मधाची बुदली कदी देव नये शान्या मानसान्...” पुरा अर्थ नाही कळला तरी सुशाबायोच्या बोलण्याचा मतितार्थ पापादेवीला जरूर कळला. खळखळून हसत ती बोलली, “अरी जाने भी दो माँजी ... शादी ब्याह का मामला है... और वैसे तो मैं हूँच ना यहाँ...”. बाजूला उभा राहून संभाषण ऐकणारा भलाजी म्हणाला, “ह्यां सुसलां म्हंज्ये खर्कट्या हातान मांजूर हाकलताना आदी बोटाची शीता दुकू चाटीत नी मगे हात वर उकलित...काय घंट्याभराचो प्रश्न... लगिन झाला की येळ न काडता लगेच आपले डाग ताब्यात घ्येवा...मग्ये झाला मां?” नी पापादेवीने हार. बांगड्या,पाटल्या उतरून नवरीला घालायला वरमाय काशीकडे दिल्या.

लग्न लागलं, जेवणावळ सुरू झाली... पत्रावळीवर बचकाभर भात त्यावर वाढलेलं काळया वाटाण्याचं सांबार नी मीठ... माणसं खुरमांडी घालून बसली नी मटामट भाताचे गोळे तोंडात कोंबीत बोल बोल म्हणेतो उठलीसुद्धा. पापादेवी रांधपाच्या होवऱ्यात बायकांच्या पंक्तित बसलेली म्हणून भात भिजेल एवढं कालण पुन्हा मागितल्यावर तिला मिळालं. हात धुतल्या धुतल्या सोबतच्या बायकानी धावती केली नी त्यांच्याच जथ्यातून पापादेवी काळवं पडता पाणखोलात पोचली. तिची रहायची सोय हिराबाबूच्या ओसरीवर केलेली. कुलुप काढून पापादेवीने खोलीत पाय टाकला . घडवंचीवर ठेवलेली तिची पत्र्याची बॅग कुठे दिसेना. तिने घाबऱ्या घुबऱ्या सुंद्री काकीला हाका

मारल्या.सुंद्री काकीआली तिने बाकाखाली, बाजल्या खाली वाकून बघितलं पण बॅग मिळाली नाही. आता मात्र पापादेवीचा धीर सुटला... ती मोठमोठ्याने रडाभेकायला लागली...आजूबाजुच्या घरातली माणसंही आली... घरात नी गोठ्यात शोध घेतला पण बॅग गेली ती गेली. रोकड रक्कम सोबत बाळगलेली होती म्हणून राहिली .

धास्तावलेल्या पापादेवीने गोंद्या नी नवरा नवरीची चौकशी सुरु केली. त्यावर लांबचं मकाण असल्यामूळे ती मंडळी वस्तीला नवरीच्या शेजार घरी जगूच्या मावळ्याकडे राहणार नी उद्या पाच परतवण उरकून दुपार नंतर येणार असं जाणत्यानी सांगितलं. रात्री पापादेवीला अन्न गेलं नाही. रात्री निजायच्या टायमाला सुशाबायो भेटायला आली. तिला बघताच पापादेवीला रडू आवरलं नाही. “तुमने मना किया था मुझे , लेकिन मैंने तुम्हारा कहना हँसी मजाकमें छोड दिया ...” तिच्या पाठीवर हात फिरवीत सुशाबायो बोलू लागली... “ कर्माच्ये गती नी कोंबड्यान गिळला मोती... तशी तरा...तु येवडी हुंबय सारक्या शेर बाजारात ऱ्हवान कुंटण खानो चलवनारी छप्पन बाई पन शेवटी बापयाच्ये मोडी आडया सुडक्याच्या बायल् मानसाक कशो कळनार? बापयाची जात पायान् गाटी घालीत त्ये बायल मानूस हातान दुकू सोडव शकनार नाय... ”

“आता मी काय सांगतय् तां सोयन् आयक् . आपलां ठिव सोडून बारा बंदरी जाताना असां शेरभर सोनां आंगा खांद्यार घेवन् जायाचा नाय बायल् मानसान. बापयाचे नाद बायल मानसान कदी करू नये...पन तू ते करतंस... शिगरेटी वडतंस... बापयांच्या मांडयेक मांडी लावन् दारू खातस ... बायल मानसाची मान मर्यादा सोडून बापयांशी लय लगळपान तू करतस, मग कदितरी

डबऱ्यात पडनारच तू ... तू दारू खावक येकटा दुकटा उडदळीत जायस् बापयां वांगडा तवाच माका भय वाटायचो की सोन्यासाट्ना कोन पन ह्येका गाडित एकवशी गाटून त्येचो पत्त्याबी लागनार नाय... पन पूजेचो कारेक्रम हुतो नी तुज्या मानसांची जुग पन हुती म्हनान बचावलस ... ”

“वळक ना देख त्येका आपले डाग काडून देवचां आगावपन केलस तू... तूजी करनीच तुका नडली, आता त्वांड फोडून घितलंस तरी काय्येकउपेग नाय ग्ये माज्ये बाय... तेनी चडवलानी आनी तू चडलस चन्याच्या झाडार्... तू उगीच आशेर् ऱ्हांव नुको... मांडव शोबेक दिलस तां तू कितीपन पिचाटलस तरी तुका परत मिळणार नाय.. अजून पैजान, फेरवे, कनातले झुमके , नाकातली चमकी नी दोन आंगट्यो ... नाय म्हटलां तरी दोन तोळे ऐवज बाळगून हस तू... बॅग चोरीक ग्येली तरी काय नाय काय रोकड, बिदागीचे अडिचशे रुपाये आजून तुज्यारी हत ... तू अशी बाराबंदरी आडगावात येवन् पडलं हस, तू आडया सुडक्याचा बायल् मानूस नी हय तूजो कोन वाली नाय तवां आजून तुज्याकडे मगज हा नां तेच्या साटना कोन कदी तुजो घात करीत समाजणार पन नाय... आता तरी शानपान शीक, नी जां आसा तुज्याहारी तां नी तुजो जीव शाबूत ठेवन् हुंबय गाट ... नायतर जां ऱ्हवला हा त्येच्या सकट तुका पन ईकून खाती ह्ये सोदे... आता झोप निचिंतीन नी सकाळी उटान मी वांगडी देतंय तेंच्या वांगडा विजेदुरुग गाट नी सांजच्या बोटीत बसान हुंबय गाट.”

सुशाबायोचा सल्ला मानून दुसऱ्या दिवशी पापादेवी मान खाली घालून मुंबईला जायला बाहेर पडली. सुशा बायोने तीच्या पुतण्याला शंकऱ्याला सोबतीला देऊन वाटेत खायला कवटाचे पोळे, सुक्या मिरचीची चटणी नी

तांदुळाच्या भाकऱ्या केळीच्या पानात गुंडाळून देवून पापादेवीला सुरक्षित विजयदूर्गला रवाना केली. जाताना सुशाबायोच्या पाया पडत पापादेवी म्हणाली, “मैं सब कुछ भूल जाऊँगी लेकिन तुम्हें हमेशा याद करूंगी.तू तो मेरी माँ बनके रही.... ”

मुंबईला गेल्यावर पापा देवीने पूजेसाठी तिच्या जथ्याला सुपारी देणाऱ्या हरबा नी भाग्या पाटण्याला गाठून काय तरी खटपट करायचा प्रयत्न केला. पण या दोघांचा मुंबईतला ठिकाणा पापा देवीच्या जथ्यातल्या कोणालाच नेमका माहित नव्हता. पापादेवी च्या ताफ्यात फ़क्त पोरींचा भरणा... त्यांच्या सोबत गावात गेलेले पोरगेही चार ठिकाणांहून गोळा झालेले... पापादेवीला हरबा नी भाग्या पाटण्याला गाठायचा

बेतही सोडून द्यावा लागला. दीर्घ काल गेल्यावर व्रण राहिला तरी जखम भरून येते ... या न्यायाने पापादेवी सार्वजनिक पूजेला मिळालेला दणका विसरली पण सुशाबायोच्या रूपाने भेटलेल्या माय ला कधिच विसरू शकली नाही.

***********

# लेखक परिचय

## प्रा. श्रीराम विनायक काळे

एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.



※ बी.एड्. कॉलेज देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक पदावर सेवा. ※ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानातून प्रचार प्रकाशन कोल्हापूर तर्फे ‘रुजवातीच्या गोष्टी’ हा कथासंग्रह प्रकाशित.

※ अणुरेणू,देवदुर्ग, आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, माहेर, अपूर्व, वसुधा, प्रतिबिंब, जत्रा,साहित्य सहयोग या दिपावली विशेषांकामध्ये सुमारे ८० लघुकथा प्रसिद्ध.

※ पुढारी नवांकुर कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजित राज्यस्तर कथास्पर्धा, तरुणभारत अक्षरयात्रा कथास्पर्धा, बॅ.नाथ पै कथास्पर्धा सावंतवाडी, को.म.सा.प देवरुख आयोजित कथास्पर्धा, i pustak HUB आयोजित कथास्पर्धा, साहित्य सहयोग कोल्हापुर आयोजित कथास्पर्धा अशा विविध कथास्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त.

※ कालराज प्रकाशन देवगड तर्फे ‘पाखरांची भाषा’ हा कथासंग्रह प्रसिद्ध. विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली तर्फे ‘बॅडकमांड’ हा कथासंग्रह प्रसिद्ध.

********

# प्रा.श्रीराम काळे



















ई साहित्य प्रतिष्ठान

## ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षाचे होत आहे.
## प्रा. श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील सहावे पुस्तक.

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली अक आहेत. देवगड येथील बीएड विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली आळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्यकाळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५५६पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७),

उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी (५३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३८), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (४), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (६), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या

**व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.**

**आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।**
**दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।**